शब्द रुची

फेब्रुवारी २०२०
मूल्य १० रुपये
पृष्ठे ६०

माझ्या मराठीचा बोलु कौतुकें ।
परि अमृतातेंही पैजा जिंके ।
ऐंसी अक्षरें रसिकें। मेळवीन ।।
संत ज्ञानेश्वर

storytel

नववर्षाचा संकल्पः 2020 मध्ये ऐका ऑडिओबुक्स!

१ जानेवारी २०२० रोजी माहितीयुगाच्या नव्या पर्वात प्रवेश करताना आपल्या आसपास अनेक सामाजिक बदल घडताना दिसत आहेत. मोठ्या शहरात अनेक तरूण मुले आणि मुली हेडफोन लावून वावरताना दिसतात. सिलेक्टेड कंटेंटच ऐकतात किंवा पहातात अशा चोखंदळ वाचक, प्रेक्षक आणि श्रोत्यांसाठी मोबाईलवर नवे ऑडिओ आणि व्हिडीओ ओटिटी प्लॅटफॉर्म निर्माण होऊ लागले आहेत.

या नव्या तंत्रज्ञानामुळे वाचकांच्या पुस्तक वाचनाच्या सवयी बदलत आहेत. अनेक चोखंदळ वाचक आता आपल्या टॅबवर किंवा रिडरवर ईबुक्स वाचतात किंवा मोबाईलवर ऑडिओबुक्स ऐकतात. अनेक उत्तमोत्तम, दर्जेदार साहित्यकृती आता ऑडिओबुक्स स्वरूपात उपलब्ध होऊ लागल्या आहेत. नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातले अनेक नामवंत अभिनेते आपल्या वाचनकौशल्याचा वापर करून या दर्जेदार साहित्यकृतींना आपल्या आवाजाने अधिक कलात्मक पध्दतीने सादर करत आहेत.

भारतामध्ये २०१७ साली स्टोरीटेल या स्विडिश स्ट्रिमिंग कंपनीने ऑडिओबुक्सची सेवा मासिक वर्गणी घेऊन द्यायला सुरूवात केली. फक्त रू.२९९ रूपयात मराठी, इंग्रजी आणि हिंदीतील एक लाखांहून अधिक पुस्तके ऑडिओबुक्स स्वरूपात मोबाईल ॲपमध्ये एका क्लिकवर उपलब्ध झाली. ही एक प्रकारची क्रांतीच आहे.



स्टोरीटेल डाऊनलोड कसं कराल?

अकाऊंट उघडण्यासाठी www.storytel.com/**marathi** या वेबसाईटला भेट द्या

ईमेल आयडी, पासवर्ड किंवा फेसबूकवरूनही तुम्हीं अकाऊंट उघडू शकता

तुमच्या डेबिट किंवा क्रेडिट कार्डचा तपशील भरा

****

तुमच्या फोनवर ओटीपी नंबर येईल

कन्फर्मेशन मिळवा

स्टोरीटेल ॲप ॲप-स्टोअर किंवा प्ले-स्टोअरवरून शोधा व डाउनलोड करा

QR कोड स्कॅन करा आणि 30 दिवस मोफत ऐका

30 दिवसांचा ट्रायल पिरियड संपल्यानंतर तुमचे सबस्क्रिप्शन 299/महिना असे सुरू राहील.

Download on the App Store

GET IT ON Google Play

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

फेब्रुवारी २०२०, वर्ष सहावे
अंक दहावा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
अभ्यागत संपादक : **डॉ. शारदा सबनीस**
संपादन साहाय्य : **डॉ. लतिका भानुशाली**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
granthaliad@gmail.com
वितरण – हरिप्रसाद जयस्वाल

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी ३०० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

अनुक्रम

'शॉपिंग-मॉल्सचे चढ-उतार / ५
विनता कुलकर्णी

महाराष्ट्राचे चार गंधर्व / ८
पं. सुजन राणे

अमेरिकन 'मराठी' म्हणून वाढताना... / ११
माधवी सबनीस

अंकोर वट / १३
सुधीर शं. कुलकर्णी

झुंज / १५
संजीव दहिवदकर

आमचे नाना उर्फ बालगंधर्व / २०
जयंत कुलकर्णी

भारतीय वंशावळीबद्दल पाच विचार मते / २६
राहुल सबनीस

'ॲपेलेशियन ट्रेल'ची भ्रमंती / २८
गिरीश देसाई

गोन विथ द विंड / ३१
डॉ. मोहन द्रविड

महिला ओबामा : कमला हॅरिस / ३६
डॉ. अनंत पां. लाभसेटवार

Howdy Modi, अजी श्रेष्ठ नेते पाहिले / ४०
अनुजा अ. सबनीस

नवीन वाट / ४२
अपर्णा केतकर

पुण्याच्या विश्व मराठी एकांकिका स्पर्धेत कलाब्रेशनचे नेत्रदीपक यश! / ४४
निलेश मालवणकर

'ग्रंथाली' ४५ वा वाचकदिन परदेशी भारतीय व बृहन्महाराष्ट्रातील लेखकांच्या कथांचा स्पर्धा निकाल /४६
'ग्रंथाली' पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ५२
ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे / ५५**

संपादकीय

मराठी दिनाच्या निमित्ताने नूतन वर्ष २०२०च्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

माझा जन्म एका मराठी मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. घरात संपूर्ण मराठी वातावरण! लग्न झाल्यापासून ते आतापर्यंतचे आयुष्य अमेरिकेत गेले. तेथे जाऊनसुद्धा मराठीची भूक काही केल्या शमत नव्हती. साधे पत्र जाऊन उत्तर येण्यासाठी महिना जात असे. गावातल्या आणि बाहेर गावातल्या मराठी लोकांना फोन केले. आमंत्रणे गेली, जेवणे झाली, छोट्या-मोठ्या गाण्याच्या बैठका झाल्या आणि त्यातूनच पुढे 'एकता'सारखे (१९६९) हस्तलिखित त्रैमासिक छापले जाऊ लागले.

अमेरिकेतला मराठी माणसाचा आकडा जसजसा वाढत गेला तसतशी मराठीही समृद्ध होऊ लागली. सुरुवातीला २५०-३०० लोक जमून केलेले १९८३ सालचे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन आता ४००० वर लोकांच्या उपस्थितीत साजरे होते. भारतीय कलाकारांच्या तोडीचे कार्यक्रम आमचे अमेरिकन मराठी करू लागले आहेत. ही गुणांची प्रतिभा पाहून 'भारतातून कलाकार बोलावून एवढा खर्च करण्याची गरज आहे का?' असे विचार मांडले जाऊ लागले आहेत. खरंच आपल्याला त्यांची गरज आहे की त्यांना आपली? हा एक चर्चेचा विषय आहे.

इकडच्या गणेशाचे ढोल-ताशांच्या आवाजात आता स्वागत होऊ लागले आहे. दिवाळी, संक्रांत, होळी इत्यादी सण जोरात साजरे होतात. शहराशहरांतून मराठी शाळा सुरू झाल्या आहेत. अमेरिकेत मराठी छानपैकी तग धरून आहे. मात्र अमेरिकेत जन्मलेल्या पुढील पिढीत ते कितीसे राहील हे सांगता येत नाही. असे म्हणतात की, परदेशात स्थायिक झालेल्या लोकांच्या तिसऱ्या-चौथ्या पिढ्यांनंतर त्यांची भाषेची आवड जागृत होते. पाहूया असे होते का?

आमच्या माहेरी मराठीची अवस्था काय आहे ते आपण पाहात आहात. टीव्हीवरील बातमीदारांचे मराठी उच्चार, टीव्हीवर लिहिलेल्या शुद्धलेखनाच्या चुका पाहून-ऐकून त्रास होतो. अगदी क्लिष्ट नको तरी साधे शुद्ध मराठी का ऐकायला मिळत नाही? मराठी शाळा बंद होत आहेत. ज्यांनी पुढाकार घेऊन मराठीला पाठिंबा द्यायचा त्याचीच मुले इंग्रजी शाळांत शिकत आहेत. पुढील दिवस मराठीला महाराष्ट्रात काही ठीक नाहीत, असे आम्हाला वाटते. आम्हा अमेरिकन मराठी लोकांना मराठीचा अभिमान आहे. तिकडच्या दोन्ही संस्कृतीची आम्ही जपणूक करत आहोत.

त्यामुळे हा अंक फक्त अमेरिकन मराठी लेखकांनी तयार केला आहे. विषय माहितीतलेच पण लेखन आमच्या तीन-चार पिढ्यांच्या लेखकांनी लिहिलेले आहेत. या सर्व लेखकांनी कालमर्यादा आणि लेखमर्यादा नीट पार पाडली, त्यांचे आभार. अमेरिकन मराठी लोकांनी मराठीत लिहिलेले हे लेख तुम्हाला आवडतील अशी आशा आहे.

हा सगळा 'शब्द रुची'चा खटाटोप 'ग्रंथाली'च्या सुदेशजींच्या आग्रहामुळे आपल्या पुढे येत आहे. आम्ही 'अमेरिकन' मराठीत लिहिलेले लेख 'ग्रंथाली'च्या संपादिका डॉ. लतिका भानुशाली आणि योगिता मोरे यांच्या सहकार्याने. तसेच डॉ. सरिता भावे हिने लेख भाषांतरित करून मदत केल्याबद्दल त्या सर्वांचे आभार.

– डॉ. शारदा सबनीस
Columbia, MD
shardasabnis@yahoo.com

‘शॉपिंग-मॉल’चे चढ-उतार

विनता कुलकर्णी

सध्या शॉपिंग मॉल म्हटले, की आपल्या डोळ्यांसमोर, चकचकीत अद्ययावत भव्य इमारती, विविध नव्या, जुन्या फॅशन्सचे झगझगीत कपडे, इतकेच नव्हे तर ‘डी-स्ट्रेस’ म्हणून युवापिढीत लोकप्रिय असलेल्या, भारी किंमतीला महागड्या दुकानात मिळणाऱ्या फाटक्या जीन्स... अशा नानविध प्रकारच्या कपड्यांची दुकाने येतात. मॉल म्हटले की दागिने, खेळणी, इलेक्ट्रॉनिक्स आणि तऱ्हेतऱ्हेच्या वस्तुंची, खाण्यापिण्याची दुकाने, आधुनिक डिजिटल युगातील खेळ आणि अजून बरेच काही मनोरंजक! अशा- एक प्रकारच्या जत्रेचे, आणि चंगळवादी समाजसंस्कृतीचे रूप समोर येते. ख्यातनाम इंग्रजी लेखक बिल ब्रायसन या संदर्भात एके ठिकाणी विनोदाने म्हणाले होते, We used to build civilizations. Now we build shopping malls.

रिटेल (किरकोळ) भूखंडविक्रीपैकी आठ टक्के जागा शॉपिंग मॉल्सने व्याप्त आहे.

जागतिक पातळीवर शॉपिंग मॉल, शॉपिंग प्लाझा, शॉपिंग ऑर्केड इत्यादी प्रकारातील सार्वजनिक खरेदी-क्षेत्र-संकल्पना प्राचीन आहे. रोममध्ये इ. स. १००-११० च्या सुमारास गावातील सार्वजनिक चौकात ‘ट्रॅजन मार्केट’ अस्तित्वात होते अशी रोमन पुरातत्वविभागाच्या कागदोपत्री नोंद आहे. इंग्लंडमध्ये चेस्टर चेशायर, येथे १३व्या शतकात बांधलेला ‘चेस्टर रो’ हा शॉपिंग मॉल म्हणजे जगातील एक जुने, सतत गर्दी खेचणारे व्यापार-संकुल. या संकुलाच्या परिसरात शेकडो दुकाने असून विविध जिने, रस्ते आणि पाऊलवाटांनी ती जोडलेली होती. विविध स्तरांवरील व्यापाऱ्यांसाठी या संकुलात वस्तूंच्या प्रकारानुसार दुकाने मांडली होती. उदाहरणार्थ

शॉपिंग मॉलमध्ये प्रत्येकजण खरेदीसाठी येतो असेही नाही. पूर्वी लोक बागेत, मोकळ्या हवेत फिरायला जात. आता काहीजण मॉल्समध्ये एक-दीड तास हिंडायला, कुणी व्यायाम म्हणून फिरायलाही येतात. मॉल्समधील दुकाने उघडण्यापूर्वी ज्येष्ठ नागरिकांना पहाटे फिरण्यासाठी अमेरिकेत आणि कॅनडात काही मॉल्समध्ये वेगळा परवानाही दिला जातो. तरुण पिढीतील काहीजण तर खरेदीऐवजी करमणुकीसाठी आणि ‘विन्डोशॉपिंग’ करत ‘टाईमपास’साठी मॉलचा परिसर पसंत करतात.

‘शॉपिंग-मॉल’ हा मुख्यतः उत्तर अमेरिकी संकल्पनेतून व्यापारसंकुलासाठी वापरला जाणारा शब्द. युरोपातील काही देशात याचा ‘शॉपिंग सेंटर’ असाही उल्लेख केला जातो; ज्यात एक किंवा अनेक इमारतींमध्ये पसरलेल्या परिसरात किंवा जागेची कमतरता असल्यास बहुमजली उंच इमारतीत (उदाहरणार्थ : हाँगकाँग, इंडोनेशिया, बँकॉकमधील मॉल्स.) अनेक दुकाने, मनोरंजनात्मक विविध प्रकल्प, खाद्यपदार्थांचा विभाग/फूड कोर्ट आणि हे सारे सामान्यत: मॉलचाच भाग असलेले जिने, पाऊलवाटा, रस्ते यांनी जोडलेले असते. (अमेरिकेत अशा बंदिस्त संकुलांऐवजी गावातील रस्त्यांवर बांधलेल्या खुल्या व्यापारी संकुलांना ‘शॉपिंग प्लाझा’ किंवा ‘शॉपिंग ऑर्केड’ म्हटले जाते.) ‘इकॉनॉमिस्ट’ या अमेरिकन नियतकालिकातील मे २०१७च्या अहवालानुसार अमेरिकेमध्ये

बेकरी विषयक दुकानांसाठी ‘बेकर्स रो’ नावाची गल्ली, मांसाहारी पदार्थांसाठी ‘फ्लेशमॉन्जर्स रो’ इत्यादी. आजच्या शॉपिंग मॉलचा जणु जुन्या काळातील प्रतिनिधी असा इस्तंबूलचा ‘ग्रँड बझार’ पंधराव्या शतकात बांधला गेला आणि अजूनही जगातील अतिशय मोठ्या शॉपिंग सेंटरमध्ये याची गणना होते. त्यात ५८ रस्ते आणि ४००० दुकाने आहेत.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला युरोप आणि अमेरिकेत अनेक मोठ्या शहरांमध्ये वास्तुकलेचे उत्कृष्ट नमुने असलेले शॉपिंग ऑर्केड आणि शॉपिंग सेंटर्स उदयास आले. १८७८ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये उघडलेले ‘क्वीन व्हिक्टोरिया मार्केट’ अजूनही चालू स्थितीत असलेले दक्षिण गोलार्धातील एक अतिभव्य शॉपिंग सेंटर आहे. याचप्रमाणे अमेरिकेत १८९० मध्ये बांधलेल्या क्लीव्हलँड शॉपिंग ऑर्केडमध्ये नऊ मजली दोन इमारतींना जोडणाऱ्या पाच मजली ऑर्केडच्या दोन बाजूंनी लोखंडी फ्रेमिंगमध्ये १६०० काचेची तावदाने आहेत. साधारण दुसऱ्या महायुद्धानंतर, विसाव्या शतकाच्या मध्यावर, अमेरिकेत मोठ्या शहरांमध्ये उपनगरे फोफावली. उपनगरांतील लोकसंख्येत ४० टक्क्यांहून अधिक वाढ झाली. गावात, शहरात फिरण्यासाठी वैयक्तिक वाहनांचा वापर होऊ लागला. पूर्वी शहराच्या मध्यवर्ती/‘डाउनटाउन’ परिसरात बाजारपेठ असे. लोकांच्या हातात

वाहने आल्यावर आणि जरा पैसा खेळायला लागल्यावर शॉपिंग सेंटरची एक नवीन शैली अमेरिकेत तयार केली गेली. उपनगरांमध्ये अशा व्यापारसंकुलाच्या रूपाने जणू उपनगरीय डाउनटाउन थाटले गेले. सुरुवातीपासूनच, मॉल्सच्या डिझाइनमध्ये ग्राहकांची सोय, आवडीनिवडी यावर भर दिला जाऊ लागला. खुल्या मैदानात असणाऱ्या शॉपिंग प्लाझामध्ये बर्फ, ऊन-पाऊस यामुळे ग्राहकांची गैरसोय होई. त्यामुळे, बंदिस्त व्यापार संकुलाची कल्पना पुढे आली. एका छताखाली नियंत्रित वातावरणात ग्राहकांना सर्वोत्कृष्ट कसे देता येईल या विचारासह अमेरिकेत भव्य शॉपिंग मॉल तयार होऊ लागले. त्यात एक किंवा अनेक बडी अँकर स्टोअर्स किंवा बिग बॉक्स स्टोअर्स असणाऱ्या मॉलची संकल्पना अवलंबिली गेली. मॉल्समध्ये मोठ्या स्टोअरद्वारे आकर्षित झालेल्या ग्राहकांमुळे त्याचा इतर दुकानांनाही फायदा व्हावा या उद्देशाने जोडीला अनेक लहान-मोठी साखळी स्टोअर्स किंवा स्वतंत्र स्टोअर्स मॉल्समध्ये अस्तित्वात आली. मॉलच्या सुशोभितकरणाचा एक प्रकार म्हणून बसवलेल्या काचेच्या तावदानातून आत प्रकाश कमी झिरपत असल्याने, मॉलमध्ये २४ तास वीजेवर चालणारी प्रकाशयोजना वापरली जाऊ लागली. संपूर्ण इन डोअर मॉल्समध्ये कारंजी, तलाव... इत्यादी बांधून प्रसन्न निसर्गसानिध्याची वातावरणनिर्मिती केली गेली आणि त्याच बरोबर अशा रचनेभोवती वळसा घालून लोकांना पुढे जावे लागत असल्याने सर्व दुकानांकडे ग्राहकांचे लक्ष वेधेल अशा विपणनाच्या क्लुप्त्या मॉलमध्ये वापरल्या जाऊ लागल्या. १९५४च्या प्रवेगक घसारा (the accelerated depreciation laws) कायद्याने अमेरिकेतील मॉल बांधकामास आणि शहरी क्षेत्रावरील ग्रीनफील्ड विकासास उत्तेजन मिळाले. १९६०मध्ये कॉर्पोरेट उत्पन्न कर टाळण्यासाठी कायद्याने आरईआयटी (रीअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट) मध्ये गुंतवणूकदारांनाही एकत्र येण्यास उत्तेजन मिळाले आणि मॉलचे सध्याचे परिचित भव्य लँडस्केप आकारास येऊ लागले.

विसाव्या शतकाच्या अखेरीस आणि एकविसाव्या शतकात शॉपिंग सेंटर आणि मॉलचा आकार वाढतच गेला. कॅनडामध्ये १९८१ साली बांधलेला ८०० पेक्षा जास्त दुकाने, ३८ लाख चौरस फूट (रीटेल फ्लोअर) क्षेत्रफळ असलेल्या तीन मजली शॉपिंग मॉलचे नाव आहे 'एडमंटन मॉल'. जगातील सर्वात जास्त लोकांनी भेट दिलेला आणि अमेरिकेत दुसऱ्या क्रमांकावर असलेला, १९९२ साली बांधलेला मिनेसोटा राज्यातील मॉल आहे- 'मॉल ऑफ अमेरिका'. तेथे आत करमणुकींच्या इतर साधनांबरोबर थिएटर आणि चर्चदेखील आहे. सध्या अमेरिकेत सर्वात मोठा मॉल म्हणजे २०१९ साली ईस्ट रुदरफोर्ड (न्यू जर्सी) परिसरात उघडलेला- ३० लाख चौरस फूट (रिटेल फ्लोअर) क्षेत्रफळाचा, ४५० पेक्षा जास्त दुकाने असलेला 'अमेरिकन ड्रीम मीडोलँड्स' शॉपिंग मॉल.

२००८ मध्ये बांधकाम पूर्ण झालेला, १,२०० पेक्षा जास्त दुकाने, ५४ लाख चौरस फूट (रीटेल फ्लोअर) क्षेत्रफळ असलेला दुबई येथील शॉपिंग मॉल, सध्या चालू अवस्थेतील मोठा शॉपिंग मॉल समजला जातो. वास्तविक त्यापेक्षा मोठा मॉल चीनमध्ये अस्तित्वात आहे. परंतु कित्येक दिवस ओसाड आणि 'डेड मॉल' म्हणून त्याची दुष्कीर्ती पसरली होती. २००५ साली बांधलेला 'साऊथ चायना मॉल' आता काही प्रमाणात पुनर्जीवीत होऊन 'न्यू साऊथ चायना मॉल' नावाने ओळखला जातो. २३५० दुकानांची क्षमता असलेल्या या मॉलचे रीटेल फ़्लोअर क्षेत्रफळ आहे, ७१ लाख चौरस फूट. या मॉलमध्ये ॲमस्टरडॅम, पॅरिस, रोम, व्हेनिस, इजिप्त, कॅरिबियन आणि कॅलिफोर्नियासह आंतरराष्ट्रीय शहरे, राष्ट्रे आणि प्रांत यावर नमुने केलेले सात भाग आहेत. मॉलमध्ये व्हेनिसच्या सेंट मार्कच्या 'बेल टॉवर'ची प्रतिकृती, २.१ किलोमीटर लांबीचा कालवा व त्यात सपाट तळ असलेल्या वल्हवण्याच्या बोटी असून मॉलच्या आतबाहेर ५५३ मीटर पसरलेले 'इनडोअर-आउटडोर रोलर कोस्टर'असे या मॉलचे भव्य स्वरूप आहे. मॉलचे नूतनीकरण करताना तेथील दुकानदारांनी आर्थिकदृष्ट्या मध्यमवर्गीय ग्राहकांवर अधिक लक्ष केंद्रित केले आणि मॉलला बरे दिवस आले आहेत. परंतु एकंदरितच पाश्चिमात्य देशांतील रिटेल शॉपिंगच्या पद्धती बदलू लागल्या आहेत. मॅझॉन, वॉलमार्ट आणि इतर ऑनलाईन दिग्गज रिटेल व्यावसायिकांमुळे ग्राहकांच्या खरेदीची पद्धत नाट्यमयरित्या बदलली आहे. परिणामत: अमेरिकेत बरेच शॉपिंग मॉल्स - विशेषत: लहान प्रादेशिक उपनगरातील कित्येक व्यापारसंकुले बंद होऊ लागली आहेत. अनेक मॉलमध्ये 'सीअर्स'सारखे बडे स्टोअर्स, आणि अनेक रिटेल शॉप्स बंद होत आहेत. मॉलच्या मालकांनी त्या जागी अपार्टमेंट्स, कार्यालये, इतर औद्योगिक केंद्रे, उद्याने, थिएटर, कॅसिनो, डिजिटल आणि मैदानी खेळांसाठी सोयी इत्यादी कामांसाठी वापरात आणले आहेत. उदाहरणार्थ, अमेरिकेत टेक्सास राज्यातील ऑस्टिन शहरात, ६००,००० चौरस फूट क्षेत्रफळाचा 'हायलँड मॉल' आता 'ऑस्टिन कम्युनिटी' कॉलेजचाच एक शैक्षणिक परिसर बनतो आहे.

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात अमेरिकेत मृत मॉल्सच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. रीअल इस्टेट तज्ज्ञांनी मॉल्सच्या परिस्थितीचा आढावा घेतांना खालील वर्गवारी केली. मृत मॉल म्हणजे तेथील दुकानांपैकी कमीतकमी ४०% दुकाने बंद पडलेली आहेत. आजारी मॉल म्हणजे तेथील दुकानांपैकी २०-४० टक्के दुकाने बंद पडलेली आहेत. आणि आर्थिक संकटात पडलेले मॉल म्हणजे तेथील दुकानांपैकी १०-२० टक्के दुकाने बंद पडलेली आहेत. अमेरिकेत २००० ते २०१० दरम्यान अशा मृत, आजारी आणि आर्थिक अडचणीत असलेल्या मॉल्सची टक्केवारी मोठ्या प्रमाणात वाढली. २०१०-२०१४ मध्ये या आकड्यांमध्ये केवळ अंशतः घट झाली. २०१४ च्या एका अहवालानुसार युनायटेड स्टेट्समधील जवळपास सर्व मॉल्सपैकी एक पंचमांश मॉल्स आर्थिक संकटात आहेत. काही रीअल इस्टेट तज्ज्ञांच्या मते यामागची मूलभूत समस्या म्हणजे अमेरिकेच्या ग्राहकांच्या गरजेपेक्षा अतिशय जास्त प्रमाणात अमेरिकेत शॉपिंग मॉल्सद्वारे रिटेल शॉप्स निर्माण

झाले. तसेच भरीस भर म्हणून जोडीला एकविसाव्या शतकात इंटरनेट व डिजिटल तंत्रामध्ये लक्षणीय प्रगती होऊन ऑनलाईन मार्केटिंग सोयीस्कर बनू लागल्याने अमेरिकी ग्राहकांचा कल पारंपरिक शॉपिंग मॉल्स ऐवजी ऑनलाईन शॉपिंगकडे वळला.

अमेरिकेतील क्रेडिट स्वीस (Suisse) ही कंपनी जगभरातील ग्राहकांना चोवीस तास वित्तपुरवठा करण्याच्या सर्व बाबींमध्ये सल्ला देणारी एक अग्रगण्य वित्तीय सेवादेणारी कंपनी आहे. या कंपनीच्या अनुमानानुसार आगामी पाच वर्षांत अमेरिकेतील २० ते २५ टक्के मॉल्स म्हणजे अंदाजे २५० शॉपिंग सेंटर्स बंद होतील. गेल्या पाच वर्षात अमेरिकेत मॉल्समध्ये 'सीअर्स', 'जे सी पेनी', 'मेसीज', सारख्या बड्या डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या कित्येक शाखा धडाधड बंद झाल्या आहेत. पूर्वी या बड्या स्टोअर्सनी मॉल्सचा आणि तेथील कार पार्किंगच्या जागेचाही २५ टक्के भाग व्यापला होता. आता तेथे काहीच नसल्याने जागेचा अपव्यय होतो आहे. मॉल्समधील काही बडी दुकाने बंद झाल्याने दुकाने मॉल्सची आवक कमी, आणि नेल सलून्स, दागिन्यांची आणि इतर मध्यम आकाराची रिटेल स्टोअर्स या सर्वांनाच मंदीचे दिवस आले आहेत. अमेरिकेत मॉल्सची ही घसरण चालू असताना सध्या भारतात मात्र मॉल्सची संख्या वाढत आहे.

सध्या जगातील एक मोठे खरेदीकेंद्र, बाजारपेठ म्हणून भारतातील मॉल्स उल्लेखिले जातात. गेल्या २० वर्षांत सुमारे ७०० मॉल्स भारतात उदयास आले. भारतामध्ये महानगरांमध्येच नव्हे तर मध्यम आकाराच्या शहरांमध्येही शॉपिंग मॉल्सची भर पडत आहे. केरळमध्ये कोची येथे २०१३ साली बांधलेला 'लुलू आंतरराष्ट्रीय शॉपिंग मॉल' सध्या भारतीय उपखंडात सर्वात मोठा शॉपिंग मॉल आहे. २५ लाख चौरस फूट क्षेत्रामध्ये पसरलेला, स्कायडर फिटिंग काचेच्या तावदानांचे छत आणि बाजू बनवलेल्या या महाकाय क्रिस्टल पॅलेसमध्ये एकावेळी एक लाख लोक सामावू शकतात. या मॉलमध्ये दागिने, फूड कोर्ट, फॅशन ॲक्सेसरीज, इलेक्ट्रॉनिक होम अप्लायन्स, फुटवेअर, स्पोर्टवेअर, ट्रॅव्हल ॲक्सेसरीज आणि इतर अनेक देशी आणि आंतरराष्ट्रीय ब्रँडची अशी ३०० दुकाने, ३००० कार पार्किंगची सोय, केरळमधील पारंपरिक पाककृतींपासून ते मूळ अरबी पदार्थांपर्यंत, पाककृतींनी सज्ज रेस्टॉरंट्स, तिसऱ्या मजल्यावर ८१,००० चौरसफुटाच्या ॲम्युझमेंट पार्कमध्ये, इनडोअर क्लाइंबिंग वॉल, ५००० चौरस फूट आईस स्केटिंग रिंक, पंचमितीय सिनेमा, १२ लेन बोलिंग एलीची सुविधा, ऑर्केड गेमिंग झोन, राईड्स, पार्टी हॉल, वायफाय, ५ वर्षाच्या आतील मुलांसाठी-आईसाठी बेबीरूम्स, बँकिंक सेवा, विवाहासारख्या कार्यक्रमांचे आयोजन आणि सर्व सुविधा आणि तातडीची रुग्णवाहिनी उपलब्ध आहे. येथील दुसऱ्या मजल्यावरील नऊ-स्क्रीन मल्टिप्लेक्स थिएटर एका वेळी २००० प्रेक्षकांना सामावून घेऊ शकते. अर्थात मॉलमध्ये या सर्वांना जोडणारे असंख्य सरकते जिने, फिरणारे वॉकवे आहेत. आणि त्याला लागूनच रॉयल स्वीट्स आणि हेलिपॅड सुविधा असलेले वीस मजली पंचतारांकित हॉटेलही आहे.

मॉल संस्कृतीचे हे बीज पाश्चिमात्य प्रगत देशात रुजले, कित्येक शतके फोफावले आणि आता विसाव्या शतकात अमेरिकेसारख्या देशात कित्येक मॉल्स मृत व्हायच्या मार्गावर आहेत. काहींमध्ये व्यापारीसंकुलाच्या जागी इतर उद्योगसमूह येऊ लागले आहेत. भारतात प्रचंड लोकसंख्या, राहण्याच्या जागेची टंचाई आणि जागांचे दर अमाप आहेत. त्याच बरोबर 'लुलू आंतरराष्ट्रीय शॉपिंग मॉल'सारखे महाकाय मॉल्स भारतीय शहरी जनतेस खुणावत आहेत. शॉपिंग मॉल संस्कृती अनेक आघाड्यांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी देत आहे. बऱ्याच विदेशी दर्जेदार उत्पादकांची भारतीय शॉपिंग मॉल्समध्ये दुकाने आल्याने, भारतीय बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर विदेशी उद्योजक गुंतवणूक करत आहेत. भारतीय बाजारपेठेतील वस्तूंच्या उत्पादनामध्येही आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा वाढते आहे. उत्पादनाच्या गुणवत्तेवर भर देण्यासाठी अशी स्पर्धा पोषक आहे. शॉपिंग मॉलमुळे आसपासच्या परिसरातील जमिनीचे आर्थिक मूल्य वाढते आहे. मॉल्समधील रीटेल शॉप्सबरोबरच चित्रपटगृहे, मनोरंजनाची साधने, मुलांसाठी खेळण्याचे क्षेत्र यासारख्या अनेक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने लोक मॉलकडे आकृष्ट होत आहेत. मॉलच्या व्यवस्थापनाच्या नफ्यामागील कारण म्हणजे तेथील दुकाने, फूडकोर्ट्स आणि मल्टिप्लेक्सकडून भाड्याच्या स्वरूपात मॉल व्यवस्थापनाला मिळणारे निश्चित उत्पन्न, मॉलच्या आवारात प्रदर्शित केल्या जाणाऱ्या जाहिरातींवर मिळणारे उत्पन्न आणि पार्किंग लॉटमधून मिळणारे उत्पन्न. भारतातील मॉल नफा कमवत आहेत पण त्यातील सर्व दुकाने खूप तेजीत आहेत असे सांगता येणार नाही.

भारतात मॉल संस्कृती फोफावत असताना त्याच बरोबर डिजिटल तंत्रज्ञानातही वेगाने प्रगती होत आहे. ऑनलाईन बाजारपेठ आपले पाय रोवू लागली आहे. ई-कॉमर्समुळे समाजातील सर्वच उद्योगसमूहांचे स्वरूप बदलत आहे. शहरांमधील काँक्रीट, दगडाविटांच्या मॉलमध्ये जायचे झाले तर तिथे जाईपर्यंत कित्येकदा वाहतुकीमुळे होणारा खोळंबा, वेळेचा खर्च, मॉलमधील वाहनतळावर आपले वाहन ठेवण्यासाठी भरावे लागणारे भाडे, या सर्वाचा विचार करता, शक्य होईल तेव्हा, आपल्या हातातील स्मार्ट फोनच्या ॲप्सवर, ऑनलाईन शॉपिंगच्या संकेतस्थळांस भेट देऊन आर्थिक उलाढाल्या, खरेदीविक्रीचे व्यवहार करणारी भारतीय पिढी उदयास येते आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये अनेक मॉल्सवर ई-कॉमर्समुळे आलेले सावट पाहता, सध्या भारतात नव्याने पेव फुटलेल्या अवाढव्य, झगमगाटी शॉपिंग मॉल्सवर ई-कॉमर्समुळे काय परिणाम होतील, हे पुढील काही दशकात काळ सांगेलच.

– प्रा. डॉ. विनता कुलकर्णी
Chicago, IL.
Tel. : +1 309 750 3038
vinata@gmail.com

महाराष्ट्राचे चार गंधर्व

पं. सुजन राणे

महाराष्ट्राला चार गंधर्व लाभले आणि त्यांनी महाराष्ट्राचं संगीत एवढं समृद्ध केलं की काय विचारू नका. महाराष्ट्राच्या आम जनतेला शास्त्रीय संगीताची नुसती गोडी लावली नाही तर तिला शास्त्रीय संगीत शिकवलं यात अतिशयोक्ती नाही. महाराष्ट्रात अब्दुल करीम खान, अल्लादियाँ खान, फय्याज खान, भास्करबुवा बखले पलुस्कर इचलकरंजीकर, वझे यांसारखे अनेक नावाजलेले शास्त्रीय गवई गेल्या दोनशे-तीनशे वर्षांत होऊन गेले व ह्या सगळ्यांनी आपापली शिष्य परंपरा निर्माण केली. त्या शिष्य परंपरेत भीमसेन जोशी, गंगुबाई हंगल, फिरोझ दस्तूर, बसवराज राजगुरू, केसरबाई केरकर, भोगुबाई कुर्डीकर, मल्लिकार्जुन मन्सूर, विलायत हुस्सेन, लताफत हुस्सेन अशा पुष्कळ गवयांची नावं घेणं क्रमप्राप्त आहे. परंतु ही शिकवण मुख्यत: त्यांच्या शिष्यांपुरती मर्यादित होती. म्हणजे, परंपरेनुसार त्याचं शास्त्रीय ज्ञान फक्त त्यांच्या शिष्याना दिलं गेलं होतं, ते आम जनतेपर्यंत पोहचवलं नव्हतं. ते ऐतिहासिक कार्य या चार गंधर्वानी केलं. महाराष्ट्रात गावोगावी नाटकं आणि संगीताचे जलसे करून, घरोघरी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण केली व कित्येक तरुणांना शास्त्रीय संगीत शिकायला प्रोत्साहित केलं असं म्हणावं लागेल. तेव्हा या चार गंधर्वांबद्दल हल्लीच्या तरुण पिढीला थोडक्यात माहिती असणं उपयुक्त ठरेल.

नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व यांचा जन्म नागोठणे, सातारा जिल्ह्यात २६ जून १८८८ साली झाला. त्यांचा विवाह लक्ष्मीबाईंशी झाला होता पण त्या १९४० ला दिवंगत झाल्यामुळे, कालांतराने बालगंधर्वांनी गोहरबाई कर्नाटकी नावाच्या नटीशी १९५१ साली लग्न केलं व ते तिच्याबरोबर १९६४ साली तिच्या निधनापर्यंत राहत होते. बालगंधर्वांना लहानपणापासून अत्यंत गोड गळ्याची दैवी देणगी होती. त्यांना गाताना एकदा बाळ गंगाधर टिळकांनी ऐकलं व ते उद्गारले की हा मुलगा ''बालगंधर्व आहे'' तेव्हापासून ती उपाधी त्यांना कायमची चिकटली. महाराष्ट्राच्या नाट्यसृष्टीतले ते पहिले गंधर्व होऊन गेले. त्यांचं श्रेष्ठत्व दोन गोष्टीमुळे नमूद केलं गेलं आहे. त्या काळी स्त्रिया मंचावर भूमिका करत नसत कारण ते असामाजिक मानलं जात होतं. अशा परिस्थितीत, बालगंधर्वांचं लोभस व्यक्तिमत्त्व व गोड गळा त्यांच्या कामी आला. स्त्री भूमिका करणारे ते पहिले कलाकार होते. तसच महाराष्ट्राच्या आम जनतेला नाट्यसंगीत द्वारा शास्त्रीय संगीताची गोडी लावणारे ते पहिले गाणारे होऊन गेले. भीमपलास, बागेश्री, काफी, पिलू, मालकौंस व दरबारीसारखे परिचित राग लोकांच्यापुढे मांडून त्यांना अक्षरश: नाट्यसंगीताशी कायमचं बांधून टाकलं. जणूकाय परिचित रागातून मराठी माणसांच्या मनावर शास्त्रीय संगाताचे धडे गिरवले. 'सौभद्र' नाटकातील - व्यर्थ मी जन्मले थोर कुळी, वद जाऊ कुणाला शरणाग, अरसिक किती हा शेला. 'संशयकल्लोळ' नाटकातील - 'संशय का मनी आला', मजवरी तयांचे प्रेम खरे. मूकनायक नाटकातील - 'उगीच कांता गांजिता', 'मानापमान' नाटकातील - 'हा टकमक पाही', 'नयने लाजवीत', 'खरा तो प्रेमा ना धरी', 'नाही मी बोलत', 'मला मदन भासे व मी अधना'. 'स्वयंवर' नाटकातील - 'नाथ हा माझा', 'मम आत्मा गमला', 'सुजन कसा मन चोरी', 'स्वकुल तारक सुता', 'नरवर कृष्ण समान' व 'अमृतची गोपाला' इत्यादी गाणी अनेक गाणारे ही गाणी त्यांच्या कार्यक्रमात अजून सादर करतात. जवळजवळ ३५ वर्ष (१९०५ ते १९४०) हे कार्य बालगंधर्वांनी चालू ठेवलं.

मराठी माणसाला नाट्यसंगीताच वेड लावण्यात हा किती मोठा भाग!!! त्यांचं नाट्यसंगीत किती मोठं होतं यांचे दोन नामांकित किस्से आहेत. जयपूर घरांण्याच्या अल्लादियाँ खानना नाट्यसंगीत विशेष आवडत नव्हतं, पण शिष्यांच्या आग्रहानुसार ते एकदा बाल गंधर्वांचं नाटक पाहायला गेले. भीमपलास रागात 'निषाद' स्वर कोमल आहे पण बालगंधर्व कोमल व शुद्ध असे दोन्ही 'निषाद' मोठ्या खुबीने लावायचे. अशा एका प्रयोगाला अल्लादिया खान नाट्यगृहात हजर होते. गंधर्वांनी भीमपलासमध्ये शुद्ध 'निषाद' लावल्यावर अल्लादियाँ खाननी अक्षरश: उभं राहून 'सुभान अल्ला' असे मोठ्याने उद्गार काढले. ही गंधर्वाना किंवा त्यांच्या नाट्यसंगीताला केवढी मोठी पावती होती. तसंच प्रसिद्ध तबलानवाझ अहमदजान तिरखवाँ व गंधर्वांचं काहीतरी बिनसल्यामुळे, तिरखवाँ गंधर्वांना साथ करायला तयार नव्हते. नेहमीप्रमाणे गंधर्व त्यांचं प्रसिद्ध

नाट्यसंगीत सादर करत होते पण गाणं रंगत नव्हतं, तिरखवाँ शेवटच्या रांगेत बसले होते. त्यांना राहवेना, ते उठून सरळ स्टेजजवळ गेले व तिथल्या तबलजीला बोलले, ''चलो हटो ये तुमसे नहीं होगा.'' तिरखवाँ वाजवायला बसले आणि लगेच गाण्याला रंग चढला. किती मोठा हा नाट्यसंगीत गाणारा आणि किती मोठा हा तबलानवाझ! १५ जुलै १९६७ साली त्यांच्या नाट्यसंगीतावर कायमचा पडदा पडला व नाट्यसंगीताचा हा महान बादशाह कालवश झाला. प्रसिद्ध लेखक ग.दि. माडगूळकर यांनी कोठेतरी मार्मिकपणे म्हटल आहे ''असा बालगंधर्व पुन्हा होणे नाही.''

रामचंद्र कुंदघोळकर सौंशी उर्फ सवाई गंधर्व हे महाराष्ट्राचे दुसरे गंधर्व होऊन गेले. त्यांचा जन्म कर्नाटकमध्ये धारवाडच्या जवळ कुंदघोळ गावी १९ जानेवारी १८८६ साली झाला. वडिलांनी त्यांना शालेय शिक्षण देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण त्यांचा कल शाळेत जाण्यापेक्षा गाण्याकडे जास्त होता. शेवटी वडिलांचा नाईलाज होऊन त्यांनी छोट्या सवाईला बळवंतराव कोल्हटकरांच्याकडे तालमीला पाठवलं. बळवंतरावानी सवाईंना धृपद, तराणे असे काही शास्त्रोक्त गाण्याचे प्रकार शिकवले व काही ताल पक्के करून घेतले. १८९८ साली बळवंतरावांचा मृत्यू झाल्यामुळे सवाईंची तालीम अपूर्ण राहिली. एका अर्थी हा सुयोग होता, कारण छोटे सवाई हुबळीमध्ये नाटक पाहता पाहता, एकदा त्यांना किराणा घराण्याचे प्रसिद्ध गवई खांसाहेब अब्दुल करीम खानचं गाणं ऐकण्याची संधी चालून आली, कारण त्या काळात खानसाहेब कर्नाटकात पुष्कळ जलसे करत असत. ते सवाईंच्या वडिलांचे मालक रंगनगौडा नडीगार यांच्याकडे राहत असत. खानसाहेबांनी छोट्या सवाईंना 'जमुना के तीर' ही त्यांची भैरवी रागातली प्रसिद्ध ठुमरी गुणगुणताना ऐकली. तेव्हा ते म्हणाले, ''कौन है ये लडका? गला अच्छा है'' रंगनगौडांनी संधी साधली व म्हणाले ''ये हमारे यहा काम करनेवाले का लडका है।'' खांसाहेब बोलले ''ये बात है तो चलो हमारे साथ'' ही घटना १९०१ साली घडली. पण खानसाहेब शिस्तप्रिय होते, त्यांनी सवाईंना आठ वर्षाच्या करारात बांधून घेतलं. पण सवाईंचा कल नाट्यसंगीताकडे तेवढाच असल्यामुळे त्यांची तालीम अर्धवट राहिली. शास्त्रीय संगीताला इथे दुय्यम जागा मिळाली पण नाट्यसंगीताला एक नवा गंधर्व प्राप्त झाला. त्यांनी प्रसिद्ध पेटीवादक व शास्त्रीय संगाताचे गाढे विद्वान गोविंदराव टेंबे यांच्या शिवराज नाटक मंडळीत पदार्पण केलं. बालगंधर्वांचे ते समकालीन होते व त्यांनी अनेक स्त्रीपात्रांच्या भूमिका केल्या. संबंध महाराष्ट्रात त्यांच्या भूमिका एवढ्या रंगल्या की त्यांना शेवटी 'सवाई गंधर्व' ही उपाधी प्राप्त झाली. १९४२ साली वयाच्या ५६व्या वर्षी त्यांना अर्धांग वायूचा झटका आल्यामुळे त्यांनी नाट्यसंगीताला रामराम ठोकून शास्त्रीय संगीत शिकवायला सुरुवात केली. या काळात त्यांनी गंगुबाई हंगल, फिरोझ दस्तूर व भीमसेन जोशी यासारखे निष्णात गवई तयार केले. हे शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात किती महान कार्य आहे हे सांगायला नको. परंतु या तिघा गाणाऱ्यांनी नाट्यगीतंसुद्धा तेवढ्याच तयारीने अनेकदा सादर केली आहेत. भीमसेन जोशींनी गोपालकृष्ण भोबेनच्या 'हे बंध रेशमाचे' ह्या नाटकातल्या गाण्यांना चाली दिल्या आहेत. सवाई गंधर्वांनी १९५२ साली जगाचा निरोप घेतला पण त्यांच्या पश्चात पं. भीमसेन जोशींनी पुण्याच्या सवाई गंधर्व संगीत महोत्सव द्वारे त्यांची स्मृती जागृत ठेवली आहे.

महाराष्ट्रातले तिसरे गंधर्व सौदागर नागनाथ गोरे उर्फ छोटा गंधर्व होत. त्यांचा जन्म १८ मार्च १९१८ साली कोरेगाव, सातारा इथे झाला. अगदी लहान वयातसुद्धा त्यांच्या अवर्णीय गोड आवाजाने लोकांच्या मनाची लवकरच पकड घेतली. दामुअण्णा जोशी यांच्या बालमोहन नाटकमंडळीत ते भूमिका करत असताना, ते त्यांना आवडीने छोटा गंधर्व म्हणू लागले. त्यावेळी, प्रथम दत्तूबुवा बागलकोट, नंतर नरहरबुवा पाटणकर. सवाई गंधर्व, भुर्जीखा व पतियाळा घराण्याचे शेंडे खान यांच्याकडून शास्त्रीय संगीताची उत्तम तालीम लाभली. सुरुवातीला ते स्त्रीपात्रांच्या भूमिका करत होते पण १९३४ पासून त्यांचा आवाज फुटल्याने ते पुरुषपात्रांच्या भूमिकेत चमकू लागले. प्रल्हाद केशव अत्रे या प्रसिद्ध नाटककारांच्या 'घराबाहेर' (१९३४), 'उद्याचा संसार' (१९३६) व 'लग्नाची बेडी' (१९३६) या नाटकात त्यांच्या भूमिका चांगल्याच रंगल्या. १९४०-४५ नंतर बालगंधर्वांचं गाणं जसं ओसरत गेलं तसं छोटा गंधर्वांचा नाट्यक्षेत्रात ठसा उमटायला लागला. ना. ग. जोशी लिखित 'देवमाणूस' हे त्यांचं नाटक विशेष गाजलं, कारण त्यांनी स्वत: लिहिलेली गाणी 'दिलरुबा मधुर हा दिलाचा', 'चांद माझा हा हासरा', 'सुखवी तया संसारा' व 'छळ जिवा दैव गती' यांनी लोकप्रियतेचा जणूकाय कळस गाठला. ते इथे थांबले नाहीत, 'मानापमान', 'सौभद्र', 'मृच्छकटिक' व 'संशयकल्लोळ' या नाटकांत प्रमुख भूमिका करून मराठी रंगमंच १९४३ ते १९७८ गाजवला.

१९४९ साली त्यांची 'कला विकास मंडळी' नाट्य संस्था बंद पडली पण त्यांनी १९५७ साली पुन्हा एकदा 'छोटा गंधर्व मंडळी' नावाने संस्था स्थापन करून 'विद्याहरण' व 'मृच्छकटिक' ही नाटकं उभी केली. तसंच १९६० साली त्यांनी 'सुवर्णतुला' या नाटकाचं संगीत दिग्दर्शन केलं. पण ते इथेच थांबले नाहीत त्यांनी 'रंगल्या रात्री अशा', 'पठ्ठे बापूराव' व 'पुढारी' बोलपटात पार्श्वगायन केलं. १९७८ साली त्यांनी रंगमचाला कायमचा रामराम म्हटल्यानंतर शास्त्रीय संगीताला आपलं उर्वरित आयुष्य व्हायल व त्यांनी काही राग तयार केले. या काळात भारत गायन समाज व बालगंधर्व रसिक मंडळ या संस्थेशी ते निगडित होते. 'विष्णुदास भावे'(१९८०), 'संगीत नाटक अकादमी' व 'महाराष्ट्र गौरव' (१९९०) असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. बालगंधर्वानंतर अद्वितीय गोड गळ्याचे नाट्यगीत गाणारे हे संगीतरत्न १९९७ साली निखळून पडलं. नाट्यसंगीताच्या संदर्भात ६०व्या मराठी नाट्यसंमेलनात अध्यक्षपदी त्यांचे उद्‌गार लक्षात ठेवण्यासारखे

आहेत. ''गाणं, मग ते नाटकातलं असो की कोणतही असो, ते गोडच असायला पाहिजे. जे गोड नाही ते गाणेच नाही. जशी साखर ही गोडच पाहिजे तरच तिला साखर ही संज्ञा प्राप्त होते. मुखाशी आणि कानाशी ज्या गोष्टींचा संबंध येतो त्या गोष्टी गोडच हव्यात.''

महाराष्ट्राचे चौथे गंधर्व कुमार गंधर्व होते. त्यांचा जन्म कर्नाटकात बेळगावी एका लिंगायत कुटुंबात ८ एप्रिल १९२४ साली जरी झाला तरी त्यांचं शास्त्रीय संगीताचं शिक्षण मुंबईत संगीत-तज्ज्ञ बी. आर. देवधर यांच्याकडे व नंतरची प्रसिद्धी महाराष्ट्रात झाली. त्यामुळे महाराष्ट्राचे ते चौथे लाडके गंधर्व म्हणायला हरकत नाही. त्यांचा विवाह १९४७ ला भानुमतीशी झाला, पण कालांतराने त्यांना क्षयाने ग्रासलं, म्हणून प्रकृतीसाठी त्यांना इंदूरमध्ये देवास येथे हलवण्यात आलं. १९५२ पर्यंत ते आजारातून उठले पण या काळात त्यांनी शास्त्रीय संगीतावर बरंच चिंतन केलं किंबहुना त्यांनी शास्त्रीय संगीताला एक निराळं अंग दिलं, 'गांधी मल्हार'सारखे कांही राग निर्माण केले. शास्त्रीय संगीताकडे त्यांनी त्यांच्या पिढीला अगदी अपारंपरिक नजरेने बघायला शिकवलं. त्यांचे गुरू देवधर व नावाजलेल्या गायिका मोगुबाई कुर्डीकर यांनी कुमारांच्या गायकीला आक्षेप घेतला होता. कदाचित कुमारांच्या प्रकृतीमुळे ते तुटकतुटक कमी श्वासाचे व पुन्हापुन्हा तीच ती वाक्य व शब्द त्यांच्या गाण्यात वापरायचे. त्यामुळे त्यांचं गाणं पुष्कळांना रुजायचं नाही व आक्षेपार्ह वाटायचं. कारण ते परंपरेच्या विरुद्ध होतं. त्यांचं कार्य मराठी नाट्यसंगीताच्या क्षेत्रात मर्यादित होतं, पण ते लहानपणी बालगंधर्वांची हुबेहूब नक्कल करायचे व नंतरच्या आयुष्यात 'मला भावलेले बालगंधर्व' अशा काही नावाखाली कार्यक्रम सादर करायचे. त्यांनी भक्तिसंगीतात बरंच भरीव कार्य केलं असं म्हणावं लागेल. पण या लेखात त्याचा उल्लेख करणं उचित होणार नाही कारण हा लेख नाट्यसंगीताबद्दल आहे. असो ते एक थोर गायक होते, त्यांचं निधन १२ जानेवारी १९९२ साली झालं. त्यांचं वाक्य सांगून हा लेख संपवतो ''संगीतापासून होणारा आनंद हा उच्च कोटीचा आनंद आहे. तो तृप्ती देणारा आनंद आहे. तो आनंद फक्त आनंदच आहे अन्य काही नाही. आनंदाचे डोही आनंदतरंग. असा हा आनंद साक्षात ईश्वराचेच स्वरूप मानलेला आहे.'' - कुमार गंधर्व.

– पं. सुजन राणे
Plainsboro, NJ.
Tel.: +1 609 213 4421
panditsujanrane@gmail.com

ग्रंथाली

रमेश पुरुषोत्तम कुलकर्णी लिखित



समर्थ व्यवस्थापन

दासबोधाचा व्यापक अर्थ जाणून घेण्यासाठी समर्थ व्यवस्थापन अवश्य वाचा.

मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.

अमेरिकेत 'मराठी' म्हणून वाढताना...

माधवी सबनीस

अमेरिकेत महाराष्ट्रीयन कुटुंबात पालनपोषण होणे आतापर्यंत तरी माझ्यासाठी तसे मनोरंजक आणि समाधानकारकच ठरले आहे. मराठी समजू आणि बोलू शकणारी भारतीय अमेरिकन असणे कधी कधी खूप कठीण आणि वैफल्याची भावना देणारे वाटू शकते पण याबाबतीत माझ्यातरी संमिश्र भावना आहेत. मागे वळून पाहताना मी ठामपणे म्हणू शकते की मी माझ्या मराठी परंपरेचा कधीच सौदा करणार नाही आणि मला नेहमीच त्याबद्दल अभिमान राहील.

त्याकाळात माझा मोठा भाऊ जे बोलेल ते ऐकून त्याच्या पाठोपाठ तसेच बोलून किंवा माझ्या आईवडिलांशी बोलून, मी मराठी शिकायचे. ते काही सोपे नव्हते आणि अजूनही कधी कधी माझे उच्चार थोडे चुकतात पण तरीही तेव्हापासून आतापर्यंत मी मराठीचा बराच मोठा पल्ला गाठला आहे!

मराठी माझी दुसरी भाषा होती आणि आमच्या भारतभेटीत आजी-आजोबा आणि इतर नातेवाईकांबरोबर मराठीत संभाषण करता यायला हवे म्हणून आम्ही मुलांनी मराठी शिकले पाहिजे असा घरातून आग्रह असायचा. याबाबतीत माझ्या आईवडिलांनी, आम्ही आमच्या जवळच्या नातेवाईकांपासून दुरावू नये आणि मराठी संस्कृती जपावी म्हणून दरवर्षी नाताळच्या सुट्टीत भारतात येण्याचा प्रघात ठेवून महत्त्वाची भूमिका बजावली. माझा हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी माझ्या मराठी परंपरेची मी काही उदाहरणे देते.

मी जेव्हा मेरीलँडच्या 'बॅरी स्कूल'मध्ये जायला लागले, तेव्हा माझे डॅडी मी कपाळावर 'टिकली' लावण्याच्या बाबतीत आग्रह करायचे. त्यांचे असे म्हणणे असायचे, की ती आपली भारतीय संस्कृती आहे आणि आईसारखीच मीही ती जपली पाहिजे. माझी 'टिकली' हा माझ्या शाळेतील शिक्षक, सहाध्यायी आणि इतरांसाठी नवीन अनुभव होता. मी जसजशी मोठी होत गेले, तसतसा माझा 'टिकली'चा वापर कमीकमी होत गेला. यामागची कारण, ती (टिकली) कशासाठी प्रतिनिधित्व करते यापेक्षाही कालांतराने त्याबद्दल नेहमीच त्रासदायक वाटणाऱ्या शेरेबाजी किंवा प्रश्नांचा सामना करणे, ही होती.

'बॅरी स्कूल'च्या काळात भारतीय संस्कृती आणि परंपरा याबद्दल शिकताना शिक्षक आणि सहाध्यायी मार्गदर्शनासाठी माझ्याकडे यायचे. त्यांचे प्रश्न मी स्वत: सोडवण्याचा प्रयत्न करायचे किंवा अतिरिक्त माहितीसाठी आई-वडिलांची मदत घ्यायचे. यामुळे शाळेतील माझा भाव वधारला होता! 'बॅरी' तशी लहान शाळा होती आणि वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणारे माझे आई-वडील तिथे इतर भारतीय क्रियाकल्पांसाठीचे (ॲक्टिविटी) सल्लागारही होते. एके वर्षी तर आम्ही शाळेतील मुलांबरोबर भाऊबीजेसकट दिवाळीही साजरी केली होती. माझ्या वर्गातील मुलींचे भारतीय साडीबद्दलचे कुतूहल वाढले होते! ४ ते ६ वर्ष वयोगटातील मुलींसाठी माझ्या आईने तिच्या एका साडीतून छोट्या छोट्या साड्या तयार करून त्या मुलींनाही साडी नेसवली होती!

माझ्यातील मराठी संस्कृतीच्या अजून एका महत्त्वाच्या मुद्याबद्दल मला निश्चितच सांगितले पाहिजे. भारतीय परंपरेनुसार मुली केस लांब ठेवतात आणि त्यांची योग्य ती निगा राखली तर ते छानही दिसतात. आमच्या पारंपरिक भारतीय घरात, माझ्या बाबांना, मी लांब केस ठेवलेले आवडायचे आणि त्यांची निगा राखण्यासाठी खूप कष्ट घेऊन मदतही करायचे. सकाळी आई इतर घरकामात व्यस्त असायची तेव्हा डॅडी मला आणि राहुलदादाला शाळेत जाण्यासाठी तयार करायचे. माझ्याबाबतीत तर त्यांना माझ्या केसांचीही काळजी घ्यावी लागायची. मी लहान होते तेव्हा ते पोनीटेल घालून द्यायचे आणि मोठी झाल्यावर छान वेण्या घालून द्यायचे! असे आता जुनी छायाचित्रे बघितल्यावर कळते. अगदी माझे शालेय शिक्षण संपेपर्यंत त्यांनी माझ्या वेण्या घालून दिल्या. मला त्यांच्याकडून वेण्या घालून घ्यायची सवय झाली होती. परंतु पुढे त्यांना ते जमले नसते म्हणून त्यांना मला माझ्या हाताने वेणी घालायला शिकवले. अर्थात त्यावेळेपर्यंत माझी तयारी झाली होती. मला न दुखवता माझ्या वेण्या घालण्याचे त्यांचे कसब मात्र मी आनंदाने उपभोगले आहे. त्याबाबतीत कुणीही त्यांच्या जवळपास येऊ शकले नाही. माझे गुढघ्यापर्यंत लांब असलेले केस मी बराच काळ जतन केले पण नंतर एका सेवाभावी संस्थेला ते दान केले. आता मी माझ्या आखूड केसांवर खुश आहे, पण त्यांची काळजी घ्यायला माझे डॅडी मदतीला असते तर मला खूप आनंद झाला असता. डॅडी केसांच्या निगेबाबत खूप जागरूक असतात. आम्ही आता नॉर्थ कॅरोलिनामध्ये राहतो. तिथे पण लहान मुलांसाठी असलेल्या सलूनमध्ये त्यांनी माझ्या एक वर्षाच्या मुलाला म्हणजे

रेयांशला प्रथम नेले आणि त्याचे केस कापून घेतले. आता त्याची केस कापण्याबद्दल काही तक्रार नाही. मला असे वाटते की अनेक बाबतीत डॅडी आणि आमच्यात एक विशेष बंध आहे, जो मी आणि राहुलदादा लहान असताना त्यांच्याबरोबर अनेक गोष्टी एकत्र केल्यामुळे तयार झाला आहे.

एकदा माझ्या भावाला भेटायला मी न्यूयॉर्कला गेले असताना टॅक्सीभाडे देताना माझ्या मराठी भाषेचा मला फायदा झाला होता. त्याचे असे झाले, स्टेशनवरून मी टॅक्सी केली आणि आमची भेटण्याची जागा ठरलेल्या उपहारगृहाकडे निघाले. तो भारतीय टॅक्सीचालक पन्नाशी ओलांडलेला होता. मी त्याला कुठे जायचे ते सांगितले आणि माझ्या आईला फोन करून मराठीत सांगितले की मी न्यूयॉर्कला सुरक्षितपणे पोचले आहे आणि दादाला भेटायला निघाले आहे. मराठी जाणणारा आणि बोलणारा ग्राहक भेटल्याने टॅक्सी चालकाला खूप आनंद झाला आणि त्याने माझ्याशी मराठीत बोलायला सुरुवात केली. 'माझे मराठी उत्तम आहे' असे त्याला वाटले आणि त्याचे ते कौतुक माझ्या मनाला स्पर्शून गेले. उरलेल्या पूर्ण प्रवासात आम्ही मराठीतूनच संभाषण केले. आम्ही उपहारगृहाजवळ पोचल्यावर मी चालकाला भाडे किती झाले याची विचारणा केल्यावर त्याने माझ्याकडून भाडे घेण्याचे नाकारले. अर्थात त्याला भरपूर टीप दिल्यावरच मला बरे वाटले. मी उपहारगृहात नीट पोचेपर्यंत तो तिथेच उभा राहिला होता.

भारतातील टेक्निकल टीम बरोबर संपर्कात राहून आमच्या ग्राहकांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी मदत करणे हा माझ्या कामाचा एक भाग आहे. अशा वेळी आमचे मुख्य संपर्क अधिकारी श्री. चेतन पाटील यांच्याशी मराठीत बोलणे सोपे पडते. याचबरोबर Quick-n-EZ Language (IndiSoft या कंपनीची दुय्यम/सहाय्यक कंपनी) ची मार्केटिंग डायरेक्टर म्हणून, मराठी शाळा आणि सांस्कृतिक संस्थांना मराठी भाषेतील उत्पादने विकतानाही माझ्या मराठीच्या ज्ञानाचा मला फायदा होतो.

कोलंबिया, मेरीलँडमधील 'कलाब्रेशन' या नाट्यसंस्थेच्या प्रशासन विभागाची मी उपसंचालक आहे. ज्यांना इच्छा आणि आवड आहे अशा मराठी समाजाच्या तरुण पिढीत जागरूकता आणि प्रतिभा निर्माण करणे हा आमच्या या संस्थेचा मुख्य हेतू आहे. ही संस्था प्रतिभावान मराठी अभिनेते-अभिनेत्री यांचा सहभाग असलेली मराठी नाटके सादर करते. मी कम्युनिकेशनमधील कलाशाखेची पदवीधर असल्यामुळे आणि त्यानंतर ABC-TV वर कामाचा अनुभव घेतल्याने अभिनय, सादरीकरण आणि कार्यक्रमांच्या निर्मितीची पार्श्वभूमी मला लाभली आहे. मी जेव्हा या संस्थेत दाखल झाले तेव्हा माझ्या मराठीवरील प्रभुत्वामुळे सगळ्यांना माझा जन्म भारतात झालेला असून मी नंतर अमेरिकेत स्थायिक झाले आहे, असे वाटले होते. मी अमेरिकेतच जन्मले आणि वाढले आहे, हे कळल्यावर त्यांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला.

आमच्या घरात, मी आणि माझे पती चैतन्य रांगणेकर किंवा आम्ही दोघं आणि आमचा मुलगा रेयांश यांत दररोज मराठीत बोलतो. महाराष्ट्रीयन कुटुंबात लग्न होणे आणि माझ्या सासू-सासऱ्यांबरोबर मराठीत संवाद साधणे जसे आव्हानात्मक आहे, पण त्याचबरोबर वरदानही आहे कारण त्यांच्याशी सतत मराठीत बोलण्याने माझे मराठीवरचे प्रभुत्व वाढले आहे. एकच संस्कृती असलेल्या पण वेगळ्या देशातील सुनेची भूमिका निभावताना त्यांना दिलेल्या दिलासाचे मलाही समाधान आहे.

मागे वळून पाहताना मला असे वाटते की, अमेरिकेत 'भारतीय अमेरिकन' म्हणून वावरताना माझी मराठी भाषेवरची पकड माझ्यासाठी वरदानच ठरली आहे. मला हे सांगताना अतिशय अभिमान वाटतो, की ही भाषा मी रेयांशपर्यंत पोहोचवण्यात यशस्वी ठरली आहे, असं मला वाटतं.

मूळ इंग्रजी लेख
माधवी सबनीस
Cary, N.C.
sabnister@gmail.com
अनुवाद - **डॉ. सरिता विनय भावे**
मुंबई

ग्रंथाली

वाटेवरले दिवे

नीला उल्हास चांदोरकर



मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

दासबोधातील ''जे जे आपणासी ठावे ते ते इतरांसी सांगावे शहाणे करोनी सोडावे सकळजन'' या शिकवीणप्रमाणे हे पुस्तक म्हणजे विचारधन आहे. हे एका पिढीतून दुसऱ्या व तिसऱ्या पिढीत वाटावे म्हणून लेखिकेने पुस्तक प्रपंच केला आहे ते कौतुकास पात्र आहे. खरोखर आयुष्याची वाट चालताना आपल्याला प्रकाश देणारे हे पुस्तकाचे पान पान उजळणारे दिवेच आहेत.

- डॉ. स्नेहलता देशमुख
माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

अंकोर वट

सुधीर शं. कुलकर्णी

कंबोडिया (कंबोज) देशातील अंकोर वट (स्थानिक भाषेत 'नगर मंदिर') हे जगातील आकाराने मोठे धार्मिक स्थळ आहे. ह्या विस्तृत ठिकाणाचे क्षेत्रफळ आहे १६२.६ हेक्टर (४०१.६ एकर). सियेम रीप (Siem Reap) शहरापासून उत्तरेला सहा किलोमीटर (४ मैल) वर हा मंदिर परिसर आहे. १२व्या शतकाच्या पूर्वार्धात खमेर सम्राट दुसरा सूर्यवर्मन याने मंदिराच्या बांधकामाला सुरुवात केली. त्याने राज्याचे मंदिर म्हणून उभारणीला सुरुवात केली परंतु त्याच्या मृत्युनंतर हे त्याच्या समाधीचे स्थळ बनले.

सूर्यवर्मनच्या मृत्युनंतर मंदिराचे बांधकाम थांबल्याने काही उठावाचे शिल्पकाम (Bas-Reliefs) अपूर्ण राहिल्याचे दिसून येते. त्यानंतर २७ वर्षांनी (सन ११७७ मध्ये) चाम (Cham) समूहाने – जे ख्मेर जमातीचे कट्टर शत्रू होते – अंकोर लुटले. नवीन राजा सातवा नयवर्णनने साम्राज्याची पुनर्उभारणी करून नवीन राजधानी म्हणून जवळच अंकोर थोम (Angkor Thom) आणि राज्यमंदिर म्हणून बयोनमंदिर स्थापन केले तसेच अंकोर वट मंदिराचे बांधकाम परत सुरू केले. मंदिर परिसराच्या कामाला सुमारे ३० वर्षे लागली.

ख्मेर साम्राज्याचे आधीचे राजे शैव होते परंतु सूर्यवर्मनने ती प्रथा मोडून हे मंदिर विष्णूला वाहिलेले आहे. नंतर १३व्या शतकाच्या सुरुवातीला ह्याचे रुपांतर बुद्ध मंदिरामध्ये झाले. अंकोर वट कंबोडिया देशाचे प्रतीक किंवा मानचिन्ह बनले आहे. आज त्यांच्या राष्ट्रीय ध्वजावर अंकोर वटाचे चित्र दिमाखाने फडफडत आहे.

सन १५८६ मध्ये मंदिराला भेट देणारा पहिला युरोपीय होता पोर्तुगीज पाद्री, मॅडलेना. (Madalena) त्याने लिहून ठेवले आहे की, ''असामान्य बांधकामाचे वर्णन मी शब्दात करू शकत नाही.'' नंतर १८६० साली फ्रेंच संशोधक, माऊहॉट (Mouhot) हा फुलपाखरांच्या संशोधनासाठी कंबोडियात आला. स्थानिकांनी त्याला मंदिराबद्दल माहिती दिली. त्याने आपल्या प्रवासी लेखांद्वारे अंकोर वटला जगभर प्रसिद्धी दिली. त्याने नोंद केली, ''ह्यातील एक मंदिर पुराण्या मायकेल एंजलने उभारणी केल्यासारखे वाटते. असे मंदिर बांधकाम बघितल्यावर आपल्याकडील ग्रीक व रोमन इमारती फिक्या वाटतात.''

अंकोर वटमध्ये दोन प्रकारच्या ख्मेर मंदिर वास्तुकला मिळतात. एक म्हणजे पर्वतातील मंदिर व दुसरे म्हणजे मंदिराभोवतीच्या सज्जावरील (गॅलरी) कलाकुसर. मंदिराची रचना अशाप्रकारे केली आहे की ते देवांचे निवासस्थान, मेरू पर्वतासारखे वाटले पाहिजे. दुरुन बघितल्यावर प्रचंड दगडांची रास पडलेली वाटते परंतु त्याकडे जाणाऱ्या पायरस्त्यावरून जवळ गेल्यावर आपला भ्रमनिरास होतो. तिथली निरनिराळ्या उंचीवरील आच्छादित सज्जे, द्वारमंडपे व दालने नजरेस पडतात व त्या अज्ञात शिल्पकारांच्या स्तुतीसाठी शब्द अपुरे पडतात.

मंदिराभोवतीचा खंदक १९०मी (६२० फूट) रुंद असून त्या बाहेरची भिंत सुमारे ३.६ किमी (२.२ मैल) लांब आहे. आणि त्यात तीन आयताकृति मजले (खालचा आकाराने मोठा व त्यावरील त्यापेक्षा लहान) एकावर एक बांधलेले आहेत. पहिल्या दोन मजल्यांवर आच्छादित सज्जे व स्तंभ दिसतात. मंदिराच्या तिसऱ्या मजल्याच्या मध्यभागी पाच गोपुरे आहेत. बाहेरच्या चार गोपुरांचा चौकोन होऊन मध्यभागी पाचवे गोपूर उभारलेले आहे. (अशा भूमिती रचनेला Quincunx म्हणतात.) ही पाच गोपूरे, पेरू पर्वतांच्या शिखरांचे प्रतीक आहेत. तसेच बाहेरची भिंत म्हणजे भोवतालचे डोंगर आणि खंदक म्हणजे त्यापलिकडचे समुद्र! मधल्या गोपूराची उंची जमिनीपासून २१३ मी (७०० फूट) भरते. त्यातील मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यांची चढण उभी आहे. स्वर्गात जाण्याची वाट किती कठीण असते हे त्या पायऱ्या म्हणजे प्रतीक असावे.

अंकोर वट इतर ख्मेर मंदिरांपेक्षा थोडे वेगळे दिसून येते. मंदिराचे तोंड पूर्वेला नसून पश्चिममुखी आहे. काहींच्या मते ह्याचे कारण दुसरा सूर्यवर्मनचा इरादा होता स्मशान मंदिर म्हणून बनवण्याचा. ह्याचा पुरावा म्हणजे उठावाचे शिल्पकाम डावीकडून उजवीकडे केलेले दिसून येते. हिंदू धर्मातील 'प्रसव्य' म्हणजे मयताचे धार्मिक विधी, नेहमीप्रमाणे न करता, उलट्या दिशेने करतात. तर काही जणांचे म्हणणे आहे की मंदिर हे प्रथम विष्णूला वाहिलेले असल्याने पश्चिम ही विष्णूची दिशा मानली जाते. ३५० मीटर (११५० फूट) लांबीचा बांधावरील रस्ता (कॉजवे) शहर व पश्चिमेकडील गोपुराला जोडतो. त्याच्या दोन्ही बाजूला नागाचा कठडा आहे. मंदिर परिसरांत प्रवेश करताना दोन्ही बाजूला

वाचनालयाच्या इमारती दृष्टीस पडतात. उत्तर आणि दक्षिण बाजूची प्रवेशद्वारे रुंद (हत्ती सहज जाऊ शकेल एवढा) असल्याने त्यांना 'हत्तीद्वारे' म्हणूनही संबोधतात.

अंकोर वट हे ख्मेर वास्तुकलेचा एक उत्तम नमुना म्हणून मानले जाते. त्याला 'अंकोर वट शैली' म्हणून ओळखतात. बाराव्या शतकापर्यंत ख्मेर वास्तुशिल्पींना वाळूच्या दगडांचा, विटांपेक्षा, उपयोग करण्याबद्दल विश्वास निर्माण झालेला होता. म्हणून मंदिर सुशोभित करण्यासाठी मुख्यत: वाळूच्या दगडांचा वापर करण्यात आला. बाहेरच्या भिंतीसाठी लॅटेराईटच्या (उष्ण कटिबंधात अग्निज (Igneous) खडकापासून बनलेली चिकणमाती) विटांचा उपयोग केला गेला. दोन दगड किंवा विटांना सांधण्यासाठी राळ (Resins) तसेच चुनखडीच्या खळीचा वापर केला असा असा अंदाज आहे. दगडांचे खंड जागेवर बसवण्यासाठी हत्ती, नारळाचा काप्या, पुली व बांबू परांचीचा (Wooden Scaffolding) उपयोग करण्यात आला असावा असा कयास आहे. माऊहॉट ह्यांनी नोंद केली आहे की बहुतांशी दगडी खंडांमध्ये २.५ सें.मी. (१ इंच) व्यासाची व ३ सें.मी.(१.२ इंच) खोलीची भोके होती. काहींच्या मते भोकांचा उपयोग लोखंडी सळ्या घालून दगडे एकमेकांशी जोडण्यासाठी होता तर काही म्हणतात त्या भोकांच्या साहाय्याने दगडी खंड जागेवर बसवले जात असत.

अंकोर वट परिसरासाठी अंदाजे ६० लाख ते १ कोटी वाळूच्या दगडी खंडांचा उपयोग करण्यात आला. प्रत्येक खंडाचे सरासरी वजन भरते दीड टन (३००० पौंड) अंकोर शहरात वापरण्यात आलेल्या खंडांची संख्या संबंध इजिप्त देशातील पिरॅमिडसाठी वापण्यात आलेल्या दगडांच्या खाणी तिथून फक्त अर्धा किमी (०.३ मैल) अंतरावर होत्या. याच अंकोर वटसाठी उपयोगांत आणलेल्या खाणी तिथून ३५ किमी (२२ मैल) अंतरावर होत्या. खाणकाम मंदिर परिसरांत आणणे, त्यावर शिल्पकाम करून जागेवर बसवणे ह्यासाठी सुमारे ४००० हत्ती व ७००० गुलाम उपयोगांत आणले अशी नोंद आहे. शिल्पकामांत कौशल्य मिळवण्यासाठी शेकडो वर्षे कारागिरांना मेहनत करावी लागली असेल.

अंकोर वट तेथील विशाल सजावटीसाठी ख्यातनाम आहे. मुख्यत्वे भिंतीवरील उठावदार नक्षीच्या पट्ट्यांसाठी! त्यात हिंदू पद्यकाव्ये– रामायण आणि महाभारत – ह्यांतील भव्य दृश्ये नजरेस पडतात. पश्चिम दालनांत (Gallery) लंकेची लढाई (ज्यांत रामरावणाचा वध करतो) तसेच कुरुक्षेत्राचे युद्ध (कौरव व पांडवांची एकमेकांशी लढाई) दर्शवले आहे. पश्चिम दालनावर फक्त एक ऐतिहासिक दृश्य पहायला मिळते. त्यात हत्तीवरील दुसरा सूर्यवर्मन व त्याच्या विजयी सैन्याची मिरवणूक दृष्टीस पडते. प्रत्येकाच्या कर्मानुसार त्यांना स्वर्ग किंवा नरक मिळतो हा यमाचा न्याय कोरलेला आहे. हिंदू धर्माप्रमाणे ३७ स्वर्ग वर ३२ नरक आहेत. रेड्यावर बसलेला यम मयतांना वरचा मार्ग स्वर्गाकडे तर खालचा मार्ग नरकाकडे दाखवतो.

पूर्व दालनांत अंकोर वटातील सर्वात प्रसिद्ध उठावदार नक्षीकामाचा नमुना म्हणून 'अमृतमंथन'कडे बोट दाखवता येईल. हे दृश्य दोन भागात विभागता येईल. खालच्या भागात सामुद्री प्राणी – ख्मेर व काल्पनिक – त्या वरच्या भागांत ९२ असुर (मोठे डोळे व तुखोले शिरस्त्राण) व दुसऱ्या बाजूला ८८ देव (बदामी डोळे व वर निमुळते होणारे शिरस्त्राण). विष्णू कस्यावतारात असल्याने समुद्राच्या तळाशी असतो. त्याचा आधार घेऊन देव व असुर वासुकी सपीच्या दोरीने समुद्रमंथन करत असतात व त्यातून बाहेर पडणाऱ्या अमृताची वाट बघत असतात. (अमृतमंथनाचे दृश्य बँकॉक विमानतळाच्या लॉबीमध्येही बघायला मिळते.)

अंकोर वटमध्ये असंख्य अप्सरा आणि देवता कोरलेल्या आहेत. आतापर्यंत जवळपास १८०० देवतांच्या चेहऱ्यांची गणना झालेली आहे. अप्सरांच्या लहान प्रतिमा ३० सेंमी (१२ इंच) ते ४० सेंमी (१६ इंच) अशा आकाराच्या भिंतीवर तसेच खांबांवर बघायला मिळतात. तर मोठ्या आकाराच्या ९५ सेंमी (३७ इंच) ते ११० सेंमी (४३ इंच) देवता प्रवेश दालनापासून गोपुरावर जागोजागी कोरलेल्या आढळून येतात.

जंगलाचे आक्रमण, शेवाळे, भूकंप, यादवी युद्धाची झळ व चोऱ्या ह्या कारणांमुळे पुरातन मंदिराचे सतत नुकसान व अधोगती होत होती. त्या कारणाने आधुनिक काळांत मंदिराच्या पुन:स्थापनेसाठी प्रयत्न सुरू झाले. सन १९०८पासून मुख्य प्रयत्न मागच्या शतकाच्या साठाव्या दशकापासून सुरू करण्यात आली. १९७५ ख्मेर रूजच्या बंडामुळे कामात स्थगिती आले. त्यानंतर १९८६ ते ९२च्या दरम्यान 'ॲर्किऑलिजिकल सर्व्हे ऑफ इंडिया'च्या पुढाकाराने पुन:बांधणी सुरू झाली.

सन १९९२ मध्ये नोरोदय सिंहनूक ह्यांच्या प्रयत्नाने युनेस्कोने धोक्यात आलेले जागतिक वारसा स्थळ (पुढे हे २००४ मध्ये रद्द करण्यात आहे.) घोषित केले. अंकोर वट पर्यटकांसाठी प्रथम १९२७ मध्ये उघडण्यात आले. त्यावर्षी फक्त २००० पर्यटकांनी भेट दिली. आज कंबोडियामध्ये येणारे पर्यटक अंकोर वटला भेट दिल्याशिवाय राहत नाहीत. सन १९९३ मध्ये फक्त ५६५० पर्यटकांनी भेट दिली तर त्यांची संख्या, सन २००७ मध्ये, फुगली १० लाख. सन २०१३ मध्ये २० लाखापेक्षा जास्त पर्यटक अंकोर वटला येऊन गेले.

पर्यटकांसाठी हॉटेले, रस्ते, व इतर सोयींच्या बांधकामामुळे स्थानिक रहिवाशांच्या मूलभूत सोयींवर (पाणी, मलवाहिनी, वीज) चांगलाच ताण पडलेला आहे. तसेच पर्यटकांच्या वर्दळीमुळे मंदिर परिसराच्या स्थैर्याचाही (Stability) प्रश्न उद्‌भवतो. पर्यटनामुळे स्थानिकांवर होणाऱ्या परिणामांचा सर्वांनी विचार करणे आवश्यक ठरेल!

– सुधीर शं. कुलकर्णी
Latham, N.Y.
Tel. : +1 518 783 7179
sukul1@yahoo.com

१९८७ साली मार्च महिन्याच्या ऊन्हाळ्यात नेव्हीतील इंजिनीअरिंग पदासाठी भरतीची जाहिरात आली होती. अर्ज एप्रिल मध्येच पाठवला होता. जुलैच्या शेवटल्या आठवड्यात अर्ज स्वीकारल्याचा टपाल आला होता. नंतरची पायरी होती ती भोपाळ केंद्रातील चार दिवसांची विविध कौशल्यासाठी गुणं चाचणी.

खरं म्हणजे ७ ऑगस्टला जेव्हा आरक्षण करायला गेलो तेव्हा आपल्याला स्टेशनवर फक्त दोन मिनिटं थांबणारी पंजाब मेलच भोपाळला सोडणार हे वाचूनच छातीवर एकदम जबरदस्त दवाब आला होता. पण एकीकडे अभियंता (इंजिनीअर) बनायचं होतं. शिवाय त्यात देशासाठी नौदलात काम करता येणार ह्याचा आनंद फार. ह्या आनंदातच पंजाब मेलचं आरक्षण केलं. नंबर मिळाला 'तीन'! मनातल्या मनात म्हटलं, 'चला भाग्यदायी नंबर आहे.' सामान सांभाळत उभा रहातो... जळगाव आल्या आल्या पिसाट धावतो आणि छ/३ डब्यात शिरतो... मग मात्र जागा मिळते... छान वारा येत असतो... मस्त झोप लागते... अन् भोपाळहून गाडी हलल्यावर जाग येते... हेचं स्वप्न २५ तारखेची गाडी लागण्या आधी किती रात्री पाहिले होते.

पूर्व प्रवास

२५ तारखेला धुळ्याहून चाळीसगावला महामंडळाच्या लाल गाडीने निघालो. स्वप्नापेक्षा प्रत्यक्षात सामान खूप जास्त होतं. आता माझ्याकडे एका मोठ्या सुटकेसीशिवाय एक १५ किलोची गादी, चादर, उशी वगैरे एकत्र बांधलेलं होतं. गाडीत छान खिडकीची जागा मिळाल्याने मस्त झोप काढली. रिक्षेचे ३ रुपये वाचवावे म्हणून

झुंज

संजीव दहिवदकर

तिकीटाच्या आकड्यांचीही बेरीज करून पाहिली तेव्हा तेथे देखील दुसरा भाग्यदायी नंबर 'सात' आला. मग काय? स्वारी दोन मिनिटं जाम खुश.

तिकीट घेतल्यापासून कितीतरी वेळा.... आज पंचवीस तारीख... दुपार टळली आणि मी धुळे सोडलंय... सायंकाळी सहा पासून मी चाळीसगाव स्थानकावर हजर... सोबत सामानाचे दोन डाग... चार तास एखाद्या ध्यानस्थासारखा, शयनयान बोगीच्या थांब्यासमोरच्या लाकडी बाकावर बसायचे ठरवतो.... पण... पाणी प्यायला उठतो... काहीही झाले तरी १० वाजून १२ मिनिटांपर्यंत थांबायचे होते पण.... १० वाजत नाही तोवरच सगळं सामान उचलून गाडी लागल्याच्या थाटात फलाटावर चकरा मारतो.... आणि गाडी येते... जवळ आरक्षित तिकीट असून देखील, सवयी प्रमाणे, सामान्य (जनरल) डब्याकडे वेड्यासारखा धावतो... आणि एक मिनिट वाया घालवून, चार डब्या पल्याड कोणत्यातरी पिवळ्या पट्टेवाल्या डब्यात घुसतो... तोवर गाडी हललेली असते... डब्यातला तपासणीस (टि.सी.) खेकसतो, ''रिझर्व्हेशन बताओ...'' मी घाबरत माझे तिकीट दाखवतो... तपासणीस पुन्हा खेकसतो, ''तुम्हे पढना नही आता क्या? यह छ/३ है. बाजूवाले बोगी के बाद का सीट...'' माझी मान खाली... डोळ्यांमधील कसेबसे रोकलेले आसू.... ''जलगावं को चले जाना, अभी यही खडे रहो...'' आणि शयनयान आरक्षिलेला मी तेथे सावधान स्थितीत, वाहनतळावर न जाता, रेल्वे पूलावरच उतरलो. उतरल्यावर जाणवले की आपण जेमतेम ४० किलोचे आणि आपल्याला वहायचे आहे २५ किलोचे ओझे. जवळपास १ किलोमीटरचा रस्ता. मग काय. हनुमंताचे स्मरण करून टाकले. मोठे बोचके डोक्यावर, सुटकेस डाव्या हातात आणि लागलो मार्गाला.

८.१५ ला दोन क्रमांकाच्या फलाटावर पोहचलो आणि खरंच लाकडी बाकावर बसकण मारली. पाच मिनिटांनी उठून गाठले स्टेशन मास्तरला. डबा कोठे लागेल हे विचारले असता त्याने उजवीकडे बोट दाखवले... त्या जिन्याच्या पलीकडे. आता तो जिनाच ४०० मीटर लांब आणि त्याच्या पलीकडे डबा लागणार... विचार करत बाहेर केव्हा आलो अन् बाकड्यावर केव्हा बसलो हे कळलेच नाही. बसल्यावर लक्षात आले, त्याला आपण विचारायला हवे होते की शेवटून कितवा डबा? उठलो धडपडत अन् गेलो परत. विचारले तर तो पठ्ठ्या एकदम खवळला, 'विश्वास नाही का एकदा सांगितल्यावर?' तेव्हा 'सर', 'काका' वगैरे म्हणून त्याला शांत केले तेव्हा त्याने सांगितले शेवटून तिसरा, चौथा.

मग दहापर्यंत दोन उत्तर भारतीय भेटले, छान गप्पा मारल्या. त्यांनीही शुभकामना, भोपाळसाठी सल्ले दिले. दहा वाजले आणि मी पळालो जिन्यापलीकडे. (पळतो कसला? लंगडत, तोल सावरत गेलो खरं). तेवढ्यात धुळे-चाळीसगाव रेल्वे आली. १०:१२ ला डाव्या खांद्यावर बेडींग घेऊन, On Your March, Set. च्या स्थितीत

उभा राहिलो. रुळांवर इंजिनचा प्रखर दिवा दिसल्याने अजून थोडा पूढे सरकलो. ते जवळ आल्यावर समजले... धुळे-चाळीसगावचे इंजिन होते ते. मला काही सावरायची संधी न देता धपकन बेडींग खाली कोसळलं. फलाट कोरडा होता म्हणून निभावले. वाट पहाता पहाता, १०:२० ला पंजाब मेल एकदाची आली. मधले ते आठ मिनीटं जणू काही तास गेल्याचं भासवून गेले होते. पुन्हा नव्या उत्साहात बेडींग उचलले आणि गाडी लागल्यावर जिन्या बाहेर जायच्या ऐवजी आत पळत सुटलो. नंतर काही क्षणात चूक लक्षात आली. त्यात भर म्हणजे, ह्या गाडीला पिवळे पट्टे वाले डबे खूप होते. नेहमीच्या आपल्या एक पिवळ्या डबेवाल्या धुळे-चाळीसगाव गाडीपेक्षा येथे खूप वेगळा कारभार होता. परत उलट्या दिशेने पळालो (ह्या वेळी मात्र खरचं पळालो हं). जाम धाप लागली होती. डब्याचं दार उघडं दिसलं तेव्हा 'तिकीट रिझर्व्हेशन बिताओ'... असं ओरडणाऱ्या डब्यातील तपासणीसला न जुमानता आधी आत घुसलो.... गाडीने फलाट सोडून वेग घ्यायला सुरुवात केली होती. मग हळूच तपासणीसाला तिकीट दाखवले; नशीब माझे, योग्य डब्यात शिरलो होतो. मघासच्या गडबडीत बेडींग रिबीटचे पत्रे (कापडी पट्ट्याला छिद्रे करून पितळेची गोल चकती जी खात्या खात्यांनी गोलाकार पक्की केली असते व जिच्यात हूक जावून पट्टा लागतो) मधल्या हुका जवळच्या सैल झालेल्या पत्र्याने हातांवर बऱ्याच ठिकाणी चिरा केल्या होत्या; चिरांमधून रक्त येत होतं. आता ते जाणवायला लागलं होतं. पण करणार काय? तपासणीस त्या अगडबंब डब्यात माझा बाक पहायला गेला. मी त्याच्याच जागेवर फतकल मारली. दहा मिनिटांनी आला व मला माझ्या केबीनकडे घेऊन आला. योग्य डब्यात घुसल्याचा आनंद तेव्हा जणूकाही फार मोठी बाजी मारल्यासारखा माझ्या चेहऱ्यावर ओसांडून वाहात होता. केबीन खरंच एकदम खास, प्रशस्त होती. केबीनमधील वातावरण बघून मग आमची लज्जा उफाळून आली आणि तिनेच मग मला आयआयटीचे पुस्तक भरल्या बेडींगमधून काढायला लावले. झान पैकी लोळत लोळत मी आयआयटीचे इंग्लिशचे पेपर वाचू लागलो. आता आधीच आयआयटी, त्यात झोपून! सुज्ञाला चांगलेच कळेल आमच्या डोक्यात किती गेलं असेल. वीस मिनिटं वाचण्याचे नाटक केले मग थोडावेळ केबीनमध्ये गप्पा मारल्या. बारा वाजत आले होते. पून्हा बेडींग सोडलं, चादर काढून आयआयटी आत कोंबलं अन् मस्त ताणून दिली.

पहाटे पाचच्या सुमारास, भोपाळ निघून जाईल या भीतीने, अचानक जाग आली. बाहेर येऊन चूळ भरून हलका झालो व दाराच्या वरच्या पायरीवर बसलो. आतापर्यंत तांबडं फुटले होते. बाजूचा परिसर दिसायला लागला होता. आहाहा... काय ती दाट झाडी! पर्वत माथ्यावर चढलेली, सगळीकडे नुसती हिरवळच हिरवळ. सारं विसरून, निसर्गाची किमया बघण्यात दंग होतो. आता मनुष्यवस्तीच्या खुणा सुरू झाल्या होत्या. थोड्याच वेळात होशांगबादचे स्थानक आले होते. सहा वाजता होशांगबाद गाठून गाडीने आपला आधी गमावलेला वेळ भरून काढला होता. येथे मी ५० पैश्याचा चहा घेतला. साले इथले कप लै भारी! आपल्या दिवाळीच्या पणत्या असतात ना तशातले; फक्त जरा मोठे. चहा पिऊन झाल्यावर बिनधास्त फोडा. आहाहा... अरे काय मजा आली तो कप फोडताना! बस्स...!

दिवस १

सकाळी ७.०७ ला भोपाळ आले. गाडी पूर्ण थांबण्याआधीच खाली उतरलो आणि समोरच्याच खुर्चीवर उगाचच बसलो. जणू काही भोपाळ नगरीच्या सिंहासनावर विराजमान झाल्यासारखा! स्थानक पहात असताना त्याची तुलना मुंबईच्या स्थानकाशी होऊ लागली. मुंबईपुढे अतिशय मागासलेलं वाटत होतं. अरे प्रत्येक खांबावर टीव्ही आणि सगळे टीव्ही चालू अवस्थेत, शिवाय टीव्हीवर कार्यक्रम देखील व्यवस्थित प्रक्षेपित होत होते. काही खांबांवर तर दोन टीव्ही होते. महत्त्वाचे म्हणचे सर्व टीव्ही अगदी चालता चालता सहज पहाता येतील असे होते. घोषणा द्यायचे वेळी फक्त पडदे रिकामे (Screen Blank) व्हायचे. बसायला प्लॅस्टीकच्या खुर्च्या, संपूर्ण काचेची दारे, स्वच्छ फलाट... सारं कसं एकदम झक्कास! तेवढ्यात हमाल आला, माझं बेडींग डोक्यावर घेऊन विचारू लागला.

''किधर जाने का है साब?''

''अं? एक नंबर.''

''बाहर जाना है क्या आपको?''

''नही. नही. एक नंबर पर ही ठहरना है.''

''ट्रेन है क्या?''

''हां.''

''कौन सी?''

''नही. ट्रेन नही. पर हमें वहाँ काम है.''

तो चालू लागला. त्याच्यापाठोपाठ मी. एक नंबर फलाटावर आल्यावर त्याला सहज एखादा लॉज माहीत आहे का म्हणून विचारले तर त्याने मला सरळ लॉजमध्येच आणून सोडले. त्याची मजूरी रु. १०, लॉजचे रु. ३० मला द्यावे लागले. मग थोडी झोप काढून, अंघोळ करून, नऊ वाजता निघालो भोपाळ भ्रमंतीला. पायीच फिरत होतो. एक किलोमीटर तरी चालून झाले असेल पण अगदी निरस भागात फिरत आहोत असे वाटू लागल्याने मग एका पोलिसाला गाठले. त्याने तलाव पहायला सुचवले. अजून दीडेक किलोमीटरवर बाग लागली. खूप काही मोठी नव्हती पण एका हातात कमळ घेऊन व पाया जवळ आणखी दोन कमळं उमललेली आहेत असा लावण्यवतीचा पुतळा छान होता. तेथून मग तलावाला गेलो. तलाव फार मोठ्ठा होता. बोटींग करण्याची इच्छा झाली. तपास केला तर समजले की येथे बोटींगही करता येत होते. चार रुपये देऊन पॅडल बोट घेतली, ९.४५ ते १०.१५ पर्यंत फिरवायची ह्या बोलीवर. अर्धातास तर नुसती ऐश केली लेका मी! पण मग पायदेखील दुखू लागले. परत फिरत फिरत ११.३० वाजता रुमवर पोहोचलो. मग अण्णांना पत्र लिहून ते पोस्ट करायला व जेवणासाठी बाहेर पडलो.

जेवण मात्र काही आवडले नाही. परत रूमवर पोहचेपर्यंत १.१५ झाले होते. आता सामानाची आवरा आवर करून साधारण २.१५ला रूम सोडून भोपाळ स्थानकावरील M.C.O. च्या ऑफिस जवळ जाऊन टीव्ही पहात बसणार. गुड बाय.

हं. आता २.०५ ला रुम सोडली व ओझे घेऊन निघालो हमालासारखा. स्थानकापर्यंत पोहचेस्तोवर डावा खांदा फार भरून आला होता. येथे आधीपासूनच सहा जण बसले होते. मग मुद्दाम थोडा दूर उभा राहिलो. नंतर २.४० ला त्या सहांपैकी एक जरा मराठी चेहरा वाटणाऱ्याला विचारले

''क्या आप यहा S.S.B. के लिये आये हो?''

''हां.''

''कहां से?''

''I don't understand Hindi that much. Please speak in English.''

असा पहिलाच जोरदार बुक्का त्याने अचानक हाणला. तो पठ्ठा तामीळनाडूचा निघाला. आर. श्रीनिवास राघवन असे त्याचे नाव. मग इतरांशीही ओळख करून घेतली. दुर्दैवाने, फक्त माझ्या जवळच एवढं लटांबर होतं. बरोबर तीन वाजता बाहेर एक गाडी आली. बेडींग टपावर टाकले आणि आत चढलो. गाडी बाकी एकदम खास. आरामदायी लक्झरी बससारखी वाटत होती. सगळे येईपर्यंत ३.३० झाले. मग गाडी निघाली. दुर्दैवाने ह्या गाडीलादेखील धक्का मारून सुरू करावे लागले. त्या थोड्याशा प्रवासात भोपाळ मधील गचाळ भागाचे दर्शन झाले. Service Selection Board (S.S.B.) चे ऑफिस आले. गाडीतून उतरताना, आम्ही सर्व, त्यांनी सांगितला होता तो, भरलेला अर्ज ड्रायव्हरला देऊन खाली उतरत होतो. तेथे त्यांनी आम्हाला झकास चहा दिला. माझ्या बरोबर ४६ जण आले होते. अन पुन्हा माझ्या दुर्दैवाने त्यांच्यापैकी एकही महाराष्ट्रीयन नव्हता. एकटा मीच मराठी होतो. मग जो येईल त्याच्याशी आपले खांदेशी English! बहुतेक दिल्ली, पंजाब, जम्मू, उत्तर प्रदेश व तामीळनाडू येथले होते. आम्हा सर्वांना आता खर्च केलेल्या प्रवासाच्या तिकीटाचे पैसे परत मिळवण्यासाठीचा अर्ज भरून द्यायला लागला. सायंकाळचे सात वाजले होते. येथे कसे रहायचे, कसे वागायचे, कुठे खायचे, झोपायचे, अंघोळ करायचे वगैरे सूचना झाल्यात. मग आम्हाला आमच्या खोल्या मिळाल्यात. एका हॉल मध्ये १० जण झोपायची सोय होती. आठ वाजता जेवायला गेलो. जेवण ठीक होते. नऊला झोपलो.

दिवस २

२७ तारखेला सकाळी ५:११ ला जाग आली. उठलो, प्रातर्वीधी केला. सहा वाजता नाश्त्यासाठी कॅन्टीनमध्ये गेलो. ४ पाव, लोणी, खीर, उकडलेली अंडी आणि २५० मि.ली. दूध. नाश्ता म्हणजे माझे सकाळचे जेवणच झाले.

सात वाजता सायकोलॉजिकल टेस्ट होती म्हणून टेस्टींग हॉलमध्ये आम्ही जमलो. ५० मार्काच्या दोन लेखी परीक्षा झाल्या. ७.३० ते ८ आणि ८.१५ ते ८.४५ ह्या वेळेत. त्यांचा निकाल १०:०० ला आहे. त्यात जर पास झालो (पासिंग ६०% चं आहे) तरच पुढचे सर्व नाहीतर संजीव, गो बॅक! पण तशी वेळ येणार नाही ह्याच आशेवर दहा वाजेची वाट पहातोय. पाहू काय होते ते.

''आपण काय नापास होणाऱ्यातले आहेत का?''

हं तर आम्ही पहिली पायरी अगदी छान ओलांडली. ४७ मधून ११ जण घरी गेले. आता आम्ही ३६ राहीलो होतो. कच्चे लिंबू निघून गेले. नंतर, खरी परीक्षा आता सुरू होणार होती. निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच लगातार आणखी चार सायकोलॉजिकल टेस्टस् होत्या. पहिल्या परीक्षेत तुम्हाला एक स्लाईड दाखवली जी स्पष्ट दिसत नसेल. तुम्ही ती स्लाईड ३० सेकंद बघायची आणि नंतर ९० सेकंदात त्या पाहिलेल्या चित्रावर कथा स्वरुपात लिहायचे. चित्राचं नुसतं वर्णन केलं तर ''Zero Marks will be allotted for that description.'' आशा बारा कथा लिहिता लिहिता पूर्ण बारा वाजले (स्वतःचे आणि घड्याळात देखील). मग त्यांच्या कृपेने आम्हाला नैसर्गिक विधींसाठी तीन मिनिटांचा अवधी मिळाला.

दुसऱ्या परिक्षेत...''One word will be shown to you. You have to see that word within 15 seconds and whatever idea that comes in your mind after seeing that word, which you have to write within three seconds; in only one sentence.'' असे ते साठ शब्द आणि त्यांची ती साठ वाक्यं करता करता आमची गत साठीच्या म्हाताऱ्यासारखी झाली.

तिसरी परीक्षा- आता एक वही सारखी प्रश्नपत्रिका होती. त्यामध्ये अर्धवट सोडलेली वाक्यं होती. ते अर्धवट वाक्य वाचायचे आणि जे तुम्हाला सुचते ते लिहून वाक्यं पूर्ण करायचे. एका वाक्याला ३० सेकंदांचा वेळ. सालं वाक्य वाचता वाचताच वेळ जायचा. मग काय? फक्त ४५ वाक्यं जेमतेम खरडली. आता मात्र त्यांनी पाच मिनिटांची सुटी दिली.

मग चवथी परीक्षा. येथे म्हणे, ''Who are you?''

1. Opinion of your parents about you.
2. Opinion of your teachers about you.
3. Opinion of your friends about you.
4. Opinion of yourself about you.
5. How to use this knowledge to improve your progress.

असे पाच परिच्छेद लिहायचे. सर्व खरे आणि स्पष्ट हवे. प्रत्येक परिच्छेदाला ३ मिनिटं वेळ. बारा मिनिटांत कागद खरडून शांत बसलो. आता १.२० झाले होते. एक अधिकारी येऊन घोषणा करून गेला- '' Chest Nos. 17 to 26 are to be interviewed from 2.30 today. मी Chest No. 21.''एका तासात जेवण व तयारी करून वेटिंग रूममध्ये हजर पाहिजे. चिडचिडतच रुम गेलो, फाईल वगैरे ठेवले व मेसकडे धावलो. एवढी घाई केली तरीही १.५० झालेच. जेवणाला आलो धावत-पळत परत. मुलाखतीसाठी कपडे बदलले, छान पॉलिश केलेले बूट घातले, फाईल घेतली, उरलेलं

सामान आवरलं. घड्याळ आता २.२२ दाखवतं होते (मोठ्या चुलत भावाकडून खास भोपाळसाठी तात्पुरते मागितलेले Casio चं काळी चकती आणि काळ्या पट्टेवाले होतं ते). ऐटीत बरोबर २.२८ ला वेटींगमध्ये हजर होतो. जमलेले सर्व एकमेकाला विचारत होते– ''तुला काही ह्या मुलाखतींचा अनुभव?'', ''भोपाळ कशासाठी प्रसिद्ध?'', ''मिथेन आयसो सायनाइट''... वगैरे, वगैरे. २.३०ला १७ नंबर आत गेला.... २१ नंबर यायला ४.२५ झाले होते.

मुलाखतीसाठी आत शिरलो. दारासमोरच, साधारण १५ फूटांवर, एक टेबल होते. टेबला पलीकडे दोन अधिकारी बसले होते. अलीकडे माझ्यासाठी, दोघांचे समोर, एक रिकामी खुर्ची होती. माझ्या समोर, डाव्या बाजूला लेफ्टनंट कमांडर जोशी आणि ऊजव्या बाजूला विश्वनाथ हे हसतमुख बसले होते. त्यांना Group Testing Officers (G.T.O). म्हणतात असे समजले होते.

''May I come in Sir?'' मी.

''Oh! Yes please sit down.'' कमांडर जोशी.

''Thank you Sir.'' मी.

''Mr. Sanjeev?'' विश्वनाथ

''Ya.'' मी.

वगैरे, वगैरे बरेच.... मग हळूच....

''तुला तुझे मित्र कोणत्या नावाने हाकं मारतात?'' कमांडर जोशी.

''संजू.'' मी.

''संजीव?'' विश्वनाथ.

''अं? Ok sir.'' मी.

''वडील किती शिकले आहेत?'' कमांडर जोशी.

''S.S.C.'' मी.

''तू कोठे रहातो?'' कमांडर जोशी.

''धुळे. From Maharashtra.'' मी.

''तू महाराष्ट्रातील किती गावं पाहिली आहेस?'' कमांडर जोशी.

''पुणे, औरंगाबाद, मुंबई,...'' मी यादी संपवायच्या आधीच...

''Can you compare Dhule with urangabad?'' विश्वनाथ.

''Oh. Certainly Sir.'' मी

तुला भाऊ किती?, बहिणी किती? काय करतात? अजून असलेच काही प्रश्नोत्तरे झालीत.

मग कमांडर जोशींनी मला एक काल्पनीक प्रसंगात मी कसा वागेल हे विचारले. प्रसंग असा की–

''तू भोपाळला ६ ते ९ सिनेमाला गेला आणि ९ ला २ मिनिटे कमी असताना तुझ्या लक्षात आले की तुझ्या पुढे जी अतिसुंदर, चांगल्या घराण्यातली, सुशिक्षित, तुझ्याच वयाची, कुमारी बसली आहे (विचार करता करताच मन भरकटत होते) तिला तिच्या शेजारचा मुलगा त्रास देतोय. तर तू काय करशील?''

''त्यांचे आपापसातले नाते मला माहिती नाही, मी त्यांना ओळखत नाही, परके शहर. मी काय करणार सर? काहीच नाही. तो त्यांचा वैयक्तीक मामला समजून दुर्लक्ष करीन. त्यांच्या भानगडीत मी नाक खुपसणार नाही.'' मी.

''जर त्या मुलीने तुला तशी विनंती केली तर?'' कमांडर जोशी.

''मी तिला पोलिसांकडे जायला सांगेल. हवं तर मी तिच्यासोबत जाईन.'' मी.

''तेथे पोलिस नाही. मग?'' कमांडर जोशी.

''मी मॅनेजर कडे जाईन.'' मी.

''रात्रीचे नऊ वाजले आहेत. मॅनेजर देखील घरी गेला आहे. आता तिथे कुणीच नाही. मग?'' कमांडर जोशी.

''मी तिला तिच्या घरी सोडायला जाईन.'' मी.

''तू आणि ती बाहेर निघताच त्याने तुझी गच्ची पकडली तर?'' कमांडर जोशी.

मी मला आणि तिला सुरक्षित करण्याचा प्रयत्न करेन.'' मी.

''कसा?'' कमांडर जोशी.

''ते आता ह्या क्षणी कसं सांगणार सर? त्यावेळेस काय करेल ते unfortunately I cannot tell you at this position Sir.'' मी.

''O.K.'' कमांडर जोशी.

आता धडधडणारी छाती जाग्यावर यायला लागली होती. मुलाखत देखील संपली होती. जोशींच्या डोळ्यांमधील भावांवरून वाटतं होते की मी त्यांच्या कसोटीला उतरलो होतो. दोघांच्या परवानगीने बाहेर आलो. सहा वाजत आले होते. आजच्या मुलाखतीं मध्ये माझी मुलाखत सगळ्यात जास्त वेळ झाली होती.

दिवस ३

माझ्या ग्रुपची आज शारीरिक क्षमता गुणं चाचण्यांवर भर होता. सकाळी नाश्त्यानंतर आम्हाला मैदानावर नेण्यात आले होते. पळवणे, वजन ढकलणे, अशी बरींच कसरतीची कामे आमच्या कडून बारा वाजेपर्यंत करवून घेतली, मग जेवणासाठी थोडा वेळ. दोनपासून वैयक्तिक शारीरिक क्षमता परीक्षा होत्या.

एकूण सात अडथळे सलग तीन मिनिटांत पार करायचे होते– १. टायगर जंप – एका मोठ्या झाडाला लागलेल्या दहा फूटी शिडीवर चढून वरच्या अंगाला असलेल्या, साधारण फूटभर फळीवर दोन्ही पाय टेकवून उभे रहायचे. मग उडी मारून समोरील तीन फुटावरील दोराला लोंबकळायचे. एकदा पुढे जाऊन मागे यायचे, तसेच, फळकूटाला पाय न लावता पुन्हा पुढे जायचे आणि शिडीपासून कमीत कमी ५ फूट दूर असताना दोर सोडून जमीनीवर उडी मारायची.

२. टारझन लीप – एका सात फूटी मंचावर चढून दोन्ही पाय टेकवून उभे रहायचे. ते तुम्हाला दोर तुमच्या हातात देतात. मग दोराला धरून जोर लावून स्वतःला धक्का द्यायचा आणि मंचापासून कमीत कमी

१० फूट दूर असताना दोर सोडून जमीनीवर पाय टेकायचे. एकदा पुढे आल्यावर मागे परत जायच्या आत दोर हातातून सुटायलाच हवा.

३. मन्की क्रॉलिंग – साधारण तीस फूटावर असलेल्या दोन मोठ्या झाडांना एक आठ फूटी लाकडी ओंडका दोराच्या साहाय्याने बांधलेला, ओडक्यांच्या दोन्ही टोकाला आणि झाडाच्या बुंध्यामध्ये एकेक दोर वरील दोराला बांधलेला. डावीकडील दोरावर चढून वरच्या दोरावर, दोन्ही हातापायांनी माकडासारखे लटकून ओंडका ओलांडून उजवीकडच्या दोराने खाली उतरायचे.

4. Burma Rope - This time there are two ropes tide between two trees which are around 20 feet apart. You have ladders on each tree to go up or down and there are rope tide three feet from each tree. Your examiner may ask you for any combination of climb up ladder or climb up rope; Climb down ladder or climb down using rope. You have to walk on bottom top while holding top rope. Bottom rope is 15 feet high from ground and top rope is 20 feet high from ground. Distance to cross is minimum 12 feet between two rope joints.

5. Balancing - Roughly 20 feet half circle have three planks roughly 3 to 4 feet about ground. Planks are roughly 6 inches wide and angled around 45 degree slanting inwards; making walking on them difficult. You have to start at one end and cross all three planks without losing balance. Each plank has one end higher than other end.

6. Rope Climbing - A rope is tied to a big tree and you are required to climb up the rope at least six feet and come down. Rope thickness was lot bigger than other ropes.

7. Double Jump - There is a 5 feet deep 5 feet long swimming tank, with one feet thin wall followed by 3 feet long swimming tank. There is rope hanging in the middle of a big tank, you come from left, jump, catch the rope, swing to the tiny wall, and land on that wall with both feet, let rope go and jump across the second smaller swimming pool.

सर्व अडथळे पार केले. अगदी वेळेत आणि गाढवासारखा गाढ झोपलो रात्री.

८. टायगर जंप – एका मोठ्या झाडाला लागलेल्या दहा फूटी शिडीवर चढून वरच्या अंगाला असलेल्या, साधारण फूटभर फळी वर दोन्ही पाय टेकवून उभे रहायचे. मग उडी मारून समोरील तीन फूटावरील दोराला लोंबकळायचे. एकदा पुढे जाऊन मागे यायचे, तसेच, फळकूटाला पाय न लावता पुन्हा पुढे जायचे आणि शिडीपासून कमीत कमी ५ फूट दूर असताना दोर सोडून जमिनीवर उडी मारायची.

९. टारझन लीप – एका सात फूटी मंचावर चढून दोन्ही पाय टेकवून उभे रहायचे. ते दोर तुमच्या हातात देतात. मग दोराला धरून जोर लावून स्वतःला धक्का द्यायचा आणि मंचापासून कमीत कमी १० फूट दूर असताना दोर सोडून जमीनीवर पाय टेकायचे. एकदा पुढे आल्यावर मागे परत जायच्या आत दोर हातातून सुटायलाच हवा.

३. मन्की क्रॉलिंग – साधारण तीस फूटावर असलेल्या दोन मोठ्या झाडांना एक आठ फूटी लाकडी ओंडका दोराच्या साहाय्याने बांधलेला, ओडक्यांच्या दोन्ही टोकाला आणि झाडाच्या बुंध्यामध्ये एकेक दोर वरील दोराला बांधलेला. डावीकडील दोरावर चढून वरच्या दोरावर, दोन्ही हातापायांनी माकडासारखे लटकून ओंडका ओलांडून उजवीकडच्या दोराने खाली उतरायचे. याशिवाय Burma Rope, Balancing, Rope Climbing, Double Jump

दिवस ४

आजची सकाळ सादरीकरणाची. ऐन वेळी तुम्हाला विषय सांगण्यात येतो, त्यावर तुम्ही आधी तीन मिनिटे बोलायचे आणि नंतर इतरांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं द्यायची. आज मात्र माझे नशीब चांगले नव्हते. मला विषय आला व्हीसीआर. त्यावर सिनेमा बघता येतो ह्या पलीकडे मला व्हीसीआरबद्दल काहीच माहीत नव्हते. काहीच बोलता आले नाही. कुणी विचारल्यावर समजले की आपण त्यावर रेकॉर्ड पण करू शकतो (व्हीसीआरमधील व्ही, सी आणि आर लेटर्स कशासाठी तरी आहेत हाच एक साक्षात्कार होता. आम्ही तर व्हीसीआर हेच नाव समजत होतो).

दुपारी जेवणानंतर अंतिम निकाल जाहीर झाला. फक्त एका पंजाबी मुलाची निवड झाली होती. त्याचे खानदानच सैन्यात होते. दुपारी २.३० ला आम्ही ३५ जण भोपाळ स्थानकाकडे निघालो. गाडीत भयाण शांतता होती. कुणीच कूणाशी बोलत नव्हते. सर्व आपलल्या विश्वात हरवले होते. झालेल्या पराभवातून स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत होते. गेल्या चार दिवस दिलेल्या झुंजीचे आवलोकन करीत होते. त्याचबरोबर भविष्याचा विचार करीत होते. मी ही काही त्याला अपवाद नव्हतो.

– संजीव दहिवदकर
Columbia, MD
Tel.: +1 410 730 0667
sanjeev.dahiwadkar@indisoft.us

आमचे नाना उर्फ बालगंधर्व

जयंत कुलकर्णी

मध्यंतरी मला काही गोड, सुरेल व श्रवणीय शोध लागले. विषय होता 'नटश्रेष्ठ बालगंधर्व'. 'काखेला कळसा आणि गावाला वळसा' म्हणतात त्याचा हा उत्तम नमुना होता. नशिबाने 'शोधा म्हणजे सापडेल' अशी परिस्थिती न येता अगदी योग्य वेळी पुण्यातील सिद्धहस्त लेखिका व स्नेही सुलभा तेरणीकर माझ्या मदतीला धावून आल्या. जेव्हा सुलभाताईंनी गंधर्वांविषयीची माझी सत्यशोधकाची भूमिका व तळमळ पाहिली तेव्हा त्या म्हणाल्या, ''जयंतराव, तुम्हाला मी मागे सांगितल्याचं आठवतं का, माझ्या शाळेतील मैत्रीण, बालगंधर्व यांची नात अमेरिकेतून आली होती. ती पूर्वीची ज्योत्स्ना वाबळे व आताची सौ. ज्योत्स्ना बडवे. ही आता अमेरिकेत न्यू जर्सीला असते. नलिनीबाई व डॉ. वाबळे यांची ती कन्या. तिचा हा फोननंबर घ्या व तिला जरूर संपर्क करा. तिला आनंदच होईल.''

माझ्या दृष्टीने हा योगायोग एक दैवी चमत्कार होता. सुलभाताईंची ओळख सांगून मी ज्योत्स्नाताईना लगेच फोन केला. कधीही ऐकायला अथवा वाचायला न मिळालेल्या नानांच्या वैयक्तिक आठवणी ज्योत्स्नाताईंनी आपुलकीने सांगितल्या. माझ्याकडील बालगंधर्वांचे काही दुर्मीळ फोटो मी त्यांना भेट दिले. 'धर्मात्मा' या सिनेमातील गंधर्वांचा फोटो पाहून त्या म्हणाल्या, ''जयंतराव, नानांच्या त्या फोटोंनी मी अतिशय भारावून गेले. तुम्ही मला नानांसह माझ्या आईची आठवण करून दिली. नानांचा तोच फोटो आमच्या घरात भिंतीवर आहे. माझ्या आईचे ते दैवत होते. तसेच संगीतातील गुरूदेखील. नाना १५ जुलै १९६७ ला गेले. त्यानंतर येणाऱ्या प्रत्येक १५ तारखेला या फोटोची साग्रसंगीत पूजा करून ती भक्तिभावाने त्यांची पदे गात असे. १ फेब्रुवारी १९९५ला तिचे निधन झाले. तोपर्यंत यात कधीही खंड पडला नव्हता. हे सर्व दृश्य माझ्या डोळ्यासमोरून जात नाहीये हो.''

आजोबांच्या चेहऱ्यात साम्य असलेली बालगंधर्व यांची नात, ज्योत्स्नाताई बडवे (पं. सुजन राणे यांच्या सौजन्याने)

अगदी लहान वयात गंधर्वांची लग्नगाठ बांधली गेली होती. गंधर्वांच्या व ज्योत्स्नाताईंच्या वडिलांच्या वयामध्ये फक्त ११ वर्षाचा फरक होता. ज्योत्स्नाताईंचे वडील डॉ. भास्कर उर्फ राजाभाऊ वाबळे हे वैद्यकीय-एमबीबीएस डॉक्टर होते. डॉक्टरांच्या अनेक गुणांमुळे नाना आणि त्यांच्या नात्यात जवळीक होती. दुसऱ्या महायुद्धात डॉक्टर म्हणून ते कार्यरत होते. राजाभाऊ इंग्लंडला असताना प्रत्येक गुरुवारी न चुकता नाना त्यांना पत्र लिहीत असत. नानांना आपल्या जांवयाचा अभिमान होता. राजाभाऊ इंगलंडला असेपर्यंत गंधर्व नाटक मंडळीचा मुक्काम ज्या गावी असेल तेथील नानांच्या बिऱ्हाडी नलिनीबाई आपल्या तान्ह्या मुलाला घेऊन आई-वडिलांबरोबर रहात असत. कंपनीच्या बिऱ्हाडी पदांच्या तालमी चालत. त्याकाळी बैठकीत बसून घरातील स्त्रियांनी गाणं ऐकत बसणं हे अयोग्य समजलं जात नसे. यामुळे बैठकीच्या दरवाजामागे तासंतास उभे राहून आत चाललेलं नानांचं गाणं नलिनीताई ऐकत असत. ते ऐकता-ऐकता त्या गाणं शिकल्या होत्या. एचएमव्हीने त्यांच्या कांही रेकॉर्डस् देखील प्रकाशित केल्या होत्या. परंतु, आपल्या मुलीने व्यावसायिक गायिका बनू नये अशी नानांची इच्छा असल्यामुळे त्या रेकॉर्डस् बाजारात आल्या नाहीत. नानांना तीन मुलगे झाले होते. दुर्दैवाने तिघेही देवाघरी गेल्यामुळे चंद्रशेखर हा थोरला नातू त्यांचा जीव की प्राण होता. तो आजारी पडला की नानांचा जीव कासावीस होत असे. नाना स्वभावाने अत्यंत प्रेमळ, दिलदार, परोपकारी व कुटुंबवत्सल होते. वेळ आली तर दुसऱ्याला उचलून ते मदत करीत असत. स्वतःच्या खिशाला झळ लागली तरी त्याची पर्वा नसे. हा त्यांचा स्वभावधर्म होता. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई जर कधी छत्री न घेता उन्हात बाहेर गेल्याचं कळलं तर नाना त्वरित स्वतः छत्री घेऊन त्यांच्या मागे धावत जात. तसेच, आपल्या माणसांबद्दल अकृत्रिम जिव्हाळा, गुरुविषयी कृतज्ञता, गुरुजनांविषयी आदर व कलेची कदर करण्यातील समाधान ही सर्व नानांच्या स्वभावाची खास वैशिष्ट्ये होती.

१) राजहंस कुटुंब : ती. नाना व उजवीकडे पत्नी लक्ष्मीबाई. त्यांच्या मागे त्यांची बहीण येसूबाई देशमुख. नानाच्या बाजूला ज्योत्स्नाताईंचे वडील डॉ. भास्कर बापूराव वाबळे व आई नलिनीबाई वाबळे. आणि मावशी पद्मा राजहंस... २) तीर्थरूप नाना आपला तानपुरा छेडिताना. हा तानपुरा सध्या ज्योत्स्नाताईंच्या पुण्यातील घरी आहे ३) तीर्थरूप नानाच्या हस्ते पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरचं भूमिपूजन झालं त्यावेळी. ती. नाना व ज्योत्स्नाताईंची आई नलिनीताई व काळा कोट घातलेले वकील श्री. बापूसाहेब परांजपे. (ज्योत्स्नाताईंच्या सौजन्याने)

त्यावेळी नाना सुप्रसिद्ध तैलचित्रकार चित्रकार गणपतराव लाड (सीताकांत लाड यांचे वडील) यांना गिरगांवला भटवाडीत भेटायला जात असत. भटवाडीतील गणपतराव लाडाचं घर हे बहुतेक कलाकारांचं एक सांस्कृतिक केंद्र होतं. सुप्रसिद्ध कलाकार पृथ्वीराज कपूर हे लाड यांना ओळखत असत. ते नानांच्या गायकीचे व नाटकांचे चाहते होते. त्यांनी लाड यांना पृथ्वीराज कपूर यांची ओळख करून द्यायला सांगितली होती. नानांची ओळख झाल्यावर नानांना कळलं की, पृथ्वीराज कपूरही कलेचे उपासक आहेत. गंधर्व नाटक मंडळीच्या भरभराटीच्या काळात तीर्थरूप नानांनी त्यावेळी मुंबईतील बालीवाला हे अग्रेसर थिएटर वर्षासाठी भाड्याने घेतले होते. पृथ्वीराज कपूर यांना केवळ मदत म्हणून नानांनी त्यांना दर रविवारची सकाळ हे थिएटर वापरण्यासाठी मोफत दिलं होतं. (संदर्भ : सीताकांत लाड यांच्या स्मृति-संगीत या पुस्तकातून.) यावरून आठवलं, २ फेब्रुवारी, १९६४ मध्ये शिवाजी पार्कला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली वयाला ७५ वर्ष झाली म्हणून बालगंधर्वाचा 'अमृत महोत्सव' साजरा झाला होता. त्यावेळी भारताचे संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्राच्या राज्यपाल विजयालक्ष्मी पंडित, गोव्याचे मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर, सुप्रसिद्ध फिल्म अभिनेते शिवाजी गणेशन व पृथ्वीराज कपूर वक्ते म्हणून तेथे जाणीवपूर्वक हजर होते. या सर्वांची भाषणेही झाली होती. एकूण आठवडाभर हा 'अमृत महोत्सव' साजरा झाला होता. या 'देवाचं दर्शन' घ्यायला तेथे प्रचंड प्रमाणात रसिकांनी गर्दी केली होती. याच्या सांगता समारंभाला एकूण ५०,००० रसिक उपस्थित होते. सुवर्ण योग्य असा होता की, याच वर्षी भारत सरकारने बालगंधर्वांना 'पद्मभूषण' ह्या पुरस्काराने गौरविले होते. गंधर्वांना प्रत्यक्ष पाहण्याचं भाग्य-पुण्य त्यांच्या उत्तर वयात व माझ्या तरुण वयात मला दोनदा मिळालं होतं. एकदा आमच्या बालमोहन शाळेत आले असताना व नंतर शिवाजीपार्कला झालेल्या त्यांच्या 'अमृत महोत्सवी' समारंभात. मला चांगलं आठवतंय शिवाजी पार्कला झालेल्या कार्यक्रमात दुर्दैवाने शारीरिक परिस्थिती ठीक नसल्याने भावनाप्रधान झालेले गंधर्व म्हणाले होते की, ''रसिकहो मला माफ करा, आज माझ्याकडे बोलायला शब्द आहेत परंतु, सूर नाहीत.'' हो योगायोगाने पुढे 'प्रभात' सुरू झाल्यावर तेथे गंधर्वांनी दोन सिनेमांचा करार केला होता. पहिला चित्रपट 'धर्मात्मा' यशस्वी झाल्यावर नानांनी पुढील चित्रपट न करण्याचा निर्णय घेतला होता. रोजच्या अंघोळीसाठी थंडगार पाणी वापरणारे नाना, शूटिंगच्या वेळेला प्रखर दिव्यांची उष्णता सहन करू शकत नसत. शिवाय, सदैव समोर असणारे त्यांचे 'मायबाप'

सुप्रसिद्ध चित्रकार गोपाळराव देउसकर यांची पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरमधील बालगंधर्व यांची पुरुष व स्त्री वेषातील तैलचित्रे. (नटसम्राट बालगंधर्व यांची विविध रूपे माझे काका कै. आप्पा यांच्या संग्रहातून)

बालगंधर्व यांची भेट घेताना सुप्रसिद्ध अभिनेते शिवाजी गणेशन. (मोहन नाडकर्णी यांच्या संग्रहातून)

प्रेक्षक नसत हेही एक महत्त्वाचं कारण होतं. एकूणच काय यामुळे सिनेमा-तंत्रात नानांचा जीव घुसमटू लागला होता आणि प्रभातचे पुढील दोन चित्रपट न करण्याचा निर्णय नानांनी घेतला होता.

बालगंधर्वांचे चाहते, परिचित आणि अभ्यासक सीताकांत लाड यांनी एकेठिकाणी म्हटलंय, '१९४४ च्या एप्रिल महिन्यात मुंबईच्या चर्नीरोडजवळ सागरतीरावरील मोकळ्या नाट्यगृहात भरणाऱ्या नाट्यशताब्दी महोत्सवाच्या नेतृत्वाची अध्यक्षीय माळ महाराष्ट्रीय जनतेने बालगंधर्वांना अर्पण केली होती. त्यावेळी भटवाडीतील आपल्या दीड महिन्यांच्या वास्तव्यात गंधर्व या उत्सवी, कारकिर्दीच्या यशस्वितेसाठी अहर्निश कार्यरत होते. सौभद्रातील त्यांच्या अर्जुनाबरोबर आयुष्यात प्रथमच नायिकेचे काम करणारी हिराबाई बडोदेकरांची सुभद्रा, जुन्या वैभवी गंधर्वसंचातील 'स्वयंवर', रंगभूमीवर पहिले पदार्पण करणारी बालनटी वासंतीची 'शारदा', या साग्रसंगीत प्रयोगांच्या तालमी, संगीत कलानिधी मा. कृष्णरावांबरोबरच्या अनेक चर्चांनंतर बालगंधर्वांच्या मार्गदर्शनातच सुरू झाल्या होत्या. बोलपटांच्या आक्रमणामुळे रंगभूमीला अवकळा प्राप्त झालेली असताना या महोत्सवाने तिच्या नव्या क्रांतिखंडास आरंभ केला. मुंबईच्या संपन्न प्रतिष्ठेला शोभेशा प्रचंड थाटात तो साजरा व्हावा या कल्पनेतून हजारो प्रेक्षकांची सोय करणाऱ्या भव्य अशा खुल्या नाट्यगृहाच्या कार्यात आणि जुन्या-नव्या नाट्य प्रयोगांच्या विचारात, मुंबई साहित्य संघाचे डॉ. अ. ना. भालेराव व सहकाऱ्यांनी तहानभूक विसरून स्वतःला झोकून घेतले होते. पौराणिक-ऐतिहासिक-सामाजिक रूपांचे नवंनवे विविधांगी दर्शन रंगभूमीवर घडवू पाहणाऱ्या भरगच्च योजना आकार घेऊ लागल्या होत्या. संघाचे उत्सवी कार्यालय असलेल्या आंबेवाडीपासून बालगंधर्वांच्या निवासी भटवाडीपर्यंतचे गिरगाव कार्यकर्त्या-कलावंताच्या उत्साहात गजबजू लागले होते. या महोत्सवात आपली तब्बेत बरी नसतानाही उस्ताद अल्लादिया खांसाहेब हे गंधर्वांना ऐकण्यासाठी व नाटक पाहण्यासाठी तेथे आले होते.

सीताकांत लाड यांनी त्यावेळेचं असं वर्णन केलंय की रुक्मिणीसमोरच्या खास आसनावर खांसाहेब स्थानापन्न झाले होते. भावाबरोबरचा लाडिक संवाद आटोपता घेत रुक्मिणी रंगभूमीवर पुढे आली आणि आपली मान काही क्षण झुकती ठेवून तिने त्या 'अजब' यमनाला सुरुवात केली. 'नाथ हा माझा मोही खला', 'मम सुखाचि ठेव, देवा, तुम्हापाशी ठेवा' हा तिलककामोद गातांना उजवा हात पुढे करीत बालगंधर्व तो ठेवा खांसाहेबांकडे देत होते आणि दाद देण्यासाठी उंचावलेल्या थरथरत्या दोन्ही हातांनी नव्वद वर्षांचे खांसाहेब तो अमोल ठेवा आपल्या अंतःकरणात सामावीत होते. या अभूतपूर्व नाट्यशताब्दी महोत्सवामुळे हजारों रुपयांचा नफा झाला होता. तो सर्व नफा त्यावेळी नुकत्याच झालेल्या गोदीच्या प्रचंड स्फोटात लाखोंनी मृत्युमुखी पावलेल्या व त्यामुळे निराधार झालेल्यांच्या साहाय्य निधीला, कर्जबाजारी असूनही गंधर्वांनी दान केला होता.

पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरचं भूमिपूजन बाल गंधर्वांच्या हस्ते १९६२ साली झालं होतं. सहा वर्षांनंतर जेव्हा तेथे प्रत्यक्ष रंगमंदिर उभं राहिलं त्यावेळी मात्र दुर्दैवाने ते पाहण्याचं भाग्य बालगंधर्व यांना लाभलं नव्हतं. २६ जून १९६८ मध्ये रंगमंदिरचा उद्‌घाटन सोहळा अभूतपूर्व व दणक्यात साजरा झाला होता. पुलंनी त्या समारंभाचं संयोजन केलं होतं. एखाद्या भव्य लग्नसोहळ्यात असावं तसं उत्साहाचं वातावरण त्या सभागृहात सर्वत्र होतं. आकर्षक रंगाकृतींनी प्रवेशद्वारासमोरील भाग सुशोभित केला होता. पुण्याच्या सांस्कृतिक इतिहासातील ती एक महत्त्वाची व अभूतपूर्व घटना होती. सप्ताहभर चाललेल्या सोहळ्याची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. माननीय यशवंतराव चव्हाण यांनी श्रीफळ फोडून रंगमंदिराचं उदघाटन केलं तर मुख्य पाहुण्यांचं व प्रेक्षकांचं स्वागत पुलंनी केलं होतं.

संध्याकाळी सात वाजता उत्तरार्ध सुरू झाला होता. रंगमंचावरील भारतीय बैठकीवर स्थानापन्न झाले होते महापौर नानासाहेब गोरे, सन्मानीय उद्‌घाटक भारताचे गृहमंत्री यशवंतराव चव्हाण, महापालिका आयुक्त श्री. भुजंगराव कुलकर्णी आणि उदघाटन सोहळ्याचे संयोजक पु. ल. देशपांडे. यानंतर समारंभाची संपूर्ण माहिती देणारे आणि ज्या भाषणाची सर्व प्रेक्षक आतुरतेने वाट बघत होते ते पुलंचं संस्मरणीय व अत्यंत मनोरंजक असं भाषण

गंधर्व नाटक मंडळी.

कांही अपरिहार्य अडचणीमुळें 'किर्लोस्कर संगीत मंडळीची' अलीकडे कित्येक वर्षांचा संबंध घुटला जाऊन, संगीत नाटकाची सेवा अव्याहत पहाडी ठेवून 'गंधर्व नाटक मंडळी' या नांवाची नवी संस्था, किर्लोस्कर मंडळीतील नांवाजलेले प्रमुख गायनकुशल व अभिनयपटु नट रा. बालगंधर्व, रा. देवे रा. बोडस यांनी काढली आहे. के. रा. अण्णासाहेब किर्लोस्करांचे शाकुंतल सौभद्र, रामराज्यवियोग, रा. देवलांचे शारदा, मृच्छकटिक, शापसंभ्रम, रा. कोल्हटकरांचे मूकनायक, वीरतनय, प्रेमशोधन, मतिविकार व रा. लाडिलकरांचे मानापमान, विद्याहरण वगैरे सेट की मंडळी मुंबई येथे शनिवारचा पिरांत तारीख २३ आगष्ट १९१३ पासून करून दाखवील. मंडळीस पेढें इच्छिणाऱ्या नटांनी लायक पत्र्यावर पत्र लिहावे अगर समक्ष भेटावे.

बुधवार पेठ, डमडेरे चौक बोळ, नाव्हाची धर्मशाळा, पुणें शहर.

सेक्रेटरी,
गंधर्व नाटक मंडळी.

१) गंधर्व नाटक मंडळींचे संस्थापक बालगंधर्व व गणपतराव बोडस... २) गंधर्व नाटक मंडळीची जाहीर घोषणा.
(मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संग्रहातून) ३) पुण्यात तुळशीबागेत राममंदिरात गायनसेवा करताना गंधर्व. (संजय संत यांच्या संग्रहातून)

झालं होतं. ते भाषण ऐकून ५१ वर्षाचा काळ उलटून गेला तरी त्यातील एक वाक्य मात्र मनात आजही रुंजी घालतंय... पु. ल. म्हणले होते, ''या रंगमंदिराबाहेर एक स्त्री असूनही पुरुषांना लाजवेल असा पराक्रम गाजविणाऱ्या झांशीच्या राणीचा पुतळा आहे आणि ज्याच्या रंगभूमीवरील स्त्री भूमिकांनी व दैवी संगीतगायनाने असंख्य रसिकांना आनंद दिला त्या पुरुषाचं स्मारक हे रंगमंदिर आहे.''

दुसऱ्या दिवशी पुलंनी 'गंधर्व गीतांजली' हा अभिनव कार्यक्रम सादर केला होता. त्यात हिराबाई बडोदेकर, माणिक वर्मा, प्रभा अत्रे, नलिनीबाई वाबळे, मालती पांडे, जयमाला शलेदार, पद्मा जोगळेकर (तळवलकर), ज्योस्त्ना भोळे, वसंतराव देशपांडे, भीमसेन जोशी, सुधीर फडके, व लावणीच्या क्षेत्रात प्रतिगंधर्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुप्रसिद्ध लावणी गायिका कौसल्याबाई कोपरगावकर अशा १२ दिग्गज कलाकारांनी २४ पदे गाऊन रसिक श्रोत्यांना गंधर्वयुगात नेलं होतं.

१९५२-५३ सालापर्यंत पं. भीमसेन जोशी बहुतकरून महाराष्ट्राबाहेर असल्याने त्यांनी नानांचं एकही नाटक पाहिलं नव्हतं. अथवा नाट्यगीतंही फारशी ऐकली नव्हती. एका समारंभात काही पदं सादर करायची ठरल्यानंतर पंडितजींनी साहजिकच पुलंना विचारलं की, पदं बसवायची झाल्यास कुणाची मदत घ्यावी अथवा मिळेल असं तुम्हाला वाटतं..? त्यावर पुलंनी त्वरित ज्योत्स्नाताईंच्या आईचं नाव सुचवलं होतं. त्या गाण्यांच्या तालमी पंडिजींच्या घरी होत असत. तसेच, पु.ल. पेटीवर असत. त्या खोलीत फक्त पंडितजी, पु.ल., ज्योत्स्नाताईंची आई व ज्योत्स्नाताई असे चौघेच असायचो. ज्योत्स्नाताई आईसोबत जात असल्याने हा भाग्याचा दुर्मीळ क्षण त्यांना अनुभवायला मिळाला होता. अशाच एका खाजगी बैठकीत पुलंच्या आग्रहास्तव पुलंनी ज्योत्स्नाताईंच्या आईला 'जोहार मायबाप' हा नानांचा अभंग ऐकवायला सांगितला होता. तो अभंग ऐकतांना नानांच्या आठवणीने पुलंच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. तेव्हा, ''नलिनीताई, कार्यक्रमाच्या अखेरीस हा अभंग म्हणाल कां..?'' अशी पुलंनी विनंती केली होती. त्याप्रमाणे हा अभंग रंगमंदिरात गायला देखील होता. मात्र दुर्दैवाने या प्रसंगी सोबतीला नाना नव्हते. होते ते नाना नसल्याचं अतीव दुःख..!

श्री. बाळ चितळे यांच्या 'रंगमंदिर' या लेखातील आणखी एक उल्लेखनीय बातमी वाचनात आली ती येथे सांगावीशी वाटते. अशी होती की, नानांची कांही दुर्मीळ छायाचित्रे मिळविण्यासाठी चितळे हे मुंबईला अंजनीबाई मालपेकर यांना भेटण्यासाठी गेले होते. तेव्हा गप्पांच्या ओघात नानांच्या सौंदर्याबद्दल व गानमाधुर्याबद्दल सहज बोलणे झाले होते. त्यावेळी 'मोर जसा पिसारा घेऊन जन्माला येतो तसे बालगंधर्व गाणे घेऊन जन्माला आले होते' असं अंजनीबाई सहजपणे म्हणून गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशी चितळे पुण्याला गदिमांना भेटायला गेले होते. कारण होतं, गोपाळराव देउसकरांनी काढलेल्या नानांच्या पुरुष व स्त्रीवेषातील दोन तैलचित्राखाली चार-चार ओळींच्या दोन काव्यपंक्ती गदिमांकडून लिहून घ्यायच्या होत्या. त्यावेळी अंजनाबाई यांनी 'मोराच्या पिसाची' दिलेली उपमा चितळे यांनी गदिमांना सांगितली. त्यांनी लगेच कागद व पेन घेतलं आणि पंधरा मिनिटांत जे समोर आलं ते नानांवर रचलेलं अप्रतिम असे हे काव्य- ''जशा जन्मती तेज घेऊन तारा, जसा मोर घेऊन येतो पिसारा, तसा येई कंठात घेऊन गाणे, असा बालगंधर्व आता न होणे..! रतीचे जया रुप लावण्य लाभे, कुलस्त्री जसे हास्य ओठात शोभे, सुधेसारखा साद, स्वर्गीय गाणे, असा बालगंधर्व आता न होणे..!''

गंधर्व गेल्यानंतर जेव्हा प्रभादेवीला रवींद्र नाट्य मंदिरमध्ये श्रद्धांजली देण्याचा कार्यक्रम झाला होता तेव्हा अनेक दिग्गज गायक व इतर मंडळी निमंत्रित होती. त्यावेळी ज्योत्स्नाताईंच्या आईने, नलिनीताईंनी आपल्या गंधर्वगायकीने सर्वांवर छाप मारली होती. त्याचं कौतुक व पावती स्वतः गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकरांनी नलिनीताईंना दिली होती. हेही विशेष होतं. खुद्द त्यांचे वडील बालगंधर्व आत्मविश्वासाने म्हणत, मला शिकवायला वेळ नाही परंतु, माझं गाणं शिकायचं असेल तर माझ्या मुलीकडे गाणं शिकावं. त्याचप्रमाणे, ज्योत्स्नाताईंनाही गाण्याचं उत्तम अंग आहे. मराठीतील थोर वाचस्पती, संगीतसमीक्षक, संस्कृतचे अभ्यासक व अध्यापक तसंच संगीत विषयाचे जाणकार अशी ख्याती असलेले अरविंद मंगरूळकर (सुलभा तेरणीकर यांचे काका) यांनी एका आठवणीत सांगितलं होतं, बालगंधर्वांच्या साठीतल्या कन्येने, बैठकीकडे जाण्याआधी, खुर्चीवर हार घालून ठेवलेल्या पित्याच्या फोटोला नमस्कार केला. मग ती बैठकीवर येऊन बसली. बाजूच्या खोलीतून तंबोरा लावण्याचा सूर येत होता तिकडे तिने मान वाळवून पहिले. ती लकब इतकी बालगंधर्वांसारखी होती की, ज्यांनी बालगंधर्व पहिले होते त्यांना त्याच क्षणी बालगंधर्व आठवले. झालेल्या या भासाने सर्वांना गोड धक्का दिला. आता आपण बालगंधर्वांचेच गाणे ऐकणार आहोत या भावनेने सर्वांचे कान ऐकू लागले. रंगभूमीवर उभे राहिल्यावर बालगंधर्व जे वातावरण निर्माण करीत ते इतके विलोभनीय असे की, ज्यांनी तो जमाना पाहिला ते तो काळ विसरणार नाहीत. ज्यांनी तो पहिला नाही त्याला कधीही त्याची कल्पना येणार नाही..!

संगीतकार वसंत देसाई, लता मंगेशकर, बालगंधर्व, बेगम अख्तर आणि अंजनीबाई मालपेकर. (वसंत देसाई यांच्या वेबसाईटवरून)

१९१३ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत माळ्याच्या धर्मशाळेत 'गंधर्व नाटक मंडळी' ची स्थापना झाली. १९०६ ते १९३३ हा बालगंधर्वांचा आणि संगीत नाटकाचा सुवर्णकाळ ठरला होता..! या वैभवी गंधर्वयुगात नारायणरावांनी सुभद्रा, शंकुतला, भामिनी, शारदा अशी भव्यदिव्य पात्रे तर 'एकच प्याला'मधील जीर्ण साडीमधील सिंधू पाहून रसिक थक्क झाले होते. त्या काळात बालगंधर्व म्हणजे एक 'स्टाइल आयकॉन' बनले होते. या 'गंधर्व फॅशन'च्या वेळी त्यांच्या भरजरी साड्या, नक्षीदार दागिने याची स्त्रियांना भुरळ पडली होती. अगदी साबण, सौंदर्य प्रसाधने यावर देखील बालगंधर्वांचे चित्र असायचे. थोडक्यात, बालगंधर्वांचे नाटक पाहणे म्हणजे एक स्वर्गीय अनुभव होता. त्याला कारणही होतं. ते म्हणजे, रंगमंचावर प्रकाश आणि रंगांची इतकी विलक्षण व खर्चिक उधळण असे की रसिक मायबापांचे डोळे दिपून जात असत. म्हणतात, ज्या काळात सोने १० रुपये तोळा या भावात मिळत होते त्या काळात गंधर्वांनी ७५ हजार रुपयांचे रंगमंच उभारून केवळ रसिक मायबापांसाठी आनंदाने संगीत नाटकं पेश केली होती. शिवाय वैशिष्ट्य असे की नाटकाला येणाऱ्या रसिकवर उंची अत्तरांचा फवारा, रंगमंचावर सुंदर मखमली पडदे, मुलायम गालिचे, सिंहासन, प्रकाशाचा लखलखाट, प्रत्येक पात्राची वस्त्रे मखमली कापडाची, सोन्याच्या मुलामा दिलेले दागिने, मुकुट, मंत्रमुग्ध होऊन जावे असा आवाज, तबला आणि सारंगीची अप्रतिम साथ असे. बालगंधर्वांचं वर्णन करतांना एकदा ज्योस्त्ना भोळे म्हणाल्या होत्या की, बालगंधर्व दिसायला सुंदरच नव्हते तर, त्यांचं गोरेपण इतकं मोहक व तेजस्वी होतं की, एखादं पांढरंशुभ्र रेशमी तलम वस्त्र त्यांच्या कांतीपुढे फिकं पडेल.

कधीही व्यासायिक दृष्टी न ठेवणारे, आपल्या कलेशी एकनिष्ठ असणाऱ्या व संगीत नाट्यक्षेत्रात एकतर्फी साम्राज्य करणाऱ्या बालगंधर्वांनी निरनिराळ्या भूमिका साकारून संगीत नाटक आणि नाट्यसंगीत हे कलाप्रकार मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबांमध्ये लोकप्रिय केले होते. नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, काकासाहेब खाडिलकर, राम गणेश गडकरी आणि वसंत शांताराम देसाई प्रभृतींनी लिहिलेली अनेक संगीत नाटके बालगंधर्वांनी केली होती. तसेच, मोहक अभिनय व सुमधुर गायन करणाऱ्या बालगंधर्वांनी एकूण २७ नाटकातून स्त्रियांच्या व पुरुषांच्या मिळून ३६ भूमिका करणाऱ्या नानांना आपल्या वाढत्या वयानुसार स्त्री भूमिका शोभत नाहीत याची जाणीव होती. त्यामुळे त्यांची जागा घेणाऱ्या दुसऱ्या स्त्रीच्या शोधात ते होते. इतरांचा शोध घेताना त्यांनी माणिक वर्मा यांना विचारले होते. मात्र त्यांनी नकार दिला होता. त्याच सुमारास गोहरबाई कर्नाटकी त्यांच्या जीवनात आल्या. तत्पूर्वी गोहरबाई कर्नाटकी यांनी नानांच्या काही नाटकातून स्त्री भूमिका केल्या होत्या. पुढे नोंदणी पद्धतीने त्यांचा विवाह झाला होता. त्यामुळे धर्म बदलण्याचा प्रश्न नव्हता. नंतर ते गोहरबाईंबरोबर माहीमला राहायला गेले होते. दरम्यान नानांची तब्बेत बिघडत चालली होती. दुर्दैवाने कमरेखालील पायामधील शक्ती नाहीशी झाली होती. तरीही अशा परिस्थितीत एकटे पडलेल्या नानांनी माहीमचं घर न सोडण्याचा निर्णय घेतला होता. दुर्दैवाने आयुष्याच्या अखेरीस बालगंधर्व कोमात गेले होते. त्यावेळी दादरच्या हिंदू कॉलनीत फडके नर्सिंग होममध्ये त्यांना दाखल करण्यात आले होते. डॉ. फडके नर्सिंग होममधून गंधर्वांना त्या परिस्थितीत डॉ. राजाभाऊ वाबळे व गंधर्वांचे पुतणे श्री. वसंतराव राजहंस यांनी पुण्याला नेले होते. तो दिवस होता १ मे १९६७. डॉक्टरांचे स्नेही डॉ. माईणकर यांच्या प्रशस्त बंगल्यात गंधर्वांना ठेवण्यात आले होते. त्या दीड महिन्याच्या काळात माईणकरांच्या बंगल्यात त्याही परिस्थितीत गंधर्वांना पाहाण्यासाठी ठराविक वेळी त्यांचे असंख्य चाहते व भक्त मंडळींची प्रचंड रांग लागत असे. कोमात असतानाच नानांना खोलवर बिस्तर स्रोत झाले होते. त्यामुळे सर्व कपडे सतत धुवायला व बदलायला लागत असत. पुण्यातील त्या मुक्कामात व अत्यंत बिकट परिस्थितीत ज्योत्स्नाताई व त्यांच्या आई-वडिलांनी नानांची चोवीस तास सेवा केली होती. कुणाचा विश्वास बसणार नाही, आपल्या गायकीने कदाचित त्यांना आराम मिळेल व गंधर्व कोमामधून जागे होतील या भावनेने खुद्द गानहिरा हिराबाई बडोदेकर दरदिवशी नानांच्या

१) बालगंधर्व व गोहरबाई कर्नाटकी... २) १९१३ मधील 'शाकुंतल' नाटकात शकुंतलाच्या भूमिकेत बालगंधर्व व दुष्यन्तच्या भूमिकेत गोविंदराव टेंबे. (सीताकांत लाड यांच्या स्मृति-संगीत या पुस्तकातून.) ३) एका मैफिलीत बालगंधर्व व संगीतकार वसंत देसाई. (वसंतराव आचरेकर यांच्या संग्रहातून.)

१) सांगली येथील नागठाणे या गावातील जन्मस्थानी असलेला बालगंधर्व यांच्या वाडा. २) बालगंधर्व व गोहरबाई रहात असलेले माहीम (मुंबई) येथील घर.

खोलीबाहेर बसून श्रद्धेने भजनं गात असत. परंतु, विधिलिखित तसं नव्हतं. ते कोमातून बाहेर आले नाहीत. गंधर्व गेले तो दिवस होता १५ जुलै, इ.स. १९६७. गोहरबाईंना देवाज्ञा झाल्यानंतरही नानांनी आपल्या माणसात परत यावे म्हणून डॉ. वाबळ्यांनी खूप प्रयत्न केले होते. नानांची बडदास्त नीट ठेवता येईल या उद्देशाने एक बंगलाही भाड्याने घेण्याचे निश्चित केले होते. परंतु, मी आहे तेथेच ठीक आहे असे म्हणून नानांनी पुण्यास येण्यास नकार दिला होता.

नानांच्या अखंड आठवणी सांगतांना साहजिकच ज्योत्स्नाताई भावनावश होत असत. शेवटी त्या म्हणाल्या, जयंतराव, आमच्या घरी गं.ना.मं. (गंधर्व नाटक मंडळी) लिहिलेल्या अनेक वस्तू आहेत. ओतप्रत प्रेमाने-मायेने भरलेली नानांची कितीतरी पत्रे आहेत. तसेच, इतर सामानांसकट दुर्मीळ फोटोही आहेत. माणूस म्हणून सर्वात श्रेष्ठ असलेले नाना ही तर आमची मर्मबंधातील ठेवच आहे. नानांचं दर्शन जितकं प्रसन्न होतं तितकंच त्यांचं अंतःकरणही निर्मल होतं. यश, कीर्ती, वैभव व लोकप्रियता या सर्वच बाबतीत शिखरावर आरूढ असतानांही ते कमालीचे विनम्र होते.

खरं सांगू, स्वतःविषयी नानांची भूमिका सदैव तुकारामाच्या या पुढील अभंगाप्रमाणे होती..

तारू लागले बंदरी । चंद्रभागेचिये तिरी ।।१।।
लुटा लुटा संतजन । अमुप हे रासी धन ।।२।।
जाला हरिनामाचा तारा । सीड लागले फरारा ।।३।।
तुका जवळी हमाल । भार चालवी विठ्ठल ।।४।।

ज्योत्स्नाताईंकडे नानांच्या आठवणींचा प्रचंड सांठा आहे. तसेच, त्यांची स्मरणशक्तीही वाखाणण्यासारखी आहे. हे कौतुकास्पद होय. तेव्हा त्यांनी नानांच्या वैयक्तिक व दुर्मीळ आठवणी फोटोंसह लिहून प्रकाशित कराव्यात अशी मी त्यांना नम्र विनंती केली आहे. 'येथे अजिबातच मला वेळ मिळणार नाही पण लवकरच पुण्याला गेल्यावर शांतपणे वेळ मिळेल' असं त्या म्हणाल्या. असो. वैयक्तिक आठवणींमुळे अनेक समज-गैरसमज दूर होतील. तसेच, बालगंधर्वांची माहित नसलेली उद्‌बोधक माहिती आम्हा रसिकांना वाचायला मिळेल ही अपेक्षा. अशी माझी खात्री आहे. त्यांनाही ते पटलं असून त्यांनी ते मान्य केलं आहे. त्यांच्या कार्याला मी मनापासून शुभेच्छा देतो.

बालगंधर्वांचा जन्म २६ जून, १९८८ मध्ये झाला होता. बालगंधर्व ही पदवी त्यांना लोकमान्य टिळकांनी १८९८ साली म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षी दिली होती. १९०५ साली वयाच्या सतराव्या वर्षी गुरुद्वादशीच्या मुहूर्तावर त्यांनी नाटकमंडळीत प्रवेश केला होता. तेव्हापासून आपली गंधर्व नाटकमंडळी १९३४ साली विसर्जित करेपर्यंत सतत एकोणतीस वर्ष त्यांनी रंगभूमीवर एकछत्री राज्य केलं होतं; पण कधी स्वतःचा बकवा नाही, आपली शेखी मिरवली नाही. संपत्ती-कीर्ती-कर्ज-आपत्ती सर्वच त्यांच्याकडे चालत आलं होतं. अशा या नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व, या नावाने अधिक लोकप्रिय असलेले विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील मराठी रंगभूमी आणि चित्रपटांतील अभिनेता, गायक आणि नाट्यनिर्माते! रंगभूमीवर स्त्रिया अभिनय करीत नसतानाच्या काळात आपल्या हुबेहुब रंगवलेल्या स्त्री-भूमिकांमुळे बालगंधर्वांनी मोठी लोकप्रियता मिळवली. रंगभूमीवरून निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी बालगंधर्वांनी शाकुंतलमध्ये शकुंतला, सौभद्रमध्ये सुभद्रा, मृच्छकटिकमध्ये वसंतसेना, मानापमानमध्ये भामिनी, संशयकल्लोळमध्ये रेवती, शारदामध्ये शारदा, मूकनायकमध्ये सरोजिनी, स्वयंवरमध्ये रुक्मिणी ही स्त्री पात्रं रंगवली. 'एकच प्याला' या नाटकात साकार केलेली सिंधू ही त्यांची शेवटची भूमिका होती. नाट्यगीतांसह ख्याल, ठुमरी, गझल, दादरा, भक्तिगीते यांसारख्या गायन प्रकारांवरही त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. सर्वांचं दैवत असलेल्या वंदनीय नानांना उर्फ नटश्रेष्ठ बालगंधर्व यांना माझे शतशः प्रणाम..!

– जयंत विठ्ठल कुळकर्णी
Elmhurst, N.Y.
Tel.: +1 718 565 5720
Jvkny1@gmail.com

बालगंधर्व यांना मिळालेले पुरस्कार

– अखिल भारतीय संगीत नाटक अकादमी, राष्ट्रपती पदक, १९५५
– भारत सरकार, पद्मभूषण, १९६४

१९७०-८० च्या दशकांत जे सामाजिक अभिसरण झालं, त्यात स्त्रीमुक्ती चळवळीच्या बिनीच्या कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी स्त्रियांना केवळ आत्मभान दिलं असं नाही, तर त्यांना आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढण्याचं बळही दिलं. 'मिळून साऱ्याजणी'च्या संपादक म्हणून त्यांनी स्त्रीविषयक अनेक पैलूंवर प्रकाश टाकून समाजजागृती करण्याचा प्रयत्न केला. 'स्त्री-आधार केंद्रा'बरोबरच 'नारी समता मंचा'चीही स्थापना विद्याताईंच्या नेतृत्वाखाली झाली. त्यांनी 'साथ-साथ', 'अक्षरस्पर्श'सारखे उपक्रमही राबवले.

विद्याताईंच्या निधनाने एका संवेदनशील आणि प्रगल्भ नेतृत्वाची अखेर झाल्याची खंत समाजात राहील. 'ग्रंथाली' परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

भारतीय वंशावळीबद्दल माझी पाच मते

राहुल सबनीस

अमेरिकेत जन्मलेल्या आणि वाढलेल्या पहिल्या पिढीतल्या आणि त्यातून मराठी असलेल्या मुलाची ही स्पष्ट मते आहेत. बाकीच्यांची मते याहून वेगळी असू शकतील. खालील हे पाच विषय विचार करण्यासाठी.

१. शिस्त

भारतीय वंशातील आम्हा मुलांचा पहिला फायदा म्हणजे पिढ्यान् पिढ्या चालत आलेली शिस्त. अशा गोष्टींना ऐतिहासिक मापदंड नसतो. आमचे यश हे कुटुंबाच्या यशावरच अवलंबून असणार. माझे आईवडील अमेरिकेत यायच्या आधीही यशस्वी होतेच. पण पाश्चिमात्य देशांत जाऊन याहून जास्ती काही करावे अशी त्यांची सुप्त इच्छा होती. इंजिनियरींग परीक्षेत सुवर्ण पदक मिळवणाऱ्या माझ्या वडिलांसारखे इतर पण असतील. अशा आईवडिलांनी त्यांच्या मुलांकडून तशीच अपेक्षा केल्यास वावगे ठरणार नाही. याचे एक उदाहरण!

माझ्या शाळेतल्या यशाबद्दल वडीलांबरोबर कित्येकदा आम्ही स्पष्ट बोलत असू. माझे बाबा नेहमी विचारायचे. ''तुला जास्तीत जास्त चांगले मार्क किती पडतील असे वाटते?'' अर्थात अपेक्षा आणि वास्तवता यात फरक असणारच. पण त्यांच्या दृष्टीने मी जेवढी जास्त अपेक्षा ठेवेन तेवढेच मला मार्क मिळतील. उदा. ११/१२ या वर्षात अमेरिकेत SAT (Scholastic Aptitude Test) म्हणून कॉलेजच्या ॲडमीशनसाठी जाण्याची परीक्षा असते. त्यात जास्तीत जास्त १६०० पैकी १६०० मार्क मिळवायचे ही शक्यता वास्तवता पण नाही. मी त्यांना साधारण १३००च्या आसपास गुण मिळतील असे सांगितले आणि मला १३१० गुण मिळाले. मला कॉर्नेल विद्यापीठात प्रवेश हवा होता. तो पण मिळाला. म्हणजे काम यशस्वी झाले आणि मला एक धडापण मिळाला.

२. अपेक्षा

आमच्याकडे सगळ्यात चांगले गुण मिळावे, हा कधीच प्रश्न नव्हता. ती तर अपेक्षाच होती. मुलगा असो किंवा मुलगी. त्यांनी वर्गात सर्वांत 'Valedidorian' पहिले असावे. त्यानंतर कॉर्नेलसारख्या अमेरिकेतल्या सर्वात चांगल्या अशा विद्यापीठात जायला हवे हे स्वप्न माझ्या आईवडिलांनी पाहिले असल्याने 'महत्त्वपूर्ण' अशी शिकवण कायम दिली, ती म्हणजे कोणतेही क्षेत्र निवडा पण त्यात सर्वात उत्तम व्हा.

अशा अपेक्षा पुष्कळदा घातकारक ठरतात. मला कॉर्नेलला जायचे होते पण स्थापत्यशास्त्र नको होते. त्यामुळे कॉर्नेलला गेल्यावर मी मला आवडते तसे डॉक्टर किंवा इंजिनीयर न होता 'मार्केटींग'मध्ये जायचे आहे असे म्हणणे म्हणजे त्यांच्यादृष्टीने करीयरच्या दृष्टीने घातकच होते. अर्थात वडिलांनी सांगितले, की ''त्या क्षेत्राबद्दल त्यांना काहीच माहीत नाही. त्यामुळे त्यांचा फार उपयोग होणार नाही.'' पण त्यात नुसते चांगले असून भागणार नाही तर त्यात 'अद्वितीय' व्हायला हवे. हे मात्र माझ्या अजून ध्यानात आहे. आणि माझी सध्याची नोकरी ध्यानात घेता आता त्यांना पण हे पटते कारण तीच त्यांची अपेक्षा होती.

३. नम्रपणा

नम्र असणे हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्यं आहे. जो कोणी 'मी' हा शब्द जास्त वापरतो किंवा स्वत:च स्वत:ची स्तुती करतो त्यांना डावलले जाते. माझ्याही करिअरच्या सुरुवातीच्या काळात हे माझेही दुखणे होते कारण मी अति उदारपणे इतरांना श्रेय द्यायचो पण माझ्या स्वत:च्या कामाबद्दल मात्र मला कधीच प्रशंसा मिळाली नाही.

याच नम्रपणाचा माझ्या नंतरच्या करिअरमध्ये फायदा झाला. इतरांना श्रेय देऊन त्यांच्या चुकांची जबाबदारी घेतल्यास आपले पुढारीपण दिसून येते. हे केल्यास त्यांना पण बरे वाटून ते माझे काम पटकन करून देत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे रात्री झोपायला जाताना आपल्याबरोबर सर्वांनी चांगले काम केल्याचे समाधान होऊन झोप चांगली लागते.

४. सांस्कृतिक वेगळेपणा

मी माझ्या यहुदी किंवा ख्रिश्चन मित्रांचा पूर्वी खूप हेवा करीत असे कारण त्यांच्या संस्कृतीत त्यांची संघटना खूप एकत्र राहून काम करीत असते.

पहिल्या 'अमेरिकन-मराठी' पिढीला असे संस्कारच नसल्यामुळे त्यांना दिशाच नसल्याचे जाणवते. त्यामुळे आमचे आईवडील सांगतील तेवढे ऐकायचे आणि करायचे हेच माहीत होते. मराठीपण म्हणजे काय हे त्यापलीकडे ठाऊक नव्हते.

आम्ही पुष्कळदा टीव्हीवर मराठी किंवा भारतीय संस्कृतीबद्दल अवलंबून रहात असे. त्यामुळे आमची पहिली पिढी टीव्हीवरच्या गोष्टी म्हणजेच खरं सत्य समजून वागत असू. आमच्या १६व्या वर्षी आपली स्वत:ची मोटार असावी हा पण टीव्हीचा एक परिणाम होता. त्यामुळे टीव्हीवरच्या जाहीराती ह्या खऱ्याच वाटायच्या. याची एक चांगली गोष्ट म्हणजे कदाचित माझ्या कारकीर्दीचे श्रेय टीव्हीला द्यायला हरकत नाही.

५. टिकलेली मैत्री आणि त्याचे परिणाम

आमच्या पिढीतले एक कटू सत्य म्हणजे अमेरिकेत राहिल्या वाढल्यामुळे एकत्र कुटुंबाबद्दल कधी फारशी ओढ वाटली नाही, जशी ती येथे २-३ पिढ्या वाढलेल्या मित्रांना असते. उदा. घराण्यात कोणी व्यक्तीही मरण पावल्यास किंवा लग्नाच्या सर्व गोष्टीमध्ये कधी भाग घेता आला नाही. त्यामुळे मला माझ्या इटालीअन किंवा आयरिश मित्रांचा हेवा वाटायचा. त्यामुळे माझ्यासारख्या पहिल्या पिढीच्या (भारतीय) मुलांना त्यांचे मित्रमैत्रिणीच कुटुंबीयांपेक्षा जवळचे वाटायचे. फक्त आईवडील आणि बहीण सोडल्यास जवळचे असे कोणीच नव्हते.

६. भविष्याकडे बघताना

हे सगळे लिहिता एक मला जाणवते, की आम्ही वाढलो आणि स्वतंत्रपणे भारतीय म्हणून वाढलो. माझ्या बालपणातला भारत मला आठवतो. त्यापेक्षा आताचा भारत हा खूपसा ९०च्या किंवा २०००च्या दशकातल्या अमेरिकेहूनही पुढे गेलेला आहे.

माझे भारतातील नातेवाईक त्यांच्या कष्टाळू काम करण्याच्या पद्धतीमुळे पैशाच्या दृष्टीने आमच्यापेक्षा पुष्कळच स्थिरावले आहे. पण ह्या पैशामुळे त्यांच्याकडे 'मी' पण जास्त येऊन त्यांनाच त्यांचे दुष्परिणाम भोगायला लागतील यात दुमत होणार नाही. शिवाय त्यामुळे त्याचे दुष्परिणाम महाराष्ट्रातील एक-दोन पिढ्यांना पण भोगायला लागतील, हे पण तेवढेच खरे आहे.

मी 'भारतीय अमेरिकन' म्हणजे काय हे आणखी दोन-तीन पिढ्यानंतरच कळून येईल. मला नक्की वाटते आणखी तीन-चार पिढ्यानंतर अमेरिकेतली भारतीय संस्कृती परत भारतात जाईल आणि त्यामुळे परत सर्व चालू राहील असे इतिहासानेच दाखवून दिले आहे.

– राहुल सबनीस
New York, NY

ग्रंथाली

ट्वेल्थ फेल

हरतो तोच, जो लढत नाही

अनुराग पाठक
अनुवाद : संदीप रामराव काळे



संकल्प, समर्पण आणि स्वयंशिस्त यांचा त्रिवेणी संगम असलेले एक अद्‌भूत पुस्तक.

– सुनील गावस्कर

मूल्य १९६ रुपये सवलतीत १६० रुपये

दीनानाथ सिंह यांच्या आयुष्याचा पट

लाल माती

शब्दांकन
विश्वास पाटील



दीनानाथ सिंह यांची ही जीवनगाथा म्हणजे महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेचा इतिहास आणि व्यापक अर्थाने सामाजिक जीवन मांडणारी आहे.

मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये

‘ॲपेलेशियन ट्रेल’ची भ्रमंती

गिरीश देसाई

पुण्यात वाढलो, शिकलो, मोठा झालो. पर्वती, वेताळ, हनुमान, चतुश्रृंगी टेकड्यांच्या अंगाखांद्यावर भटकताना डोंगरवेडाचे बालामृत मिळाले. पुढे सिंहगड, राजगड, तोरणा, प्रचितगड, हरिश्चंद्रगड, कळसूबाई या सह्याद्रीच्या गडांवर मनमुराद भटकलो. शिवबाच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या या गडांवर फिरताना अभिमानाने ऊर भरून येतो. देवढाक्याच्या पाण्याचा थंडगार स्पर्श, वासोटाच्या जंगलातला रानमेवा, शिवनेरीवरील महाराजांची वास्तू हे सारे अनुभवताना डोंगरवेड नसानसात भिनत गेले. कधी धुरळा उडवत जाणाऱ्या लाल डब्याच्या एस.टी.तून तर कधी लोणावळ्याच्या लोकलमधून डोंगरवाटांमध्ये जात असे. कधी दोन वेळचा डबा घेऊन, तर कधी दगडांची चूल मांडून खिचडी बनवून क्षुधाशांती होत असे. ट्रेकची गाणी, मराठी लावण्या, जुनी हिंदी गाणी म्हणत वाटचाल व्हायची. पुण्यात असा निर्मळ आनंद देणाऱ्या बऱ्याच संस्था होत्या. कधीकधी चारपाच टाळकी जमवून भटकंती व्हायची. कॉलेज, विद्यापीठाचे दिवस सरले. अर्थार्जनासाठी पुण्याची सीमारेषा ओलांडली आणि अमेरिकेत येण्याची संधी मिळाली. मध्यमवर्गीय चाकोरीबद्ध आयुष्यात कधी आणि कसा गुरफटलो कळलेच नाही. १०,००० मैलांवर संसाराच्या रगाड्यात नवीन देशात आपल्या माणसांपासून दूर स्थिरावताना बरीच ओढाताण झाली. त्यातून फ्लोरिडा हा प्रांत म्हणजे डोंगरापासून शेकडो मैल दूर. पूर्ण सपाटीच्या या प्रदेशात डोंगरच काय पण टेकडीसुद्धा दृष्टीस पडत नाही. मनातला एक कप्पा डोंगरभेटीसाठी सदैव आसुसलेला असे. सुमारे सहा एक वर्षे डोंगर वनवास भोगल्यानंतर व्हर्जिनिया प्रांतात काही वर्षे बस्तान बसविले आणि निसर्गाचे मुक्तहस्ताने वैभव लाभलेल्या या राज्यात डोंगर भटकंतीचे पुनरुत्थन झाले. ऐतिहासिक रिचमंडपासून फक्त एकदीड तासाच्या अंतरावर डोंगर असल्यामुळे आठवडाअंती जमेल तसे भटकंती करू लागलो. अशा तऱ्हेने ‘ॲपेलेशियन ट्रेल’ या जगप्रसिद्ध पायवाटेशी प्रथम ओळख झाली. नव्हे, लग्नगाठच बांधली गेली.

सुमारे २२०० मैल अथवा ३५०० कि.मी. लांबीची ‘ॲपेलेशियन पर्वतातली पायवाट’ म्हणजे डोंगरवेड्यांनी भूतलावर प्रत्यक्षात आणलेले स्वप्नच होय. कुठलीही शासकीय अथवा व्यावसायिक क्षेत्राची मदत न घेता केवळ स्वंयसेवी संस्था, स्वयंसेवकांमार्फत बनवून देखभाल केलेली ही पायवाट एक आश्चर्यच म्हणावे लागेल. केवळ श्रमदानातून नव्वद वर्षे अशी हजारो मैलांची पायवाट जिवंत ठेवणे ही काही चेष्टा नव्हे. फक्त पायपीटीसाठी राखण्यात आलेली ही जगातली सर्वात मोठी पायवाट मानण्यात येते. जॉर्जिया, नॉर्थ कॅरेलिना, टेनीसी, व्हार्जिनिया, वेस्ट व्हर्जिनिया, मेरिलँड, पेनसिल्व्हेनिया, न्यूजर्सी, न्यूयॉर्क, कनेक्टिकट, मॅसेच्युसेट, व्हरमाँट, न्यूहॅम्पशायर, मेन अशा १४ राज्यांतून जाणारी वाट पुढे कॅनेडात शिरते. मात्र ‘स्प्रिंगर माऊंटन’(जॉर्जिया) आणि माऊंट कॅथेडिन (मेन) ही अधिकृत टोके समजली जातात. वाटेतील झाडांवर पांढऱ्या रंगाची उभी आयताकृत खूण हे ‘ॲपेलेशियन ट्रेल’चे निशाण ठरवले गेले. ‘ए.टी.’ अशा नावानेही ही वाटचाल ओळखली जाते. संपूर्ण वाटेवर हे निशाण आढळते. त्यामुळे हरवण्याचा प्रश्नच येत नाही. कधी झाडांवर, कधी दगडांवर, कधी रस्त्यांवर तर कधी चक्कपैकी इमारतीच्या मध्येही ही खूण आढळते. बावीसशे मैलांची ही नागमोडी वाट शेकडो संस्थांनी दत्तक म्हणून घेतली आहे. वाटेवरील झाडांची निगा राखणे पडलेली झाडे बाजूला करणे, ढासळलेले दगड परत ठेवणे वगैरे निगा राखण्याची कामे स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे करतात. याशिवाय ठरावीक अंतरावर डोंगरवेड्यांना राहण्यासाठी तात्पुरता निवाराही ज्याला शेल्टर म्हणतात तो आढळतो. बहुधा तीन बाजूंनी बांधलेले लाकडाचे घर म्हणजे रात्रीच्या मुक्कामासाठी मोठा आधार ठरतो. लाकडी फळ्यांनी सजवलेल्या या खोल्या बऱ्यापैकी सोयीस्कर ठरतात. काहीशा अंतरावर प्रात:र्विधीची सोय केलेली असते. जंगली जनावरांपासून खाण्यापिण्याच्या गोष्टी सांभाळण्यासाठी झाडावर दोरीची व्यवस्था असते. पाण्याचा झरा असेल तर पाणी अडवून त्याचीही व्यवस्था केलेली असते. प्रत्येक शेल्टरमध्ये वही व पेन/पेन्सिल असते.

वाटसरूंनी टिपण्णी लिहून काही कमी असल्यास सूचना करावी अशी अपेक्षा असते. मी अशा बऱ्याच शेल्टर्समध्ये राहिलो. कधीही कचरा आढळला नाली. लोकांनी वही पेन व्यवस्थित ठेवून मनापासून आभार मानल्याचे दिसत होते. हा २२०० मैलांचा ट्रेक एकदम पूर्ण करणाऱ्यांना ‘थ्रु हायकर’ असे संबोधण्यात येते.

सुमारे ५ ते ८ महिन्यांची ही वाटचाल करणं येड्या गबाळ्याचे काम नव्हे. अशा वेडाने पछाडलेले निसर्गप्रेमी कामधंदा सोडून वर्षांनुवर्षे तयारी करून ही वाटचाल पूर्ण करतात. अर्थात हे प्रमाण अतिअल्प आहे. साधारणपणे मार्च-एप्रिलमध्ये दक्षिण टोक-स्प्रिंगर पर्वतावरून 'थ्रु हायकर' सुरुवात करतात. ऑक्टोबर-नोव्हेंबरला ते माऊंट कथाडिनला पोहोचतात. बऱ्याचदा या हायकर्सचे टोपणनाव असते. हायकिंग क्षेत्रात ते याच नावाने ओवखले जातात. अशा हायकर्सना खूप मान दिला जातो. या वाटचालीत त्यांचे कित्येक बूटांचे जोड, हायकिंगच्या काठ्या निकामी होतात. वाटेवरील गावातील लोकं यांना खूप प्रोत्साहन देतात. काही गावांतील पोस्ट ऑफिस खास यासाठी प्रसिद्ध आहेत. बरेच हायकर्स काही आठवडे आधीच शिधासामुग्री पार्सलने पाठवतात व त्या भागात आल्यावर थोडी वाट वाकडी करून ताब्यात घेऊन वापरतात. मला आजवर या अख्ख्या ट्रेलवर खूपच कमी वेळा कचरा आढळला. इथले भटके बऱ्यापैकी पर्यावरणाची जाण असणारे आढळतात. कधी टोळक्याने, कधी एकटेदुकटे भटकताना दिसतात. एक प्रकारचा उत्साह सर्वांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहात असतो. अनोळखी व्यक्तीची विचारपूस करणे. कुणाला मदत लागल्यास ती करणे हा जणू इथलाच धर्मच आहे. माणुसकीचे अनेक नमुने इथे पाहायला मिळतात.

असाच एक अनुभव इथे सांगावासा वाटतो. आमच्या ग्रुपबरोबर गेल्या वर्षी नेहमीप्रमाणे ॲपेलेशियनचा एक १८ मैलांचा भाग भटकायला गेलो होतो. एका झऱ्याच्या काठी जेवणासाठी थांबलो तेव्हा किल्ल्यांचा जुडगा पडला असावा. यात माझ्या गाडीची किल्ली, रिमोट कंट्रोलर, घराची किल्ली वगैरे याशिवाय काही दुकानांची किचेन कार्ड होती. १८ मैलांच्या टापूत घनदाट झाडीत, असा जुडगा सापडणे म्हणजे शून्य शक्यता होती. मी आशा पूर्णपणे सोडून दुसऱ्या किल्ल्या बनवून हा अनुभव अक्कलखाती टाकला. सुमारे महिन्याभरानंतर मला फोनवर या किल्ल्यासंबंधी टेक्स्ट आला. केनटक्की प्रांतातील एका हायकरला हा जुडगा सापडला होता. एका दुकानाच्या कार्डाच्या आधारे त्याने माझा पत्ता व फोन नंबर मिळवला. मी योग्य व्यक्ती असल्याची खात्री केल्यावर 'माईक' नावाच्या या सद्गृहस्थाने हा जुडगा एका खास लिफाफ्यातून मला पाठवला. त्याच्या या कृत्यामुळे अक्षरश: डोळ्यात पाणी तरळले. जगात अजूनही माणुसकी टिकून आहे याचा प्रत्यय आला आणि खास करून ती निसर्गाच्या सानिध्यात असणाऱ्यांमध्ये जास्ती प्रमाणात टिकून आले. त्याने मुद्दामून त्याचा पत्ता टाकला नव्हता कारण त्याला कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा नव्हती. मी त्याला आभारपर संदेश पाठवला. किमान खर्चाविषयी बोलून तो मोबदला घेण्याची विनंती केली. त्यावर त्याने जे उत्तर दिले ते पाहून अजून धक्का बसला. तो एवढेच म्हटला- ''माझ्या जागी तुम्ही असता तर माझी खात्री आहे की तुम्ही पण हेच केले असते.'' कधीतरी हा माईक कुठल्यातरी पायवाटेवर भेटेल आणि निदान हस्तांदोलन करण्याची मला संधी देईन या प्रतिक्षेत मी आहे. दरम्यान माझा त्याला सलाम.

असे बरेच सकारात्मक अनुभव येतात. कुत्र्यांच्या मदतीने वाटचाल पूर्ण करण्यांमध्ये काही अंधही आहेत. स्त्रियांचाही तितकाच सहभाग आढळतो. त्यावरून दिसून येते की हे किती सुरक्षित ठिकाण आहे. जॉर्जियातील नील्सगॅप येथे तुटलेले बूट झाडांवर टांगण्याची गमतीशीर प्रथा आहे. मार्च एप्रिलला हायगिंगचा मोसम सुरू होतो तेव्हा इथे खास गावरान गाणी आयोजित केली जातात.

सुमारे अकरा वर्षापूर्वी अटलांटाला स्थिरावलो. रिचमंड एवढा जवळ नसला तरी ॲपेलेशियन ट्रेल तसा टापूतच होता. 'मीटअप'ग्रुपमुळे काही हायकिंग ग्रुपच्या सानिध्यात आलो. समविचारी निसर्गात भटकणाऱ्यांच्या सहवासामुळे ट्रेकिंगचा छंद वाढीस लागला. ए.टी.शी अजून जवळीक निर्माण झाली. हाईक जॉर्जिया हॅपी ट्रेल हे ग्रुप तर जणू निसर्गातले कुटुंबच समजू लागलो. माझ्याप्रमाणे बरेचसे जगाच्या वेगवेगळ्या भागातून येऊन स्थिरावले होते. विविध धर्म, वंश, देशातील लोकांना अमेरिका कसे सामावून घेते याचे हे एक सुंदर उदाहरण आहे. स्वीडनचा लार्स, हॉलंडची मॉड, ऑस्ट्रेलियाचा लिओ, रूमानियाची पॉला, चीनचा सू आफ्रिकेच्या टोंगाचा डेव्हिड असे अनेक नियमित हायकर्स भेटू लागले. इतरही पंधरावीस देशातील लोकं अधूनमधून येऊ लागले. दिवसभरात पाचसहा तास किमान सलग वाटचालीत यांच्याशी गप्पा टप्पा होऊ लागल्या. गूगल किंवा टीव्हीशिवाय त्या देशांची जवळून माहिती मिळत गेली. निसर्गात भटकणारे विचारांनीही मोकळे असतात. मग मीही भारताविषयी भरभरून बोलत गेलो. छत्रपती शिवाजी महाराज माझा जिव्हाळ्याचा विषय. त्यांच्या कहाण्या सांगत गेलो. भारताविषयीचे बरेच गैरसमज दूर केले. निसर्गातील वाटचाली बरोबरच सांस्कृतिक देवाणघेवाण करण्याचा हाही एक मार्ग ठरला. मी तर नेदरलँड्सला मॉडच्या मूळगावी जाऊन तिच्या आईवडिलांना भेटलो. त्यांच्याबरोबर तिथे सायकलवर भटकंती केली. तिच्या कुटुंबाशी अशी नाळ जुळली गेली. गोरे, काळे, पीतवर्णीय, माझ्यासारखे ब्राऊन सारे गटागटाने भटकतो. कधीतरी बाहेर भेटतो. परंतु शक्यतो निसर्गातली वाटचाल एवढाच उद्देश असतो. कुणी कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात नाक खुपसत नाही. दिवसभराची पंधरावीस मैलांची पायपीट झाली की एखाद्या लहानशा गावातील हॉटेलांत जेवण करतो. अटलांटाबाहेरील एखाद्या सोयीच्या ठिकाणी गाड्या लावून कारपूल केल्यामुळे पायवाटेपर्यंत व परतीच्या प्रवासात खूप गप्पाटप्पा चेष्टामस्करी होते. उत्साह द्विगुणीत होतो. माहिती मिळते.

स्प्रिंगर माऊंटन ते ब्लायगॅप असा सुमारे ७६ मैलांचा जॉर्जियाचा ॲपेलेशियन ट्रेल भाग आहे. सुप्रसिद्ध ॲमीकोलोला धबधब्यापासून ९ मैलांवर स्प्रिंगर माऊंटन आहे. इथूनच जगप्रसिद्ध ए.टी. सुरू होतो. इथल्या दगडाखाली नोंदवही ठेवली आहे. हायटॉवर गॅप, वुडी गॅप, ब्लड माऊंटन, नील्म गॅप, होपगेन गॅप, चट्टालूची गॅप, युनिकोय गॅप, ट्रे माऊंटन, डिक्सक्रिक गॅप व शेवटी ब्लाय गॅप - हे जॉर्जिया सेक्शनवरील महत्त्वाचे टापू. साधारणपणे

आठ दहा मैलांच्या अंतरावर ही ठिकाणे आहेत. त्याठिकाणी गाड्या ठेवायला जागा आहे. नवशिके लहान-लहान सबसेक्शन एका दिवसात पार पाडतात. डेलोनेगा, क्लिव्हलँड, हेलन, क्लेप्न ही निसर्गसुंदर गावे या ट्रेलच्या जवळ आहेत. यातील हेलन गाव तर युरोपमधील स्विस आल्प्सची आठवण करून देते. इथे ऑक्टोबर-फेस्ट जोरात साजरा केला जातो. डोंगरातील नागमोडी रस्त्यावरून बरेच 'मोटार सायकल' स्वारांचे टोळके जाताना आढळते. लेदर पॅकेट घातलेले, अतिसुदृढ दाढी वाढवलेले हे जिंदादिल बायकर्स हायकर्सप्रमाणेच रस्त्यावरून भटकतात. नील्म गॅप हा साधारणपणे मध्य ठरतो. तिथे खास हायकर्ससाठी दुकान आहे. तो चालवणारा स्वत: हायकर असून त्याने दोनदा पूर्ण ए.टी.केलेले आहे. हॉस्टेलच्या धर्तीवर तो तिथेच एक लॉजही चालवतो. काही हायकर्सना ही एक फार मोठी पर्वणी ठरते. महत्त्वाचे टापू घाटातील रस्त्यांवर आहेत. कधीकधी तिथे काही स्वयंसेवक पाणी, फळे, खाद्यपदार्थ देतात. कचरा गोळा करतात. जणू काही बरामाही ही पंढरीची यात्रा चालू असते. इथला विठोबा म्हणजे निसर्ग. महाराष्ट्रात जसे कानाकोपऱ्यातून शेतकरी व सर्वसाधारण नागरिक येतो ना तसेच इथे निसर्गात भटकणारे येतात. मोकळ्या मनाने पौर्णिमाच्या दाट झाडीत बऱ्यापैकी उंचीच्या डोंगरावर भटकण्यासाठी इथे कुठलीही शर्यत वा इर्षा नसते. उद्देश एकच असतो भटकण्याचा. प्रदुषणमुक्त वाटेवर स्वच्छ हवा छातीत भरून घेण्याचा. व्यायामाबरोबर मनाला उल्हसित करणारी ही वाट सर्वोत्तम जपली आहे. माझ्या एकट्याने केलेल्या 'एव्हरेस्ट बेस' व 'किलीमांजारो' मोहिमांचे श्रेय बऱ्यापैकी इथल्या वाटचालीला देतो.

वीसेक वर्षापूर्वी सह्याद्रीशी ताटातूट झाली तेव्हा मन हळवे झाले होते. जेव्हा पुण्याला जातो तेव्हा सह्याद्रीला भेटतो. परंतु ती भेट खूपच धावती असते. तो माझा सह्याद्री पर्वत परत मिळेल असे वाटत नव्हते. मात्र ४८ कोटी वर्षांपूर्वी निर्माण झालेली जगातील प्राचीन पर्वतरांग - ॲपेलेशियन पर्वतांमधील पायवाट मनाला आधार द्यायला यशस्वी झाली. शिवबा नसला तरी चेरोकींचा इतिहास इथे आढळला. गुहा, मंदिरे नसली तरी स्वयंसेवकांनी कष्टाने बनवलेली शेल्टरर्स आढळही. रामराम म्हणणारे गावकरी नसले तरी ''हाव आर यू'' असे म्हणणारे इतर ट्रेकर्स भेटले. राजमाची, तुंग, त्रिकोना वगैरे शेकडो गड नसले तरी ब्लड माऊंटन अथवा किंचित बाजूला असणारा ब्रास टाऊन बाल्ड भेटला. जांभळं करवंद नसली तरी स्ट्रॉबेरी, ब्लुबेरी, ब्लॅकबेरी आढळला.

डोंगरवेडे थांबत नसतात. ते आनंद वेगवेगळ्या रुपात शोधतात. गतिमानता व बदलाला सामोरे जाणे यानेच प्रगती होते नाही का? सह्याद्री माझ्या हृदयात आहेच परंतु आता पायाखाली ॲपेलेशियनची वाट आहे. देवटाक्याची तहान चट्टाहुयीच्या जलस्त्रोतात भागवतो. निसर्गात भटकणे हा माणसाचा पिंड आहे. जसा ॲपेलेशियन तसाच पश्चिमेकडे पॅसिफीक क्रेस्ट. डोंगराशी जवळीक वाढली की मनाचा मोठेपणाही वाढतो. क्षितिजे वाढवीत, जवळच्या परिसरात भटकावे, इथल्या संस्कृतीत रूजावे. कदाचित ॲपेलेशियन ट्रेलचा हाच तर उद्देश नसावा? ते काहीही असलं तरी कुठल्याही तत्त्वज्ञानात न अडकता मी भटकतो कारण तो माझा छंद आहे. मनमुराद भटकण्याचा.

– गिरीश देसाई
Atlanta, Georgia
gudesai@gmail.com

ग्रंथाली

एका पोलीस अधिकाऱ्याच्या सेवाकालाचे अंतिम पर्व



सॅल्यूट

यशवंत व्हटकर

मूल्य २०० रुपये
सवलतीत १२० रुपये

हे पुस्तक म्हणजे लेखकाच्या पाठीमागील सेवाकालावधीतील विहंगलोकनाबरोबरच शेवटच्या कालावधीतील घटना सांगते. पण ती घटना पुस्तकाच्या मूळ गाभ्याशी अंगभूत आहे.

पोलीस नभोमंडळातील २१ आयपीएस नक्षत्र



प्रतिभा बिस्वास

मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

या पुस्तकाचं वाचन करताना युवावर्गाच्या मनात आकांक्षा निर्माण होऊन युपीएससी आणि एमपीएससी यांसारख्या स्पर्धा परीक्षांची कर्तृत्वशिखरे त्यांना खुणावू लागतील. युपीएससीचा मराठी टक्का वाढावा यासाठी हा लेखन प्रपंच!

गोन विथ द विंड

डॉ. मोहन द्रविड

शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका हा प्रसंग वाचताना आपल्या अंगावर अजूनही रोमांच उभे राहतात. आधुनिक जगात असा प्रसंग उद्भवेल हे सांगूनही पटणार नाही. कायदा कानूनच्या मोठ्या गप्पा मारणाऱ्या या सुधारलेल्या दुनियेत, मुळात औरंगजेब असेलच कसा? पण २०२० चं नवीन दशक चालू व्हायला केवळ पंचेचाळीस तास बाकी असताना जपानमधल्या एका अरबी 'सुपर हीरो'ने चोहीकडून पहारा असताना जीवघेण्या कैदेतून आपली चित्तथरारक सुटका केली आणि पंचखंडाला विस्मित करून सोडले.

जपानमधील 'मांगा' नावाची कार्टून्स सर्व बालजगतात प्रचंड लोकप्रिय आहेत. त्यात सुपरहीरो असतात. साधारण दहा वर्षांपूर्वी अशीच कार्टून्स – पण खऱ्या जगातील–मोठ्या माणसांकरता तयार करायची टूम निघाली. ही कार्टून्स तरुणाईमध्ये विलक्षण लोकप्रिय झाली. त्यातला पहिला सुपरहीरो होता कार्लोस गोन (Ghosn) नावाचा निसान या मोटरगाड्या तयार करणाऱ्या कंपनीचा सर्वेसर्वा. हा वेगवेगळ्या युक्त्या–प्रयुक्त्या वापरून गाळात गेलेल्या कंपन्यांना संकटातून बाहेर बाहेर काढतो असा या कार्टून्सचा विषय असे. या कार्टूनस्ट्रिपचं नाव होतं The True Life of Carlos Ghosn. या कार्टून्सच्या पहिल्या भागात कार्लोस गोन बुडत असणारी निसान कंपनी कशी वाचवतो हे कथानक होतं. यात एक प्रसिद्ध सीन आहे. गोनला पाहून कंपनी बोर्डचे मेंबर चाचरत विचारतात, ''ह्या... ह्या...ह्याला खरंच वाटतं की काय हा आपली कंपनी सुधारेल?''

गोनची उद्योगजगतातील कामगिरी तशी गौरवास्पदच होती. २००२ साली अमेरिकेच्या 'फॉर्चुन' या मासिकाने त्याला अशिया खंडातील सर्वोत्कृष्ट उद्योगपती हा मान दिला होता. त्याच मासिकाने २००३ साली गोनची अमेरिकेबाहेरील जगातील दहा वजनदार उद्योगपतींमध्ये गणना केली होती. ब्रिटनच्या 'फायनॅन्सिअल टाइम्स' या वृत्तपत्र आणि 'प्राइसवॉटरहाऊसकूपर्स' या सल्लागार कंपनीने केलेल्या संयुक्त पाहणीत अनेक वर्षे गोनचा जगातील पहिल्या पाच उद्योगपतींमध्ये उल्लेख केला. टाइम मासिकाने २००१ साली जगातला सर्वात महत्त्वाचा उद्योगपती म्हणून त्याचा गौरव केला.

२००५ साली कर्कोरिअन नावाचा अब्जाधीश जनरल मोटर्सचे १०% शेअर्स विकत घेऊन त्या कंपनीच्या बोर्डचा सभासद झाला. त्याने जनरल मोटर्स आणि निसान एकत्र करून गोनला त्यांचा प्रमुख करायची योजना मांडली होती. ती जरी यशस्वी झाली नाही तरी त्या काळात गोनच्या नावाचा दबदबा किती होता ते कळून येतं. गोनबरोबर स्वत:चा फोटो काढायला सर्वसामान्य माणसं तर कमालीची उत्सुक असतच पण जपानच्या पंतप्रधानांसकट सगळे राजकारणी सुद्धा आपली 'आधुनिकता' सिद्ध करण्यासाठी त्याच्या मागे लागत. इतर देशातही तोच प्रकार. या सगळ्यांचा परिणाम म्हणून त्याच्याकडे तीन देशांचे पासपोर्ट होते. (त्याला खूप प्रवास करावा लागतो म्हणून फ्रान्सने त्याला दोन पासपोर्ट दिले होते!)

गोनचं कुटुंब मध्यपूर्वेतील लेबनॉन देशातले. इथे अशिया आणि युरोप खंड एकत्र येतात. इथे इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म एकमेकाला भिडतात. साहजिकच युद्ध या भागाच्या पाचवीला पूजलेले. त्यामुळे या देशाची वस्ती एक कोटीच्या आसपास असली तरी ती कायम दहा–वीस टक्क्यांनी मागे–पुढे होत असते. नुकत्याच झालेल्या यादवी युद्धात (१९७५–१९९०) मृत, जखमी आणि परागंदा झालेल्यांची एकूण संख्या दहा लाखांच्या आसपास आहे. तरीसुद्धा इथल्या, म्हणजे लेबनॉन–सिरीया–इस्राइल या भागातल्या, मातीचा काय गुण आहे हे कळत नाही. इथले लोक देशाबाहेर जाऊन आपल्या संख्येच्या मानाने अनेक पटीने पराक्रम गाजवतात. (न्यूयॉर्क टाइम्सचा सर्वात मोठा मालकी हक्क लेबनीझ–मेक्सिकन माणसाकडे आहे, आणि दुसरा मोठा एक अमेरिकन ज्यू माणसाकडे!) अनेक संस्कृतींचा संगम हे त्याच्यामागचे एक कारण असू शकेल.

या भागातल्या लोकांच्या पूर्वजांना इतिहास 'फिनिशन्स' या नावाने ओळखतो. त्यांनी सर्व जगाला अक्षरलिपीची ओळख करून दिली. आज जगभरचे लोक वापरतात त्या सर्व अक्षरलिप्यांचं (Alphabets) मूळ त्यांच्या अक्षरलिपीत आहे. लेबनॉन हा गुणी पण कमनशिबी देश सतत कुणा ना कुणाच्या अधिपत्याखाली आलेला आहे. पहिल्या इस्लाम–ख्रिश्चन धर्मयुद्धानंतर (अकरावे शतक) सबंध मध्यपूर्व युरोपच्या ताब्यात गेला. दुसऱ्या धर्मयुद्धानंतर तो स्वतंत्र झाला, पण लेबनॉन सोडून. तिथले फ्रेंच तिथेच ठिय्या मांडून बसले. त्यामुळे लेबनॉनवर फ्रेंच संस्कृतीचा फार मोठा पगडा आहे.

लेबनॉनने ख्रिश्चन धर्म स्वीकारला, पण तो फ्रान्सच्याच काय

पण रोमच्यासुद्धा काही शतके आधी! म्हणून ते रोमच्या पोपला जरी मानत असले तरी त्यांच्या प्रथा वेगळ्या, त्यांचे संस्कार वेगळे. त्यांना मॅरनाइट ख्रिश्चन अशी संज्ञा आहे. (या लोकांना भारतात सिरीयन ख्रिश्चन म्हणतात. ते केरळमध्ये सापडतात.) हे त्यांच्या चर्चमध्ये अजूनही येशूच्या वेळची सिरिॲक भाषा वापरतात. रोजच्या व्यवहारात मात्र पैगंबराबरोबर आलेली अरबी भाषा.

गोनचं कुटुंब मॅरनाइट ख्रिश्चन. कार्लोसच्या आजोबांचं नाव 'बिचारा.' (हा अरबी शब्द आहे!) याच्या लहानपणी लेबनॉनवर तुर्कांचं राज्य होतं. सर्व देश दैन्य आणि दारिद्र्यामध्ये खितपत पडलेला. पण गोनकुटुंबाचं रक्त स्वस्थ बसणाऱ्यांपैकी नव्हतं. बिचारा गोन हा 'कर्ता पुरुष' वयाच्या तेराव्या वर्षी नशीब आजमवायला घराबाहेर पडला. एकटाच! डोंगर चढून आणि वीस मैल चालून बैरूत या शहरी पोचला. तिथे बोट पकडून जगाच्या दुसऱ्या टोकाला मसापा या ब्राझीलमधल्या बंदरात येऊन पोचला. खिशात दमडी नाही. भाषा येत नाही. परका देश! ओळख ना पाळख. भरमसाठ रोगराई. पण बिचाऱ्याचं धाडस प्रचंड. नद्यानद्यांतून हजारो मैल प्रवास करून ब्राझील देशाच्या दुसऱ्या टोकास पोचला. अगदी बोलिव्हीया या देशाच्या सीमेपर्यंत. घनदाट अरण्यात. तिथे भरपूर उद्योग केले, भरपूर पैसे कमावले.

जॉर्ज हा त्याच्या अनेक मुलांपैकी एक. त्याच्यात बापाचा बेडरपणा आला होता. पण विधीनिषेध नव्हता. हिरे, सोनं, ड्रग्स यांचं स्मगलिंग हा त्याचा व्यवसाय. त्याच्या मुलांना ब्राझीलमधलं हवापाणी सोसवेना, म्हणून तो लेबनॉनमध्ये परत आला. तेव्हा कार्लोस सहा वर्षाचा होता. लेबनॉनमध्ये सबा नावाच्या एका सुंदर गायिकेच्या मागे जॉर्ज लागला. तिच्या मागे लागलेले तसे अनेक जण होते. त्यांत तिच्याविषयी विशेष आस्था बाळगणारा एक पाद्री होता. त्याच्याबरोबर जॉर्जचा राडा झाला आणि जॉर्जने त्याचा खून केला.

अर्थातच जॉर्ज तिथून पळाला. पुढे अनेक वर्षे तो भूमिगत होता. पण शेवटी पोलिसांना सापडला आणि त्याला फाशीची शिक्षा झाली. पण त्याने कुठेतरी पैसे दाबले आणि शिक्षा फाशीऐवजी कैदेची केली. त्यानंतर याला पैसे दे, त्याला पैसे दे असं करत त्याने आपली कैद बऱ्याच प्रमाणात सुखाची केली. या वेळी कार्लोस शिकत होता. १९७५ साली देशात यादवी युद्ध चालू झाल्यावर जॉर्जला संधी मिळाली आणि तो ब्राझीलमध्ये पळाला. त्याचा पत्ता लावायचा कुणी प्रयत्न केला नाही. पण तिथे तो २००८पर्यंत तरी जिवंत होता.

कार्लोस पॅरिसच्या १७ व्या शतकात स्थापन केलेल्या प्रतिष्ठित अशा 'एकोल पॉलिटेक्निक'-मधून १९७४ साली इंजिनियर झाला. इथून पुढची त्याची कारकीर्द चढत्या भाजणीची होती. आधी मिशलिन ही टायर कंपनी. मग रिनॉल्ट-फ्रेंचमधील उच्चार 'रिनो'-ही नुकतीच खाजगीकरण केलेली फ्रेंच कार कंपनी. नंतर रिनॉल्टने ताब्यात घेतलेली 'निसान' ही जपानी कार कंपनी. त्यानंतर अनेक वर्षांनी या दोन कंपन्यांनी ताब्यात घेतलेली 'मित्सुबिशी' कार कंपनी.

निसान ही टोयोटा, हॉन्डा या गाड्यांसारखं आज मोठं प्रस्थ असली तरी गोनच्या ताब्यात आली तेव्हा ती गाळात गेलेली होती. गोनने तिचं मूळ जपानी कल्चर संपूर्णपणे बदलून तिला अमेरिकन बनवलं. 'कायम नोकरी-कायम निष्ठा' या परंपरेतल्या हजारो चाकरमान्यांच्या नोकरीवर गदा आणली. कंपनीतल्याच नात्यागोत्यातले (याला जपानी भाषेत Keirestu म्हणतात.) पुरवठादार न घेता बाहेरचे अधिक स्वस्तातले पुरवठादार घेतले. योग्य तपासणीशिवाय गाड्या बाहेर काढल्या. कार विक्रेत्यांवर प्रलोभन-दडपणं आणून येनकेन प्रकरणे विक्री वाढवण्यास प्रवृत्त केले. असल्या उपायांनी अल्पकालीन फायदा नक्कीच होतो. आणि तसा तो झालाही. गोनला गमतीत अर्धी इंग्लिश आणि अर्धी फ्रेंच 'La Cost Killer' अशी उपाधी मिळाली.

कार्लोस गोनच्या मॅनेजमेंट पद्धतीचा अभ्यास करणारी वीसेक पुस्तके प्रसिद्ध झाली. तो आता नवीन मॅनेजमेंट गुरू झाला होता. जुने गुरू डब्यात गेले. जुन्या Just in time सारख्या उत्पादनपद्धती कालबाह्य झाल्या किंवा त्यांना नवीन कपडे चढवले गेले. १९८०च्या दशकात जपान हा सगळ्यांचा आदर्श देश होता. आता जपानी मॉडेल मागे पडले आणि जपानी उद्योगधद्यांचा उद्धार करायला एका परदेशी माणसाला पाचारण करावं लागलं. अशा माणसाला की ज्याला जपानी भाषासुद्धा येत नव्हती! (हे भारतात चालते, पण जपानमध्ये नाही.) सगळ्यात कहर म्हणजे त्याने कंपनीची व्यवहार-भाषा जपानी बदलून इंग्लिश केली!

२०१२ साली कार्लोसने आपल्या पहिल्या बायकोला सोडले, आणि चार वर्षांनी त्याच्यापेक्षा पंधरा वर्षे लहान असलेल्या एका लेबनीज-अमेरिकन बाईशी तिच्या पन्नासाव्या वर्षी लग्न केलं. तो दिवस त्यांनी फ्रान्सच्या व्हर्सायच्या राजवाड्यात साजरा केला. काही कोटी डॉलर्स खर्च झाले. पण ते निसान कंपनीचे! कार्लोसच्या ऱ्हासाला इथून सुरुवात झाली, असं म्हणायला हरकत नाही. नंतर एकदा अमेरिकेच्या SEC (Security Exchange Commission) ने कार्लोसला आपलं उत्पन्न कमी दाखवलं या आरोपावर दहा लाख डॉलर्सचा दंड केला. तो आरोप त्याने कबूल न करता भरला.

त्याच्यावर आणखी अनेक आरोप आहेत. तो कंपन्यांचा

सीईओ आणि बोर्ड चेअरमन असल्याने स्वत:वर वाटेल तेवढा खर्च करायला मोकळा होता. आणि तसा त्याने केलाही. तीन कंपन्या मिळून तो वार्षिक दोन कोटी डॉलर्स खेचत होता! त्याने आणखी एक कंपनी हॉलंडमध्ये काढली. ती कशाकरता याचा जरी कुणाला पत्ता नसला तरी त्या कंपनीच्या नावाने तो आणखी पगार घेत होता. त्यानंतर कंपनीच्या खर्चात घेतलेली चार-पाच देशातली आलिशान घरे. त्यात केलेली महागडी अंतर्गत सजावट. एकेक झुंबराची किंमत ७०,००० डॉलर्स! ''मी या कंपन्यांना गटारातून वर काढले. मग मिळालेल्या धनातले मी थोडे घेतले तर काय बिघडले? शेअरहोल्डर्सनी इकडचं बूड तिकडे न करता एवढं कमावलं. तेही माझ्या मेहेरबानीने,'' असे विचार कार्लोस गोनच्या डोक्यात असण्याची शक्यता आहे. असो. सगळ्या गोष्टींची शहानिशा अजून व्हायची आहे.

'गोनची कैद आणि सुटका' या नाट्यमय कहाणीची सुरुवात अशी झाली. आतल्या कुणी तरी जाणकार माणसाने आपलं नाव बाहेर येणार नाही या अटीवर जपान सरकारकडे तक्रार केली. २०१८ ऑगस्टमध्ये अंतर्गत चौकशी चालू झाली. चौकशीच्या कामासाठी कुणाला घ्यायचे हा प्रश्न होताच. सगळेच गोनचे सहकारी किंवा त्याच्या हाताखालचे नोकर. त्याच्या मिळकतीच्या बऱ्याचशा कागदावर औपचारिकरित्या तरी त्यांच्या सह्या. चौकशीत तेही अडकणार. सुदैवाने माफीच्या साक्षीदाराला संरक्षण द्यायचा कायदा जपानमध्ये मंजूर झाला होता. अंतर्गत चौकशीत सकृतदर्शनी गुन्हा झाल्याचं वाटत होते. कंपनीने कच्चा मसुदा तयार केला. आपल्या मताला दुजोरा मिळावा म्हणून त्यांनी खाजगी प्रॅक्टिसमधल्या माजी सरकारी वकीलांकडे तो पाठवून दिला. त्यांच्याकडून हिरवा सिग्नल मिळाल्यानंतर कागदपत्रं पोलिसांकडे पाठवली.

१९ नोव्हेंबर २०१८. जपानच्या पोलिसांच्या विशेष पथकाने पाऊल उचलायचं ठरवलं. सगळं गुप्तपणे करायचं होतं. जरा चाहूल लागली तर दोन्ही पक्षी उडून जायची शक्यता होती. दुसरा पक्षी होता कार्लोस गोनचा अमेरिकन वकील ग्रेग केली. हाही बोर्ड मेंबर होता. निसान कंपनीत तर कंपनीचा सीईओ साइकावा सोडून कुणालाही कसलीही खबर लागून द्यायची नव्हती. साइकावा हा गोनचा जुना सहकारी. कधी कनिष्ठ तर कधी बरोबरचा. एके काळचा एकनिष्ठ, पण गेले काही वर्षे दुखावलेला. कंपनीचा सीईओ हा गोनचा तीन वर्षांपूर्वीचा हुद्दा. आता गोन फक्त बोर्ड चेअरमनच होता.

साइकावा त्या वेळी फ्रेंच चेंबर ऑफ कॉमर्सचा शंभरावा वार्षिक दिन साजरा करायाला त्यांच्या ऑफिसला गेला होता. तिथे त्याने नेहमीचे निसान-रेनॉल्डच्या दोस्तीचं चऱ्हाट लावलं. त्याच्या मनात कसल्या भावनांचा कल्लोळ होत असेल? गोनच्या निष्काळाजीपणामुळे जवळजवळ दहा लाख गाड्या परत आल्या होत्या आणि त्याची जबाबदारी साइकावाच्या माथ्यावर आली होती आणि त्याला कंपनीतून डच्चू मिळणार असल्याच्या अफवा पसरत होत्या. त्याने तर गोनला बसखाली ढकलून द्यायची तयारी केली होती. वीस वर्षांची मैत्री संपुष्टात आली होती. वेळच अशी आली होती की कोणी कोणाचा मित्र नव्हता.

पोलिसांच्या विशेष पथकाने अशी तयारी केली होती की गोन आणि केली यांना एकाच वेळी पकडायचं. म्हणजे एकाच्या अटकेने दुसरा सावध व्हायला नको. केलीच्या पाठीच्या कण्यांचं मोठं ऑपरेशन करायचं असल्यामुळे त्याला जपानला यायचं नव्हतं. त्याच्याकरता कंपनीचं खास विमान पाठवलं. गोनचं विमान उतरलं तेव्हा केलीची गाडी टोकियो शहराच्या दिशेने येत होती. गोनला विमानाच्या खिडकीतून तीन अधिकारी व्यक्ती विमानाकडे येताना दिसल्या. तो विमानाच्या जिन्यावरून खाली उतरला. ''आम्ही तुला अटक करायला आलो आहोत,'' पोलिस म्हणाले. गोन चिडला, त्याने त्रागा केला, वाद घातला. कशाचाही फायदा झाला नाही. तासभर हुज्जत घातल्यानंतर तो शरण आला.

इकडे केलीची गाडी ट्रॅफिकमध्ये अडकली. पोलिसांना धडकी भरली. त्यांना फोन आला. गाडी बाजूला घ्या आणि त्याला असेल तसाच पकडा. ती रात्र दोघांनी पोलिस कोठडीतील दगडवीटांच्या पलंगावर काढली. ती रात्र, आणि त्यानंतरच्या पुढील अनेक रात्री. केलीची काही दिवसात जामीनावर आणि 'जपान सोडून जाणार नाही' या बोलीवर डिसेंबरमध्ये सुटका झाली. (त्याला पाठीचं ऑपरेशन जपानमध्येच करावं लागलं.) पण गोनला मात्र आत सडवला. सरकारच्या दृष्टीने त्याच्यावरचे आरोपही गंभीर होते. एक आरोप म्हणजे त्याने त्याचं आजच्या उत्पन्नातले आठ कोटी डॉलर्स रिटायर्ड व्हायच्या वेळी दाखवले. दुसरा आरोप म्हणजे त्याने आपला सट्टाबाजारात झालेला तोटा कंपनीच्या खात्यावर ढकलला. बाकीचे आरोप म्हणजे कंपनीत वेगवेगळ्या प्रकारच्या अफरातफरी.

पकडल्यापासून काही तासातच साइकावाने वार्ताहरांना बोलवून त्यांना गोनच्या अटकेची बातमी दिली. कार्लोस गोनच्या दीर्घ कारकीर्दीची काळी बाजू आज आपल्यासमोर येत आहे, तो म्हणाला. तीन दिवसांनी निसानच्या बोर्डाने एकमताने गोनला कामावरून कमी केले. रिनॉल्टने मात्र ताबडतोब कारवाई करायचं टाळलं. त्यांचं म्हणणं आम्ही भरपूर चौकशी केली, पण आम्हाला गैर असं काही सापडलेलं नाही! तरीसुद्धा आम्ही चौकशी चालू ठेवणार आहोत. २३ जानेवारीला शेवटी त्यांना नक्की काय सापडलं कळत नाही, पण त्या दिवशी रिनॉल्टने गोनला कामावरून काढलं.

जाणकारांना माहीत आहे की फौजदारी गुन्ह्यात आरोपीचं पहिलं तत्त्व म्हणजे तुम्ही कितीही निष्पाप असलात तरी पोलिसांपासून लांब राहायचं. (जगातल्या सर्व देशांना हे लागू आहे.) गुन्हा सिद्ध होईपर्यंत निर्दोष, हे फक्त बोलण्यापुरतं. प्रत्यक्षात एकदा तुम्ही पोलिसांच्या हातात सापडलात की उसाचा चरक परवडला म्हणण्याची पाळी येते. जपानही त्याला अपवाद नाही. शिवाय जपानमध्ये न्यायालयात न्याय कितपत मिळेल हीसुद्धा शंका आहे. उपलब्ध असलेल्या आकडेवारीप्रमाणे सरकारी वकील एक हजारपैकी फक्त चार खटले हरतात! (हरणारे बहुतेक हाराकिरी करत असतील!)

पकडल्यापासून गोनला दहा फूट बाय सात फूट आकाराच्या कोठडीत ठेवले. अधूनमधून तासन्तास चौकशीकरता त्याला बाहेर काढायचे. तुरुंगात किंवा चौकशीच्या खोलीत त्याला कागद-पेन्सिल बाळगायला बंदी होती. तारखा मिळतील तशा त्याच्या कोर्टातल्या फेऱ्या चालल्या होत्या. वर्तमानपत्रांतून दररोज त्याच्यावरील नवीन सनसनाटी आरोपांची माहिती यायची. त्याचे चाहते गोंधळून गेले होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे निसानसारख्या कंपनीकडे डझनांनी ऑडिटर्स आहेत, वकीलांच्या तर फलटणीच्या फलटणी उभ्या आहेत, आणि पोलिसांच्या मते गोन जर असे महाभयानक गुन्हे करत होता, तर आतापर्यंत ते कसे काय लपून राहिले? आणि लपून राहिले तर त्याची जबाबदारी कुणाची? त्यांच्या मते ते सर्व त्याच्याविरुद्ध रचलेले कुंभाड होते. त्यांच्या दृष्टीने तो एक शापित यक्ष होता.

२२ जानेवारी २०१८ मध्ये त्याने जामीन मिळण्यासाठी अर्ज केला. तो नाकारला गेला. जामीन मिळाला की ताबडतोब फ्रेंच दूतवासात जायचं. तिथून दूतवासाच्या विमानाने फ्रान्सला जायचं, इमॅन्युअल मॅक्रॉनचे पाय धरायचे आणि राजनैतिक संरक्षण मिळवायचा अशी एक योजना ठरत होती. पण जामीनच मिळाला नाही, आणि त्या योजनेचा बोऱ्या वाजला.

दर जानेवारी महिन्यात तो स्वित्झर्लंडमधल्या डाव्होस या तीर्थक्षेत्राची वारी करत असे. तिथल्या World Economic Forumमध्ये भाग घ्यायला जगभरचे बडेबडे उद्योगपती, CEO's, राजकीय नेते हजेरी लावतात. तिथे गोन बड्या लोकांना भेटायला, टीव्हीवरती मुलाखत द्यायला, पॅनल चर्चांमध्ये भाग घ्यायला पायाला भिंगरी लावल्यासारखा धावत असे. या वर्षी ते नाही. किंबहुना यापुढे केव्हाच नाही! फ्रान्सच्या अर्थमंत्र्यानं काही अपरिहार्य कारणामुळे कार्लोस गोन येऊ शकणार नाही असं जाहीर केलं.

गोनने कॉलेजमध्ये फ्रान्स काफ्काची 'खटला' ही जर्मन गोष्ट (Der Process) वाचली होती. त्यातल्या नायकाला असाच पोलिसचौकीत अडकवून ठेवलेला असतो. अनेक दिवस, अनेक महिने, अनेक वर्षे त्याचं वेळेचं भानच सुटलेलं असतं. मध्येच केव्हा तरी अधिकारी येऊन असेच उर्मट, खुळचट प्रश्न विचारायचे. ''हो पण,'' गोन स्वत:शीच म्हणायचा. ''ती गोष्ट एकोणिसाव्या शतकातील. आणि तो नायक साधा माणूस. हे एकविसावे शतक आहे. आणि मी तर आहे जगप्रसिद्ध माणूस. जपानची १२ कोटी प्रजा मला देवता मानते. वेळ पडली तर मी फ्रान्सच्या अध्यक्षाला मध्ये पडायला सांगेन. नाही तर ट्रम्पला!''

प्रत्यक्षात मात्र कुणाचाच मदतीचा हात पुढे येत नव्हता. गोनवरचे आरोप जरी क्षणभर खरे म्हटले तरी तसले आरोप कंपनी प्रमुखावर काही प्रथमच होत नव्हते. आतापर्यंत त्यांचा शेवट म्हणजे कंपनी त्याला सोडून जायला सांगते आणि 'नुकसानभरपाई' म्हणून काही कोटी डॉलर्स देते. बोइंग कंपनीच्या सीईओचे ताजे उदाहरण समोर आहे. त्याच्या बेजबाबदारपणामुळे दोन विमानं पडली. साडे तीनशे माणसं मेली. त्याला कंपनीने राजिनामा द्यायला सांगितला आणि जाता जाता त्याच्या हातावर ६ कोटी डॉलर्स चिकटवले! मग कार्लोस गोनलाच का वेगळं प्रमाण?

पकडल्या दिवसापासून शंभर दिवसांनी गोनला बाहेर काढले आणि टोकीयोमधील एका छोट्या अपार्टमेंटमध्ये राहायला परवानगी दिली. पण तेही अनेक अटींवर. (१) त्याच्यावर कायम पाळत ठेवली जाईल. (२) त्याला त्याचे वकील सोडून कुणाला भेटता यायचं नाही. (३) इंटरनेट आणि फोन वकीलाच्या ऑफिसमधूनच करायला मिळतील. (४) जजच्या परवानगीशिवाय बायकोला फोन लावता यायचा नाही. जजने तशी परवानगी फक्त दोनदाच दिली: नोव्हेंबर २०१९ आणि २४ डिसेंबर २०१९ (ख्रिसमसच्या आदल्या रात्री).

ख्रिसमसच्या आधल्या दिवशीच एक मोठा बॉंब पडला होता. सरकारी पक्षाने जजकडे आरोपीच्या चौकशीसाठी अधिक वेळ देण्याची विनंती केली होती. खटल्याच्या सुनावणीसाठी फेब्रुवारी २०२१ मधली तारीख मागून घेतली. या गतीने खटला संपायला पाच वर्षे जातील, त्याचे वकील म्हणाले आणि त्याचा धीर सुटला. सुदैवाने त्याच्या बायकोची ऑगस्ट महिन्यातच सुटका झाली होती आणि ती तेव्हापासून लेबनॉनमध्ये होती. ती फोनवर त्याला म्हणाली, ''धीर धर. आता आपली ग्रहदशा संपत आली आहे.''

लेबनॉनमध्ये मुसलमान विरुद्ध ख्रिश्चन असे यादवी युद्ध १९७५ साली चालू झाले. त्यामध्ये इस्राइल, सिरीया आणि पॅलेस्टिनी स्वातंत्र्यसेना यांनी प्रवेश केला. १९७९ मध्ये इराणमध्ये राज्यक्रांती झाली आणि मुल्लांचं राज्य आले. लेबनॉनच्या यादवी युद्धात तेही घुसले आणि युद्ध अधिकच हिंसक झाले. संयुक्त राष्ट्रांच्या नावाने अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि इटली हे चार देश शांतता प्रस्थापित करायला १९८२ मध्ये मैदानात उतरले. साधारण वर्षाभरातच एका आत्मघातकी पथकाने बॉंबने भरलेले टॅंक घेऊन अमेरिकेच्या सैन्यावर हल्ला केला. त्यात हजारच्या आसपास सैनिक मेले. अमेरिकेच्या अध्यक्षांनी एक विशेष पथक सोडून सर्व सैन्य परत बोलावले.

ते विशेष पथक म्हणजे अमेरिकन ग्रीन बरेज् (Green Berets), म्हणजे हिरव्या लोकरी टोप्या. हे साधारण कमांडो सारखे पण दीर्घकाल काम करणारे. अपरंपरागत किंवा रूढीबाह्य युद्द करण्याचं शिक्षण घेतलेले. परक्या देशात जाऊन स्थानिक लोकांच्या साहाय्याने युद्ध करणारे. वैध-अवैध यांचा उहापोह न करणारे. वेळ पडली तर बायका-मुलांवरसुद्धा बेछूट गोळीबार करण्याची मानसिक तयारी असलेले. धाडसी, क्रूर पण कर्तव्यनिष्ठ. असे जे सैनिक अमेरिकेने मागे ठेवले त्यात मायकल टेलर नावाचा एक जवान होता.

टेलरचं लेबनॉनमधल्या एका स्थानिक मुलीवर प्रेम जडलं. ती धर्माने मॅरनाइट ख्रिश्चन होती. त्याने तिच्याशी लग्न केलं आणि तिला घेऊन अमेरिकेत बॉस्टन या गावी आला. पण सर्वसामान्य माणसासारखी नियमित नोकरी मिळावी असं ना त्याचं शिक्षण ना

त्याचा अनुभव. कायदेशीर आणि बेकायदेशीर यांच्यामधल्या अस्पष्ट क्षेत्रात त्याने उद्योग करायचं ठरवलं. कंपनीचं नाव American Internation Security Corp. काम विविध प्रकारची खाजगी बॉडीगार्ड पुरवणं, अमेरिका किंवा परक्या सैन्यांची कॉन्ट्रॅक्ट्स घेणे, पळवून नेलेल्या (Kidnapped) लोकांची सुटका, ड्रग्सचा व्यापार, अफगाणिस्तान, इराक असल्या युद्धात असलेल्या देशात हेरगिरी, खाजगी डिटेक्टिव्ह, सरकारी नोकरांना लाच देण्यासाठी मध्यस्थी, वगैरे वगैरे.

लेबनॉनच्या यादवी युद्धात टेलरची जॉर्ज झायेक नावाच्या मॅरनाइट ख्रिश्चन सैनिकाची ओळख झाली. झायेक हा मुळचा हिऱ्यांचा व्यापारी. युद्धात तो पाय गमावून बसला आणि टेलरबरोबर बॉस्टनला गेला. झायेक आणि कार्लोस गोन यांचा एक सामाईक मित्र बैरूत येथे होता. त्याने झायेकला गोनच्या परिस्थितीची कल्पना दिली. गोनला सोडवता येईल का? झायेकने टेलरबरोबर चर्चा केली. काम घ्यायचं ठरलं. किंमत दीड कोटी डॉलर्स. निम्मे आधी निम्मे नंतर. मुदत दोन महिने. मुख्य प्लॅन संगीताच्या वाद्याच्या खोक्यातून पाच फुट सात इंचाच्या गोनला प्रायव्हेट विमानातून स्मगल करायचं.

दोन महिने सुटकेसाठी लागणाऱ्या प्राथमिक तयारीसाठी होते. विमान चार्टर करणारी एक बोगस कंपनी दुबईमध्ये स्थापन करून दोन तीन विमानं चार्टर करायची. मग जेव्हा खरंच विमानं लागतील तेव्हा शंका येणार नाही. जपानमधल्या सर्व विमानतळांची झाडी करायची. पाठलाग करणाऱ्यांची दिशाभूल करायला कार्लोस गोनचं विमान थेट लेबनॉनला न नेता मध्ये एके ठिकाणी थांबवायचं. त्यासाठी अनेक देशातून कमीत कमी कटकटीचा एक देश निवडायचा.

जपानमधला ओसाका विमानतळावर फार मोठ्या हँड लगेजसाठी स्कॅनर नव्हता. (मोठं हँड लगेज म्युझिकल वाद्य सोडून सहसा कुणालाही लागत नाही.) म्हणून तो विमानतळ निवडला. मध्ये थांबण्यासाठी तुर्कस्तान देश निवडला. तिथे पैसे देऊन वाटेल ती कामे होतात. दोन भाड्याची विमाने राखून ठेवली. २९ डिसेंबरला गोनच्या अपार्टमेंटमध्ये सकाळी अकरा वाजता एक कॉन्सर्ट योजलं. गोन त्यांच्याबरोबर बाहेर पडला. त्या वाद्यवृंदातल्या दोन चेलो वादकांना घेऊन बाजूच्या 'ग्रँड हयात'मध्ये जेवायला गेला. हे हॉटेल एका गजबजलेल्या मॉलला लागून आहे. हॉटेलमधून मॉलमध्ये दोन चेलो वादक आणि एक हवेतल्या प्रदुषणापासून आणि जंतूंपासून संरक्षण म्हणून कृत्रिम मुखवट घातलेले एक सज्जन लगबगीने दाखल झाले. मॉलच्या खाली असलेल्या रेल्वे स्टेशनमध्ये ओसाकाच्या दिशेने जाणारी बुलेट ट्रेन नुकतीच येत होती. त्यात ते बसले. ती ट्रेन ओसाका विमानतळाकडे निघाली.

पुढचं सर्व बिनचूक पार पडलं. रात्री ११ वाजता विमानाने हवेत उडी घेतली. बारा तासांनी इस्तंबूलचे केमाल आतातुर्क विमानतळ. ३० डिसेंबर रोजी सकाळी बैरूतचं रफिक हारीरी विमानतळ. त्याचे पासपोर्ट जपान सरकारने जप्त केले असले तरी त्याच्याजवळ फ्रान्सचा दुसरा पासपोर्ट होता. खरं म्हणजे त्याचीही गरज नव्हती. तो लेबनॉनचा हीरो होता. त्याचं चित्र त्या देशाच्या पोस्टाच्या तिकिटावर पण आलं होतं. सकाळच्या न्याहारीच्या वेळी कार्लोस आपल्या बैरूतच्या घरी पोचला.

पण ही कहाणी इथे संपत नाही. गोनने मुळात गुन्हा केला की नाही हे वादग्रस्त असेल, पण तो चौकशी चालू असताना देश सोडून पळून गेला हा गुन्हा नक्कीच आहे. जपान सरकारने त्याच्यावर इंटरपोलची रेड नोटिस काढली आहे. त्याच्या बायकोवर वॉरंट काढलं आहे. आज ना उद्या ज्यांनी त्यांना मदत केली त्यांचीही वरात निघणार आहे. आपला नाइलाज झाला हे गोनचं म्हणणं कायदा मानणार नाही. पण त्यापलीकडे लोकांचा म्हणून न्याय असतो. गोनला पुन्हा अंधाऱ्या कोठडीत टाकलं तर लोक जाळपोळ करतील.

फ्रेंच सरकारही गोनला अनुकूल नाही. व्हर्सायच्या राजवाड्यात केलेली पार्टी फ्रेंच सरकारला फार पसंत पडलेली नाही, असं दिसतंय. नाही म्हटलं तरी रिनॉल्ट कंपनीमधलं १/३ भांडवल फ्रेंच सरकारचं आहे. फ्रान्समध्ये सध्या अतिश्रीमंतांविरुद्ध असंतोष खदखदत आहे. गेले सव्वा वर्ष 'येलो व्हेस्ट्स' हे निषेध मोर्चे चालू आहेत. अशा परिस्थितीत सरकारने एका अब्जाधीशाला वाचवावं असं किती लोक म्हणणार आहेत? लेबनॉनचं सरकार तरी त्याला कितपत मदत करणार आहे? एक तर त्या देशात आज स्थिर सरकारही नाही. दंगेधोपे चालले आहेत. ज्या देशात गोन असेल तिथे आंतरराष्ट्रीय दबाव येणार आहे. त्याची घरे, संपत्ती सर्व जगभर विखुरली आहे. घरे जप्त केली जातील, संपत्ती हडप होईल, बँकेतली खाती गोठवली जातील.

लोभ आणि गर्व हे षड्रिपूंपैकी आहेत, असं आपण मानतो. ग्रीक आणि रोमन लोकांची यादी जरा मोठी आहे. त्यात शत्रू सात आहेत. थॉमस अक्वायनस या ख्रिस्ती तत्त्ववेत्त्याने यांनाच Seven deadly sins म्हटलं आहे. लोभ (avarice) आणि गर्व (hubris) हे त्यामध्ये आहेत. इसवीसनापूर्वी हजार वर्षे आधी लिहिलेल्या ग्रीक पुराणात डेडलस आणि इकरस या बापमुलाची गोष्ट सांगितली आहे. बाप इंजिनिअर. मुलगा 'मला उडायचं आहे तेव्हा मला पंख बसवून द्या' म्हणून हट्ट करतो. बाप मेणाचे पंख बसवतो आणि सांगतो, ''मुला, आहे त्यात समाधान मान. गर्व करू नकोस आणि फार उंच उडू नकोस.'' मुलगा हा उपदेश विसरतो आणि गर्वाने वर जातो. तिथे सूर्याच्या उष्णतेने त्याचे पंख वितळतात, आणि तो जमिनीवर कोसळतो.

यात कार्लोस गोनला आणि आपल्या सगळ्यांनाही धडा आहे.

– डॉ. मोहन द्रविड
Tel. : 98205 63130
mohan.drawid@gmail.com

महिला ओबामा कमला हॅरिस

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीची रणधुमाळी जानेवारी २०१९ मध्येच सुरू होऊन अनेक लहान-मोठ्या डेमोक्रॅटिक पक्षांच्या उमेदवारांनी रिंगणात टोप्या फेकल्या. निवडणुकीचे पडघम अकाली वाजण्याचं कारण असं की ट्रम्पना हरवणं फार कठीण गोष्ट नाही, असं गोंडस स्वप्न हा पक्ष बघतो. त्यातला एक तर कुणी कधी न ऐकलेल्या गावाचा (साऊथ बेंड) समलिंगी महापौर आहे, तर बऱ्याचशा महिला सिनेटर्स आहेत. अधिसभेत (Senate) वायूभारित विधानं करणं, वायफळ बडबड करणं हे त्यांच्या अनुभवांचं गाठोडं. आतापर्यंत जाहीर केलेल्या उमेदवारांत फार थोड्यांना कार्यवाही (Executive) अनुभव आहे. अमेरिकन जनता असा अनुभव असलेल्या गव्हर्नर्सची (जॉर्ज बुश, क्लिंटन) व फार कमी सिनेटर्सची (केनडी व त्यानंतर ४० वर्षांनी ओबामा) निवड करते, पण या इतिहासाकडे दुर्लक्ष करून आतापर्यंत १४ पेक्षा अधिक दावेदारांनी निवडणुकीचा बिगूल वाजवला. यातले सर्वच गंभीर नाहीत. काही केवळ प्रसिद्धीलोलुप, तर दुसरे उपाध्यक्षांच्या पदासाठी निवड व्हावी म्हणून प्रकाशाच्या झोतात राहण्यासाठी धडपड करणारे. यातला कचरा गाळून टाकण्यासाठी डेमॉक्रेटिक पक्षाच्या कार्यकारिणीनं काही नियम नुकतेच जाहीर केले. जून-जुलै २०१९ मध्ये दूरदर्शनवर पहिली दोन चर्चासत्रे भरली. त्यासाठी बरीच कुतूहलता असल्यामुळे व्यापक प्रेक्षक वर्ग मिळेल अशी अपेक्षा होती; पण या चर्चासत्रात भाग घेण्याची संधी मिळून प्रसिद्धीच्या प्रकाशात झळकण्यासाठी काही निकष लावण्यात आले. तीन वेगवेगळ्या राष्ट्रीय सर्वेक्षणात दावेदाराला कमीत कमी १ टक्का मतं मिळवावी लागलीत. याशिवाय महाजालावर किमान ६५,००० देणगीदारांनी आर्थिक आधार दिल्याचा पुरावा द्यावा लागतो. ते एका राज्यातून आले नसून २० वेगवेगळ्या प्रांतांतून आलेले असणं आवश्यक आहे. दावेदाराला राष्ट्रीय पातळीवर किती पाठिंबा आहे हे यावरून सिद्ध होतं. अनेक जाहीर दावेदार अपात्र ठरतील. त्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागेल. त्यातली एक म्हणजे भारतीय वंशाची कमला हॅरिस.

अमेरिकन जिभेला 'कमला' हा शब्द उच्चारता येत नसल्यामुळे ते तिला 'कमाला' म्हणून संबोधतात. तेही अडखळत अडखळत. ५४ वर्षीय कमला २०१६ मध्ये कॅलिफोर्नियाची सिनेटर म्हणून निवडून आली आणि लगेच तिनं राष्ट्रीय पातळीवर आपली छाप उमटवली. तिला बराच करिष्मा, वक्तव्यचातुर्य व मतदारांशी नातं जोडण्याची कला आहे. या बाबतीत तिच्यात व ओबामांमध्ये बरंच साम्य आढळतं. म्हणून अनेक लोक तिला 'महिला ओबामा' म्हणतात. ओबामांनीही प्रथम सिनेटर म्हणून निवडून आल्यावर अध्यक्षपदाकडे झेप घेतली होती. दोघेही मिश्रवर्णीय आहेत.

कमलाची आई भारतीय. तिचं नाव श्यामला गोपालन. तिनं वयाच्या १९ व्या वर्षी दिल्ली विद्यापीठातून प्राथमिक पदवी मिळवल्यावर १९५८ मध्ये अमेरिकेचा रस्ता पकडला आणि युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कले येथे स्तन कर्करोग विषयात आचार्यांच्या पदवीसाठी नोंदणी केली. यातला विरोधाभास असा की, तिनं शिक्षण पूर्ण करून त्याच विषयात संशोधन केलं आणि पुढे त्याच रोगानं तिची शिकार केली.

त्यावेळी लग्नाळू मुलीला परदेशात एकटं पाठवण्याची पद्धत नसे. इरावती कर्वेंसारख्या दुर्मीळ, ध्येयनिष्ठ व धाडसी मुलीच असा संचार करीत. श्यामलाला शिक्षण संपल्यावर मायदेशी परतून चूल आणि मूल या धोपटमार्गानं प्रवास करून शास्त्रज्ञाचा गाडा पुढे ढकलायचा होता; पण मध्येच 'प्रेम' नावाची माशी शिंकली. ती एका जमेका या बेटातून आलेल्या कृष्णवर्णीय मुलाच्या फंदात पडली व लग्नबद्ध झाली. घरच्यांनी या विधीला आशीर्वाद दिला काय या विषयी कमलानं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ''The Truths We Told' या पुस्तकात मौन पाळलं. वडील आज स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर आहेत. पण कमलानं राष्ट्रीय पातळीवर मरूआना हा अमली पदार्थ वैधपणे उपलब्ध करावा अशी भूमिका घेतली. ती डोनाल्ड हॅरिसला मुळीच पसंत नाही. म्हणून आपण कन्येपासून या बाबतीत विलग झालो अशी त्यांनी घोषणा केली. हा पदार्थ सध्या बेकायदेशीर आहे. तरीही आपण कॉलेजात असताना त्याचा ओबामाप्रमाणे वापर केला असा तिनं एका मुलाखतीत बॉम्बगोळा टाकला.

पण अशा आंतरवर्णीय लग्नाचा इतिहास फार आशादायी नसतो. वयाच्या २५ व्या वर्षी श्यामलाला पदवी मिळाली आणि त्याचवर्षी कमलाचा जन्म (१९६४) मध्ये झाला. ती ७ वर्षांची

असताना आई-वडील प्रथम विभक्त झाले व शेवटी त्याची परिणती लग्नमोडीत झाला. ओबामांचंही असंच झालं. त्यांची आई गोरी व वडील केनया देशातले; पण त्याचं आपल्या वडिलांवर खूप प्रेम होतं. कमला मात्र आपल्या तीर्थरूपांचा पुस्तकात ओझरता उल्लेख करून त्यांना पूर्णपणे विसरते.

महत्त्वाचा प्रश्न असा की, अशा मिश्रवर्णीय लग्नातून निर्माण झालेली संतती कुठल्या वर्णाची होते? ओबामाला कुणीच 'गोरा' म्हणून ओळखणार नाही; पण तो १०० टक्के काळाही नाही. निवडणुकीच्या वेळी तो पुरेसा काळा नाही म्हणून अनेक कृष्णवर्णीयांनी विरोध दर्शवला होता; पण कमलाचा तोंडवळा कृष्णवर्णीय नाही. तिची त्वचा भारतीयांसारखी निमगोरी. किंबहुना तिनं कुंकू लावलं तर ती एक भारतीय नारी म्हणून स्वीकारली जाईल. शिवाय आईच्या भारतीय संस्कृतीनं तिच्यावर संस्कार केलेले असणारच. कारण तिच्या मनाची जडणघडण होत असताना वडील घरात नव्हते. असं असूनही तिनं आपण कृष्णवर्णीय आहोत असा नि:संदिग्ध निर्वाळा दिला व ख्रिस्ती धर्म स्वीकारला. केवळ मतलबी राजकारणापोटी हिंदू संस्कार डावलून ख्रिस्ती संस्कृती कवटाळली. हिंदू घरात वाढूनही तिनं तो धर्म का अंगीकारला नाही हे एक कोडं आहे. तिच्यात काळं रक्त आहे असं कमलाकडे बघून कुणीही म्हणणार नाही. विषम वर्णाचं द्वंद्व तिच्या मनात सुरू झालं का याविषयीही ती आपल्या पुस्तकात मौन पाळते. अशी सफेदी केलेली पुस्तकं राजकारणी निवडणुकीत उभं राहण्यापूर्वी नेहमी प्रसिद्ध करतात. सकारात्मक प्रतिमा बांधणीचा तो एक भाग म्हणण्यात येतो. ती एक विमा पॉलिसी समजतात. आयुष्यातलं काळंबेरं त्यात ओकल्यानं पुढे त्याविषयी प्रश्न व संशय उद्‌भवत नाही. ओबामांनी विद्यापीठामध्ये असताना अमली पदार्थाचं ग्रहण केलं अशी कबुली देऊन तो प्रश्न मिटवून टाकला. ट्रम्पनी आपल्या श्रीमंतीची अतिशयोक्ती करून वाचकांशी जवळीक साधली. तसंच कमलानं या पुस्तकात सारवासारव करून विशिष्ट प्रतिमा निर्माण केली. आपण अल्पसंख्याक काळे व हिस्पॅनिक व रंगीत त्वचेचे भारतीय, चिनी, जपानी वगैरेमधले एक असं भासवलं.

त्यामुळे दुसराच प्रश्न निर्माण झाला. भारतीयांशी नाळ ढिली झाली. राजकीय सोयीसाठी धर्मांतर केलेल्या राजकारण्यांविषयी अनिवासी भारतीय साशंक असतात. लुझियाना राज्याचा गव्हर्नर बॉबी जिंदल २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीत उतरला, तेव्हा देशी लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. इथला भारतीय समाज सर्वाधिक सुशिक्षित व श्रीमंत म्हणून त्यांची आर्थिक मदत निर्णायक ठरते. आपल्यातलाच एक म्हणून देशी लोक जिंदलकडे आत्मीयतेनं बघत होते; पण आपण इंडो-अमेरिकन नसून अमेरिकन आहोत, अशी गोऱ्या मतदारांना खुश करण्यासाठी घोषणा करताच, 'इंडो' या विशेषणाबरोबरच भारतीयांचा आधार गळाला आणि तो निवडणुकीत आपटला. आता तो अडगळीत पडला आहे.

कमलाविषयी तसंच होईल का? आपण कृष्णवर्णीय म्हणून तिला अभिमान वाटतो; पण तसं करताना तिनं भारतीय संस्कृतीचा

कमला हॅरिस

वारसा दुर्लक्षित केला ही चिंताजनक बाब आहे. सध्याच्या सर्वेक्षणात ती भारतीय लोकांत काळ्या समाजाएवढी लोकप्रिय नाही असं आढळून आलं; परंतु निवडणूक प्रचारात तिनं आपल्या आईच्या संस्कृतीविषयी आदर दाखवून जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. ट्रंपनी कपाळावर टिकली लावून देवळात हिंदू धर्माचं महत्त्व प्रकट केलेलं व त्यामुळे वळलेली मनं कोण विसरेल? कमला तसंच करू शकेल.

कमलाला दोन वर्षानं कनिष्ठ असलेली एक बहीण आहे. तिचं नाव माया. तिही स्वत:ला काळीच समजते. शिक्षणासाठी कमलानं वॉशिंग्टन डी.सी.मध्ये असलेली हॉवर्ड युनिव्हर्सिटी निवडली. ते कृष्णवर्णीय विद्यापीठ म्हणून ओळखलं जातं. कारण तिथे अधिकांश विद्यार्थी व प्राध्यापक त्याच वर्णाचे. त्यामुळे त्याच संस्कृतीचे संस्कार कमलावर होणं साहजिक आहे. त्यानंतर तिनं विधी पदवी मिळवून सॅन फ्रान्सिस्कोमध्ये जिल्हा विधी अधिकारी म्हणून काम केलं. शेवटी ती सगळ्या कॅलिफोर्निया राज्याची मुख्य विधी अधिकारी (Attorney General) म्हणून निवडून आली. त्यावेळी तिनं अवैध अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांना लक्ष्य केलं आणि त्यांना मोठ्या संख्येनं कोठडीत कोंडलं. या जाळ्यात अधिकांश काळे व हिस्पॅनिक अडकल्यामुळे त्यांचा क्रोध ओढवला. या गुन्हेगारांना कठोर शिक्षा द्यावी, अशी ती न्यायाधीशांकडे शिफारस करीत असे. कारण असे वाममार्गानं जाणारे पीडित समाजाला घातक असं ती समजे. हा इतिहास काळे विसरले नाहीत. तिनं निवडणुकीचं बिगूल फुंकताच त्यांनी तिच्यावर टीकास्त्र सोडलं. कमला नरमली. तिनं एकदम त्यांची माफी मागितली व तुरुंगात विषम संख्येनं काळे

व हिस्पॅनिक सापडतात हा पक्षपाती न्यायव्यवस्थेचा परिणाम अशी काळ्यांच्या दुखऱ्या मनाला कुरवाळणारी घोषणा केली; पण 'अशा फंदात तुम्ही पडू नका', असा सल्ला देण्याचं तिनं निक्षून टाळलं. व्यक्तीऐवजी समाजाला दोषी ठरवल्यानं आपल्या पारड्यात जास्त मतं पडतात, असं ओबामांपासून कमलापर्यंत सर्वांनी केव्हाच हेरलं. तिनं वयाच्या ५० व्या वर्षी (२०१४) डगलस एमहॉफ नावाच्या गोऱ्या बिजवराशी लग्न केलं. तो ज्यू असून त्याला पहिल्या लग्नापासून दोन अपत्य आहेत. कमलाची ती पहिलीच लग्नगाठ. डगलस तिच्याच वयाचा असून व्यवसायानं वकील आहे.

कमलाचं राजकारण डावं नव्हे तर अतिडावं व उदारमतवादी. हे कॅलिफोर्नियाबाहेरच्या लोकांना किती आवडेल हा प्रश्न आहे. ओबामाप्रमाणे काळे, हिस्पॅनिक, भारतीय व एशियन आणि सरकारी शिध्यावर अवलंबून राहणाऱ्या निम्नस्तरीय गोऱ्या अविवाहित माता यांची युती जुळवून बाजी मारण्याचा व्यूह तिनं आखला आहे. यात गोऱ्यांना स्थान नाही. ही व्यूहरचना ओबामांच्या बाबतीत यशस्वी ठरली. असं अल्पसंख्याकांचं एकत्रीकरण करण्याचं शास्त्र आपल्या काँग्रेस पक्षानं चांगलं विकसित केलं. मुस्लिम, दलित व आदिवासी यांची युती जमवून त्या पक्षानं अनेक वर्षे सत्ता गाजवली; पण आता काळ बदलला आहे. हिलरीला ते एकत्रीकरण जमलं नाही. आता कमला तिचं अनुकरण करीत आहे. ती यशस्वी होईल का हा ऐरणीवरचा प्रश्न आहे.

दुसऱ्या दोन बाबतीतही तिची अतिडावी विचारसरणी धोक्याची ठरते. अमेरिकेत वृद्धांसाठी जो आरोग्य विमा आहे तो अतिशय लोकप्रिय ठरला आहे. त्याला मेडिकेअर (Medicare) म्हणतात. ती योजना राबवण्यासाठी लागणाऱ्या पैशासाठी सरकारची दमछाक व तिजोरी रिकामी झाली आहे. असं असूनही कमलानं 'सर्वांना मेडिकेअर' या योजनेला पाठिंबा दिला. ही लोकानुनयी योजना अमलात आणण्यासाठी वर्षाकाठी ३.०० ते ३.५०० ट्रिलियन डॉ. लागतील, असं कुणीतरी गणित केलं; पण अमेरिकेचा सगळा अर्थसंकल्पच ४.४ ट्रिलियन डॉलर असून त्यात जवळजवळ १ ट्रिलियन डॉलरच्या तुटीचं भगदाड आहे. अशा परिस्थितीत मोठमोठ्या योजना मतं मिळवण्यासाठी सुचवणं म्हणजे आगीत तेल ओतण्यासारखं होईल. अमेरिकन जनता भारतीय मतदारांपेक्षा कितीतरी सुसंस्कृत आहे. ती या आमिषामुळे कधीच धार्जिण होणार नाही. कमलाला हे माहीत असूनही, तिनं डावं आत्मघातकी वळण घ्यावं ही एक खेदाची गोष्ट आहे. ती राबवण्यासाठी सरकारचं १०० टक्के उत्पन्न कमी पडेल व त्यासाठी उत्पन्न कराचे दर गगनाला भिडतील. त्याची तमा न बाळगता कमलानं आपलं घोडं 'सर्वांसाठी मेडिकेअर'च्या गाडीला जुंपलं.

काही डाव्यांनी नुकतीच दुसरी महाखर्चिक योजना जाहीर केली. तिला न्यू ग्रीन डील म्हणतात. त्यात पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी जे प्रस्तावित केलेलं आहे ते पाहून कुणालाही भोवळ येईल. गाई मिथेन (Methane) वायू सोडतात, म्हणून व विमानं आणि वाहनं वातावरण दूषित करतात म्हणून पुढील १० वर्षांत त्यांचा त्याग करावा असं म्हटलेलं आहे. अमेरिकन लोकांना राजकारण्यांच्या वायूभारित विधानांची सवय झालेली आहे; पण हॅमबर्गरवर बहिष्कार घालण्याचं ते कधीही स्वीकारणार नाहीत. तसंच स्वत:चं वाहन नसेल तर त्यांना पिंजऱ्यात कोंडल्यासारखं होतं. हे माहीत असूनही कमला हॅरिसनं या टोकाच्या योजनेला नि:संकोचपणे पाठिंबा दिला. हे तिचं पानिपत तर ठरणार नाही ना असा अनेकांनी सवाल टाकला. सर्वसाधारण अमेरिका मध्यावर असल्यामुळे अति डावीकडे उभं राहून तिला आकर्षित करणं हे तिच्यासमोरचं एक मोठं आव्हान आहे.

तिनं ज्या भूमिका घेतल्या त्या वादग्रस्त तर आहेतच. प्रत्येकाला सरकारकडून आरोग्य विमा मिळाल्यामुळे खाजगी आरोग्य विम्याची जरूरी राहणार नाही हे तिचं विधान अनेकांना खटकलं. कारण ही एवढी खर्चिक बाब आहे, की त्यामुळे अमेरिकेचं आर्थिक कंबरडं मोडेल. यासाठी पैसे कुठून आणणार, या प्रश्नाला सर्व डाव्यांचं उत्तर एकच. श्रीमंतांवर ७० टक्के कर लादून पैसे उकळणं भाषणात सोपं असलं आणि निम्नस्तरियांना आकर्षक वाटत असलं तरी वास्तवात ते अशक्य आहे, हे फ्रान्सनं सिद्ध करून दाखवलं. दरवर्षी १ दशलक्ष युरोपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्यांवर अध्यक्ष फ्रँककॉइस हॉलंडेनी असा लुटारू कर लावला होता. त्यामुळे सरकारचं उत्पन्न मुळीच वाढलं नाही. लक्ष्मीपुत्रांनी अनेक क्लृप्त्या करून अतिरिक्त कर टाळला व फ्रान्सला तो शेवटी मागे घ्यावा लागला, त्यामुळे हॉलंडचं राजकीय जीवन संपुष्टात आलं. लोकप्रियता १६ टक्क्यांवर उतरल्यामुळे ते पुन्हा निवडणुकीसाठी उभेदेखील राहिले नाहीत. या प्रयोगाकडे दुर्लक्ष करून त्यापासून कुठलाच धडा न शिकणं राजकीय अंधत्व सिद्ध करतं.

सर्वाधिक मतं मध्याच्या आसपास आहेत. ती आकर्षित करण्यासाठी तिला तिकडे वळणं आवश्यक आहे; पण अगोदर घेतलेल्या टोकाच्या भूमिकेमुळे ते तिला शक्य होणार नाही. अधिकांश अमेरिकन लोकांजवळ खाजगी आरोग्य विमा आहे. तो रद्द करणं त्यांना स्वत:च्या आईवर बहिष्कार टाकण्यासारखं वाटेल. कारण मातेप्रमाणे त्यांना हा विमाही आवडतो. सध्या लष्करातून बाहेर पडलेल्या सैनिकासाठी अमेरिकन सरकार आरोग्य सेवा पुरवते. तिथे डॉक्टरची भेट घेण्यास अनेक महिने लागतात. त्या काळात अनेक रुग्ण देवाघरी गेल्याची कितीतरी उदाहरणं आहेत. त्यामुळे अमेरिकन लोकांचा सरकारी विम्यावर विश्वास नाही. ही गोष्ट कमलानं विचारात घेतली असती, तर तिला यश मिळण्याची शक्यता वाढली असती.

तसंच राष्ट्रीय पातळीवर अमली पदार्थ वैध करण्यास अनेकांचा विरोध आहे. तिनं अलीकडे घेतलेली दुसरी एक भूमिका अजूनच चाकोरीबाहेरची आहे. अमेरिकन कृष्णवर्णीयांना २०० वर्षांपूर्वी आफ्रिकेतून गुलाम म्हणून आणलं. त्यासाठी सरकारनं त्यांना नुकसानभरपाई द्यावी, या प्रस्तावाला तिनं पाठिंबा दिला. याचाच अर्थ गोऱ्यांनी काळ्यांचे खिसे भरावेत, ते गौरवर्णीयांना अर्थातच मान्य नाही. कारण गुलामगिरी नष्ट होऊन आज १५० वर्षे लोटलीत

व ८५ टक्के गौरवर्णीय याला तीव्र विरोध दर्शवतात. त्यामुळे त्या अमानवी स्थितीत राहणारा आज एकही जिवंत नाही. तरीही त्यांच्या वारसदारांना पैसे देणं हे अतर्क्य वाटतं. त्यापेक्षा शशी थरूर नावाच्या लेखकानं Unglorius Empire मध्ये ब्रिटननं भारतीयांना नुकसानभरपाई द्यावी असं म्हटलेलं जास्त तर्कशुद्ध वाटतं. कारण आजही स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचे लोक हयातीत आहेत. निवडणूक प्रचारात कमलाचे प्रतिस्पर्धी तिला या प्रश्नासाठी सोलून काढतील. त्यामुळे अनेकांना तिचे विचार अप्रगल्भ वाटतात.

या अग्निदिव्यातून जाणं सोपं नाही. अजून शर्यत सुरू झालेली नाही. चर्चासत्रातली वागणूक निर्णायक ठरेल. तिला डेमॉक्रेटिक पक्षाचं नामांकन मिळवून ट्रम्पबरोबर आखाड्यात उतरण्यास बराच अवकाश आहे. या काळात तिच्यावर उजवे टीकास्त्र सोडतील. तिची पार्श्वभूमी सूक्ष्मपणे तपासतील. या गर्मीत ती टिकली तरच अखेरच्या सामन्यात ट्रम्पबरोबर रिंगणात उतरण्याचा मान तिला मिळेल. या पदासाठी तिला १५-२० प्रतिस्पर्ध्यांशी तोंड द्यावं लागेल. हनुमानाच्या शेपटीप्रमाणे ती सारखी वाढत आहे.

ओबामानंतर दुसरा काळा अध्यक्ष निवडण्याच्या लहरीत अमेरिकन प्रजा नाही; पण उपाध्यक्षपदी निवड होण्याची जास्त शक्यता आहे. तो अनुभव तिला पुढची पायरी चढण्यास उपयोगी ठरेल. ती निवडून आली तर अनेक प्रकारे इतिहास घडवला जाईल. पहिली महिला अध्यक्षा, पहिली कृष्णवर्णीय महिला देशप्रमुख व पहिली भारतीय वंशाची बाई या विविध सन्मानांनी ती भूषवली जाईल; पण खांडेकरांनी म्हटल्याप्रमाणे ससे, हरणं व विद्वान पुरुष यांना या जगात बरेच शत्रू असतात. या यादीत अमेरिकन अध्यक्षपदाच्या दावेदारीण किंवा दावेदार यांचाही समावेश करावा लागेल. अमेरिकन निवडणूक प्रक्रिया प्रदीर्घ, गुंतागुंतीची व एकमेकांचे पाय खाली ओढणारी असून सगळे दावेदार टीकेच्या जात्यात भरडले जातात. जो कमी भरडला जातो तोच शेवटी यशस्वी होतो हे एक कटू सत्य आहे.

शेवटी ती उणी पडली. लोकांनी तिला निवडणुकीसाठी लोकप्रियता घटल्यामुळे पैसे पाठवणं कमी केलं आणि डिसेंबर २०१९ मध्ये पहिलं मत पडण्यापूर्वीच तिनं राजीनामा देऊन अंग काढून घेतलं. याप्रमाणे 'महिला ओबामा' म्हणून नावारूपास आलेली 'कमाला' अंतर्धान पावली.

– डॉ. अनंत लाभसेटवार
लेखक, माजी अध्यक्ष-फर्स्ट नॅशनल बँक आणि
ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका
anantlabh@gmail.com

ग्रंथात्री

डॉ. अनंत पां. लाभसेटवार लिखित

अमेरिका : स्थिती व स्थित्यंतरे

दोन देशातील संस्कृतींत, चालीरितींत व समाजात सापडणारे नानाविध फरक लेखकानं टिपून वाचकाला अमेरिकेविषयी सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न केला.

मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.

Howdy Modi

अजी श्रेष्ठनेते पाहिले!

अनुजा अ. सबनीस

तो दिवस होता २२ सप्टेंबर २०१९, स्थळ ह्यूस्टन, टेक्सास. या सोहोळ्याचे आमंत्रण जून-जुलैमध्येच आले होते. प्रथम उत्साहाने अगदी नक्की जाऊया असे ठरवून होकार पाठवून दिला. नंतर अनेक शंका-उपशंका चालू झाल्या. 'एवढ्या लांब ५ तास गाडी चालवून त्या गर्दीत जायचे का इथूनच टीव्हीवरून प्रोग्रॅम बघायचा?' असा विचार करण्यात दोन-तीन महिने गेले. आमच्या ह्यूस्टनमधल्या दामले मित्रांचा आग्रह चालू होता की आमच्याकडे आदल्या दिवशी या आणि आपण चौघे एकत्र जाऊया. १० ते १५ सप्टेंबरला निमंत्रणाचे कन्फर्मेशन झाले. एक लांबलचक इमेल आली. त्यात सीट नंबरर्स आणि १०० सूचना होत्या. मग पुन्हा एकदा जायचे की नाही याचा उहापोह चालू झाला.

नेमका त्या आठवड्यात ह्यूस्टनला पावसाचा तडाखा बसला होता. अहोरात्र पाऊस पडून पूर आले होते. दोन-चार माणसे मेली, समुद्रालगत असल्यामुळे बरीच घरे पाण्याखाली गेली. झाले, पुन्हा आपण जाऊ या की नको ही फुगडी चालू झाली.

'शेवटी जोर लगाके हैया, भारतमाता की जय' म्हणून शनिवारी सकाळी निघालो. वाटेत पावसाच्या झडी मागे टाकीत पूरग्रस्त झालेल्या ह्यूस्टनच्या सीमेवर पोचताच अगदी नक्षत्र बदलावे तसा पाऊस बंद झाला आणि चकचकीत ऊन पडले. तोच चांगला संकेत असावा. पुढचे दोन दिवस पूर्णपणे पावसाने दडी मारली. जणू मोदीसाहेबांच्या आगमनाची वाट त्याने मोकळी केली होती.

विद्या आणि विजय दामलेंनी नेहमीप्रमाणे आमचे आनंदाने स्वागत केले. रात्री चौघांनी मिळून प्रोग्रॅमची इमेल वाचून काढली. त्यात कुठे पार्किंग करा, काय बरोबर आणा याची सर्व माहिती होती. त्यात सिक्युरीटीसाठी फक्त एका झिप लॉप (Zip Lock) बॅगेतून आयकार्ड आणि फोन आणण्याची परवानगी होती. आम्ही त्याप्रमाणे चार बॅग्ज तयार करून ठेवल्या. सकाळी ५.३०ला निघायचे ठरवले. कुठे पार्किंग करायचे ते ठरवले आणि झोपायला गेलो.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे ५.३०ला तयारी करून निघालो. आम्ही चौघांनीही मोदींना सहयोग म्हणून क्रीम आणि केसरी रंगाचे कपडे घातले होते.

रविवारी २२ सप्टेंबरला भल्या पहाटे उठून निघालो. उजाडता उजाडल्या एन.आर.जी. स्टेडियमना ठिकाणी पोचलो. पार्किंग व्यवस्थित मिळाल्यामुळे हुश्श झालो. आजुबाजूला बघितले तर भारतीयांच्या झुंडीच्या झुंडी मोठ्या उत्साहाने जमत होत्या. कुणी गाड्यांनी आले तर कुणी बस करून एकत्र आले होते. काही आमच्यासारखे लांबून आले होते. काही स्थानिक भागातून आले होते. बहुतेकांनी केसरीया रंग परिधान केला होता. काहींच्या हातात भारतीय तिरंगा होता. सगळीकडे उत्साह नाचत होता. 'भारतमाता की जय!' 'मोदी झिंदाबाद'चे नारे जोराने चालू होते. लाउडस्पीकरवर 'मोदी है तो सबकुछ है'चे गाणे जोरजोराने वाजत होते. एका बाजूला खाण्याचे स्टॉल्स होते. तिथेही गर्दी होत होती. लोक सेल्फी घेण्यात, फोटो काढण्यात गुंग होते. हळुहळू पुढे जात आम्ही कन्व्हेन्शनच्या आत पोचलो. तिथे तर आनंदी आनंद भरास्त आला होता. मोदीसाहेबांचे मोठे मोठे पोस्टर्स सगळीकडे उभे केले होते. त्याबरोबरच प्रत्येक राज्यांची मोठी पोस्टर्स सर्वत्र लावली होती. सर्व लोक मोदींच्या पुतळ्याबरोबर फोटो काढून घेत होते. तिथेही चहा-पानाची गर्दी प्रत्येक स्टॉलवर होती.

गंमत म्हणजे तिथल्या अमेरिकन स्टॉल्सवर छोटे ४ समोसे ११ डॉलर्सना विकले जात होते. या सर्वाला तोंड देत देत तिथे असलेल्या स्वयंसेवकांच्या मदतीने आम्ही आमची सीट गाठली. आम्ही स्टेजच्या अगदी समोर पण लांबवर होतो. बहुतेक गोष्टी आम्हाला पडद्यावरच जास्त चांगल्या दिसत होत्या.

नंतर एक तासाभराने टेक्सास इंडिया फोरम संस्थेतर्फे कार्यक्रमाला सुरुवात झाली. नानाविविध सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले. भारतीय प्रतिष्ठीत व्यक्तींचा उल्लेख, त्यांचे कार्य, भारतीय समाजाचे टेक्सासमधले योगदान अशा विषयांनी सुरुवात होऊन, विविध नाच, गाणे अगदी योगासनांचेही प्रोग्राम झाले.

त्यात श्री मोदींच्या स्वागताला अमेरिकन प्रेसिडेंट ट्रम्पसाहेबही आपल्या संपूर्ण मान्यवर डेलीगेशन सोबत येत असल्याने सिक्रेट सर्व्हीसचे लोकही घाई घाईने तयारी करत होते.

आमची उत्कंठा कलेकलेने वाढत चालली होती. ठरलेले टाईम टेबल मागे सरत होते आणि मग अचानक जल्लोष ऐकू आला. भल्या मोठ्या टीव्हीच्या स्क्रीनवर मोदीसाहेब नमस्कार करीत पुढे येताना दिसले. ५० हजारच्या स्टेडीयममध्ये साधारण ३०-३५ हजार तरी लोक होते. सगळेच मोदींना बघून आनंदून

नाचू लागले. मोदींनी नम्रपणे नमस्कार करत सर्वांना त्यांच्या प्रेमळ भाषणाने भारावून सोडले. नंतर काही वेळाने ते आत गेले आणि पुन्हा पडद्यावरून स्टेजमागच्या भागातून चक्क मोदी ट्रम्पबाबांना बरोबर धरून आणताना दिसले. दोघेही हात उंचावर स्टेजवर आले. एकमेकांनी एक दुसऱ्याची भरभरून स्तुती केली आणि दोन्ही देशांच्या राष्ट्रगीताला सुरुवात झाली. त्यानंतर ट्रम्पसाहेबांनी त्यांच्या रिप्बलिकन पक्षाच्या निवडणूक प्रचाराचे भाषण पुन्हा एकदा भारतीयांसमोर केले. कदाचित इतका मोठा जमाव बघून त्यांच्या मतमागणीच्या आशा उंचावल्या असतील. (पण जमावातले बरेच लोक अमेरिकी नागरिक नाहीत आणि ते फक्त त्यांच्या देशाच्या नेत्याला बघायला आले आहेत याची त्यांना कल्पना नसेल कदाचित) असो. आप खुश तो हम खुश.

त्यानंतर सर्व अमेरिकन डेलीगेट्स आणि स्वत: ट्रम्प स्टेजच्या खाली खुर्च्यांवर जाऊन बसले. यानंतर मोदीसाहेबांनी भाषणाला सुरुवात केली. टाळ्यांच्या कडकडाटात त्यांनी सर्व भारतीय भाषांत Howdy Modi म्हणजे How are you Modi? या प्रश्नाला उत्तर देताना सर्व काही ठीक आहे असे सांगून प्रेक्षकांची मने हेलावून सोडली. त्यानंतर त्यांनाही भारतीय नागरीकांना उद्देशून त्यांनी सरकारतर्फे केलेल्या सुधारणांची नांदी वाचली. जवळजवळ एक-सव्वा तास हिंदीतून भाषण लांबले. तोपर्यंत ते सर्व डेलीगेट्स आणि स्वत: ट्रम्पसाहेब शांतपणे बसून राहिले.

भाषण संपल्यावर पुन्हा एकदा दोन्ही नेत्यांनी एकमेकांना धन्यवाद दिले आणि बघता बघता मोदी-साहेबांनी ट्रम्पसाहेबांचा हात धरून स्टेजच्या उलट्या दिशेला चालायला सुरुवात केली. तमाम सिक्रेट सर्व्हीसच्या आयुष्यभरात शिकलेल्या सर्व चाचण्या खाड्कन डोळ्यां-समोरून गेल्या असाव्यात. ते सर्व भांबावून धावत पुढे गेले. मोदी साहेबांनी भारतीय मैत्री भावनेने ट्रम्पसाहेबांना सर्व स्टेडिअमवर फिरवले. त्यामुळेच आम्हाला दोघांचे आणि त्याचबरोबर इतर सर्व नेत्यांचे जवळून दर्शन घडले.

हा सर्व कार्यक्रम पाहून आम्हा हजर असलेल्या भारतीयांचे उर देशाभिमानाने भरून आले. एका भारतीय नेत्याने अमेरिकेसारख्या बलाढ्य श्रीमंत देशात त्यांच्या प्रेसिडेंससमोर हिंदीतून भाषण करावे आणि ट्रम्पसारख्या प्रेसिडेंटने ते स्टेजखाली बसून निमूटपणे ऐकून घ्यावे हा सर्व भारतीयांचाच अमेरिकेतला सन्मान वाटला.

ट्रम्पसाहेबांबरोबर आलेले सर्व राजकीय नेते (Senafors आणि Congressman) मोदींशी अगदी प्रेमाने आणि सलोख्याने बोलत होते. भारतीय नेत्याशी खास राजकीय पातळीवरचे व्यवहार करायला सर्व उत्सुकतेने वॉशिंग्टन सोडून दक्षिणेत ह्यूस्टनला यावेत आणि देशाच्या प्रेसिडेंटनेही 'ह्यूस्टनच्या पूरग्रस्तांची चौकशी करायला आलो आहोत' असे सांगून त्या नेत्यांची पाठ धरून मोदींच्या भेटीला यावे याहून भारतीय सुपुत्रांचा आणि भारतमातेचा सन्मान तो आणखी काय असणार?

आम्ही हे सर्व नेते अजूनपर्यंत फक्त टीव्हीच्या पडद्यावरच पाहिले होते. पण मोदीसाहेबांनी मैत्रीच्या आवेशात आम्हाला सर्वांचे दर्शन घडवून आणले तेव्हा वाटले 'अजी मी श्रेष्ठ नेते पाहिले!' धन्य पावलो!

– अनुजा सबनीस
Coppell, TX
Tel.: +1 214 676 1290
anujasabnis@ymail.com

ग्रंथाली



टीपंवणी

डॉ. सिसिलिया कार्व्हालो

मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.

'टिपं' म्हणजे थेंब आणि 'वणी' म्हणजे 'पाणी'. टिपंवणी म्हणजे थेंब थेंब पाणी. तसेच 'टिपं' म्हणजे अश्रूंचे थेंब. थेंबाथेंबाने अश्रू ढाळणे म्हणजे 'टिपं गाळणे'. टिपं आणि पाणी यांचा असा परस्परसंबंध!

नवीन वाट

अपर्णा केतकर

''नमस्कार! मी अपर्णा, सध्या अमेरिकेच्या न्यूजर्सी राज्यात राहते,'' बरोबर एक वर्षापूर्वी या वरील वाक्याने मी माझ्या पहिल्या व्हिडिओची सुरुवात केली आणि बघता बघता 'अमेरिका माझ्या नजरेतून' या यूट्यूब चॅनेलवर १०० व्हिडिओ अपलोड केले.

मी तीन वर्षांपूर्वी अमेरिकेत आले आणि इथल्या अनेक गोष्टी पहिल्यांदाच पाहताना आश्चर्य, कुतूहल आणि आपल्या देशापेक्षा खूपच वेगळेपणा जाणवला. ज्या रस्त्यांवर फूटपाथ नाहीत, त्या रस्त्यांवरून चालताच येत नाही! एकदा आणलेलं दूध १५ दिवस टिकतं, १ बेडरूम, २ बेडरूमच्या घरामध्ये किती जणांनी राहायचं याचेही नियम ठरलेले. सुरुवातीला अशा गोष्टींचे छोटे छोटे व्हिडिओ काढून नातेवाईक आणि मित्रमैत्रिणींना व्हॉटसअपच्या माध्यमातून पाठवले. अर्थातच नवीन गोष्टी पाहायला सगळ्यांनाच आवडल्या. मग नायगारा धबधबा, न्यूयॉर्क, कॅलिफोर्निया असे पर्यटनविषयक व्हिडिओ बनवले. इथले वेगवेगळे सण जसे हॉलोवीन, थॅंक्सगिविंग, पानगळती आणि बर्फवृष्टीसारखे वेगळे ऋतू, सगळीकडे आढळणारे यांत्रिकीकरण, अमेरिकेतील भारतीय मंदिरे, इथे साजरे होणारे भारतीय सण, भारतीय योगाभ्यासाचा अमेरिकेतील प्रसार, भारतीय स्वातंत्र्यदिनाची अमेरिकन रस्त्यावरची परेड, अमेरिकेतील गणेशोत्सव अशा वेगवेगळ्या विषयांवरचे बघता बघता १०० व्हिडिओ चॅनेलवर प्रदर्शित झाले. (हे सगळे व्हिडिओ आपण https://youtu.be/4feyOZHptPQ या लिंकवर क्लिक करून कधीही बघू शकता.)

१०० व्हिडिओंच्या प्रवासात बऱ्याच नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. सुरुवातीला एडिटिंगची सवय नसल्याने एक व्हिडिओ बनवायला वेळ लागायचा. हळूहळू त्याची सवय झाली. कॅमेरासमोर कसं बोलायचं? विशेषत: चेहऱ्यावरचे हावभाव आणि जास्तीत जास्त उत्साहवर्धक दिसणं याला किती महत्त्व आहे, ते शिकायला मिळालं. अनेक नवीन लोकांच्या ओळखी झाल्या. व्हिडिओ जास्तीतजास्त माहितीपूर्ण करण्याच्या प्रयत्नात अनेक विषयांची माहिती झाली.

यूट्यूब चॅनेल बघणाऱ्याला हे प्रकरण सोप्पं वाटत असलं, तरी यातही अनेक चॅलेंजिंग गोष्टी आहेत. अमेरिकेसारख्या परक्या देशात कुठलं व्हिडिओ रेकॉर्डिंग केलेलं चालेल आणि कुठे परमिशन घ्यावी लागेल हे आधी पाहावं लागतं. बऱ्याच सार्वजनिक ठिकाणी आधी परवानगी घ्यावीच लागते, 'नाही' ऐकण्याची तयारी ठेवावी लागते (उदा. इथल्या सार्वजनिक वाचनालयाची पद्धत अतिशय चांगली आणि स्तुत्य आहे पण तिथलं रेकॉर्डिंग करण्याची परवानगी न मिळाल्यामुळे भारतातल्या लोकांपर्यंत मी हे पोहोचवू शकले नाही.) काही वेळेस एखाद्या पर्यटनस्थळाचं उत्साहानं चित्रण करायला गेलं की निम्म्यातूनच मोबाइलमधली जागा संपली म्हणून घरी यावं लागलं. गर्दीच्या ठिकाणी आवाज चांगला यावा म्हणून माईक घेतला, तर व्हिडिओ स्टॅबिलायझेशनसाठी घेतलेल्या गिम्बल आणि माईक एकाच वेळेस फोनला जोडता येईना. कधीतरी घरी आल्यावर समजलं, उत्साहाच्या भरात माईक चालू करायचाच

अमेरिकेत येताना तुमचा व्हिसा हा 'वर्क व्हिसा' नसेल तर इथे नोकरी करता येत नाही. आयटी इंडस्ट्रीमध्ये येणाऱ्या बऱ्याच जणांबरोबर 'डिपेंडन्ट' व्हिसावर येणाऱ्या अनेक उच्चशिक्षित स्त्रियांची हीच तऱ्हा... त्यापैकीच मी एक. पण चांगली बाजू अशी की इथे आल्यावर बराच रिकामा वेळ आणि २४ तास इंटरनेटची उपलब्धता यामुळे इंटरनेटवरील यूट्यूबवरील वेगवेगळी माहिती पाहता आली.

त्यातच ओळखीच्या एका-दोघा जणांनी यूट्यूबवर स्वत:चे चॅनेल सुरू केले आणि मला कल्पना सुचली की आपल्यालाही एक चॅनेल सुरू करून इथे दिसणाऱ्या नवीन गोष्टी अनेक लोकांपर्यंत पोहोचवता येतील. यूट्यूबवर थोडंफार शोधकाम केल्यावर असं लक्षात आलं की मराठीतून अशी माहिती देणारा एकही चॅनेल सध्या अस्तित्वात नाही. 'शुभस्य शीघ्रम' म्हणत सुरुवात झाली. मराठीतून अमेरिकेचं दर्शन घडवणाऱ्या यूट्यूब चॅनेलची 'अमेरिका माझ्या नजरेतून'ची सुरुवात केली ती इथलं घर आणि घरातील लॉन्ड्री, डिशवॉशर इ. व्यवस्थांपासून.

घराचा व्हिडिओ करताना एका आर्किटेक्ट मैत्रिणीला बोलावून ''इथली घरं लाकडाची का असतात?'' आणि या घरांचे काय विशेष असतात ते जाणून घ्यायचा प्रयत्न केला. त्यामुळे हा प्रयत्न लोकांना आवडला आणि व्हिडिओ व्हायरल झाला.

राहिला त्यामुळे अनेक चांगले शॉर्ट्स व्हिडिओमध्ये घेता आले नाहीत. या झाल्या फक्त तांत्रिक गोष्टी. त्याचबरोबर एखाद्या विषयावर कितीही परिपूर्ण वाटणारा व्हिडिओ बनवला, तरीही काही गोष्टी राहून जातात आणि मग एखादा सुजाण प्रेक्षक 'ही गोष्ट व्हिडिओमध्ये समावेश करणं कसं आवश्यक होतं' ते सांगतो आणि मग आपण कसे काय विसरलो? याचं वाईट वाटतं. काहीदा व्हिडिओमध्ये दाखवलेल्या गोष्टींचा विपर्यासही केला जातो.

पण या सगळ्यापेक्षा अनेक जणांकडून येणाऱ्या अतिशय चांगल्या प्रतिक्रिया उत्साह वाढविणाऱ्या आणि हा प्रवास चालू ठेवण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या असतात. काही जणांनी घरातल्या वृद्ध व्यक्तीची नायगारा बघण्याची इच्छा पूर्ण करता आली त्याबद्दल आभार मानले. इथे येणाऱ्या काही जणांना लॉन्ड्री सिस्टिमसारख्या व्हिडिओचा उपयोग झाला, तर काही जणांचे अमेरिकेबद्दलचे गैरसमज दूर झाले आणि या सगळ्यांनी त्यांच्या भावना व्हिडिओवरील कमेंट्सच्या माध्यमातून माझ्यापर्यंत पोहोचवल्या आणि केलेल्या मेहनतीचं चीज झाल्यासारखं वाटलं. गेल्या एका वर्षात मी माझ्या चष्म्यातून अनेक गोष्टी मराठी प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. यापुढे माझ्यापेक्षा अधिक काळ इथे राहिलेल्या काही जणांकडून या सगळ्या गोष्टी अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेण्याचा आणि या चॅनेलच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचवण्याचा माझा प्रयत्न असेल.

'अमेरिका माझ्या नजरेतून' या चॅनेलचं पंचवीस हजार जणांचं कुटुंब झाल्यानंतर या चॅनेलचा परीघ अजून मोठा करायचा आहे. अमेरिकेमध्ये महाराष्ट्र मंडळाचं काम बरंच मोठं आहे. त्या माध्यमातून अनेक प्रथितयश लोकांच्या ओळखी झाल्या आहेत. या सगळ्या अनुभवी आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वांशी मी गप्पा मारणार आहे, 'गप्पागोष्टी' या नवीन सत्रामध्ये. या गप्पारूपी मुलाखतीच्या माध्यमातून त्यांचा इथला प्रवास, त्यांनी मिळवलेलं यश, त्याचबरोबर अमेरिकन अर्थव्यवस्था, अमेरिकेतलं राजकारण, इथले उद्योग, शिक्षणव्यवस्था, इथल्या लोकांचं राहणीमान इत्यादी अनेक विषयांवर व्हिडिओ तयार करायचा मानस आहे. या सत्रातील अमेरिकेतील शिक्षण आणि अमेरिकेतील एव्हिएशन इंडस्ट्री याबद्दलचे सविस्तर व्हिडिओ चॅनेलवर प्रदर्शित झाले आहेत.

आतापर्यंतच्या चॅनेलच्या प्रवासात अनेक जणांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत केली. प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं त्याबद्दल सगळ्यांचे खूप खूप आभार. असेच नवनवीन विषयांवरचे व्हिडिओ बनवण्यासाठी मला प्रेरणा मिळो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

– अपर्णा केतकर
Newark, NJ
Tel. : +1 862 812 4560
enggaparna@gmail.com

ग्रंथाली

बा मनभावन

ललिता छेडा

ललिता छेडा यांच्या या कथासंग्रहातल्या सगळ्या कथा तुमच्या-माझ्या घरातल्या आहेत. यातील सर्व पात्रं आणि प्रसंग मांडताना भाषा, वर्णन, संवाद हे सर्व नेटकेपणानं लिहिलं आहे.

मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.

किटाळ

लक्ष्मण माने

गोरगरीब माणसं सन्मानाने जगू-वावरू लागली, बरोबरीचा दर्जा मागू लागली, सत्ता मागू लागली, की त्यांच्यावर बालंट आणून बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो. मला आणि माझ्या कार्याला उद्ध्वस्त करून पाहणाऱ्या याच कटाची, किटाळाची आणि किटाळमुक्तीची ही कहाणी

मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.

पुण्याच्या विश्व मराठी एकांकिका स्पर्धेत 'कलाब्रेशन'चे नेत्रदीपक यश!

निलेश मालवणकर

मराठी माणूस जगाच्या पाठीवर कोठेही गेला तरी त्याच्या कुवतीप्रमाणे मराठीसाठी काहीतरी करत असतोच. असेच काही उत्साही नाट्यप्रेमी गेल्या ७-८ वर्षांत बाल्टिमोर या शहराच्या परिसरात एकत्र आले आणि त्यांनी कलाब्रेशन या नाट्यसंस्थेची स्थापना केली. त्यांचा आणि पुण्यातील काही जणांचा संपर्क अलीकडेच झाला आणि त्या अनुषंगाने जगातील १७ देशांतून मराठी नाट्यसंस्थांनी टेक्नॉलॉजी वापरून प्रत्यक्ष प्रवास न करता या त्यात भाग घेतला आणि अशीच स्पर्धा पुढे चालू राहण्याची दिशा ठरवून दिली. पुणे हेरिटेज रोटरी क्लबने आयोजित केलेला हा प्रयोग होता.

या मराठी एकांकिका स्पर्धेमध्ये अमेरिकेतल्या बाल्टीमोरच्या 'कलाब्रेशन' ह्या नाट्यसंस्थेने पदकांची बाजी मारली. ह्या स्पर्धेत जगभरातून सतरा देशांमधील मराठी नाट्य संघांनी भाग घेतला होता. अशा अटीतटीच्या स्पर्धेत कलाब्रेशनच्या चमूने दोन नाटकं- 'एक एप्रिल' आणि 'श्री तशी सौ' सादर करून तब्बल सहा बक्षिसांवर आपले नाव कोरले. कलाब्रेशनच्या वतीने पुणे येथे प्रेरणा मोहोड यांनी बक्षिसे स्वीकारली. ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, प्रांतपाल पंकज शहा, श्रीकांत कानेटकर, महेश ओझा ह्या नामवंतांच्या उपस्थितीत पारितोषिक सोहळा संपन्न झाला. स्पर्धेचे परीक्षक दिग्दर्शक आदित्य इंगळे, अभिषेक केळकर, पौर्णिमा मनोहर ह्यांसोबत मधुमिता बर्वे आणि विनिता पिंपळखरे आदी मंडळी ह्या कार्यक्रमाला उपस्थित होते. विक्रम गोखले ह्यांनी मराठी नाटकासाठी महत्त्वाचे योगदान दिल्याबद्दल स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांचे आणि रोटरी क्लब हेरीटेजचे कौतुक केले. परदेशात राहूनही आपले मराठी बांधव नाटकाद्वारे आपली संस्कृती, साहित्य जोपासत असल्याबद्दल मिलिंद जोशी ह्यांनी स्पर्धकांची स्तुती केली. अविनाश ओगले आणि लीना गोगटे ह्यांनी आपल्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमाला रंगत आणली. कलाब्रेशनने जिंकलेली पारितोषिके- १. **उत्कृष्ट नाटक** तृतीय क्रमांक - एक एप्रिल, २. **उत्कृष्ट दिग्दर्शन** द्वितीय क्रमांक - माधवी तावडे भोसले (एक एप्रिल), ३. **उत्कृष्ट अभिनेत्री** प्रथम क्रमांक - लीना मालवणकर (श्री तशी सौ), ४. **उत्कृष्ट अभिनेता** प्रथम क्रमांक - संदीप सावंत (एक एप्रिल), ५. **उत्कृष्ट अभिनेता** उत्तेजनार्थ - रोहित कोल्हटकर (एक एप्रिल), ६. **उत्कृष्ट अभिनेता** उत्तेजनार्थ - संदीप सावंत (श्री तशी सौ)

'एक एप्रिल आणि श्री तशी सौ या नाटकातले कलाकार आणि साहाय्यक मंडळी

कलाब्रेशनविषयी थोडक्यात

कलाब्रेशन ही मराठी नाट्यसंस्कृतीच्या संवर्धनासाठी झटणारी अमेरिकेतील बाल्टिमोर परिसरातील महत्त्वाची नाट्यसंस्था आहे. बाल्टिमोरमधील नाट्यरसिकांचे मनोरंजन व सामाजिक प्रबोधन ही संस्था गेली काही वर्षे करत आली आहे. विविध नाट्य/एकांकिका स्पर्धा, मोठ्यांसाठी तसेच बाळगोपाळांसाठी नाट्य प्रशिक्षण वर्ग, बालनाट्य/एकांकिका असे विविध उपक्रम कलाब्रेशनतर्फे चालवले जातात. नजीकच्या काळात बालनाट्यमहोत्सव व व्यावसायिक नाटक आयोजित करण्याचा संस्थेचा मानस आहे.

२०१४ साली कलाब्रेशन (USA) ची स्थापना झाली. सुरुवातीलाच सादर केलेल्या 'एक एप्रिल' आणि 'प्रेक्षकांनी क्षमा करावी' ह्या दोन एकांकिकांवर प्रेक्षकांनी तुफान प्रेम केले. त्यानंतरच्या वर्षी 'तुला मी मला मी' आणि 'ब्लॅक गेम'ने प्रेक्षकांचा गेम केला. त्या पुढचा टप्पा म्हणजे विजय तेंडूलकर लिखित 'कमला' हे नाटक. त्यानंतर 'वास्तव' आणि योगेश सोमण यांची 'श्री तशी सौ' ही धमाल एकांकिका. ३० जून २०१९ रोजी कलाब्रेशनने एकांकिका महोत्सव यशस्वीरीत्या तडीला नेला. एकापेक्षा एक सरस अशा चार एकांकिकांचा आस्वाद त्यानिमित्ताने नाट्य रसिकांना घेता आला. त्या पाठोपाठ सई परांजपे लिखित 'पत्ते नगरीत' हे तब्बल १६ बालकलाकारांचा समावेश असलेलं बालनाट्य बाल्टीमोर मराठी मंडळाच्या दिवाळी कार्यक्रमामध्ये यशस्वीरीत्या सादर करण्याचे शिवधनुष्य लीलया पेलले. त्याव्यतिरिक्त मोठ्यांसाठी एक व लहानांसाठी एक अशी दोन नाट्य शिबिरेदेखील कलाब्रेशनने समर्थपणे आयोजित केली. मराठी भाषा व नाट्य संस्कृतीचा झेंडा कलाब्रेशन अमेरिकेत 'यावच्चंद्रदिवाकरौ' असाच डौलाने लहरत ठेवेल, ह्यात तिळमात्र शंका नाही.

– निलेश मालवणकर (टीम कलाब्रेशन)
USA
C/o, gmsabnis@gmail.com

४५व्या वाचकदिन निमित्त ग्रंथाली आयोजित परदेशी भारतीय व बृहन्महाराष्ट्रातील लेखकांसाठी आयोजित कथा स्पर्धेत आपण सहभागी झालात त्याबद्दल 'ग्रंथाली' आपले आभारी आहे.

सदर स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे आहे.

१. प्रवीण कावडकर, हैद्राबाद यांची कथा 'हॅलो' , २. प्रकाश धर्म, हैद्राबाद यांची कथा 'नामानुसंधान'

३. वैशाली फाटक, ऑस्ट्रेलिया यांची कथा 'भिन्न की अभिन्न'

'हॅलो'

''अरे आईंचा फोन आला होता.'' आकाश घरी येताच आकृतीने निरोप दिला. तसे आकाश आणि आकृती एकाच कंपनीत कामाला होते पण मुलगा घरी एकटा असतो म्हणून आकृती नेहमी लवकर घरी येते. आकाशाला उशीर होतो.

''उशीर झाला आज.''

''ट्रॅफिक. एकदा चंद्रावर मनुष्यवस्ती होईल पण बंगलोरचे ट्रॅफिक सुधारणार नाही. आई काही बोलली का?''

''नाही, सहजच. आल्यावर फोन करायला सांग. एवढंच.

''बाळूमामासाठी असेल.''

''कोण बाळूमामा?''

''जाऊ दे ग. आई आणि तिचे नातेवाईक बोलायला दिवस पुरायचा नाही. तिकडे बुऱ्हानपूरला असतात. आजारी आहेत. वय झालेले आहे. मी आईला बोललो होतो मी जळगावला यायचा विचार करतोय. बाबा पडले तर मी गेलोच नाही. त्यांची तब्येत बघतो. तेव्हा बुऱ्हानपूरला जाऊन येईन.''

''मला बोलला नाहीस कधी?''

''काही ठरले नाही, आई उगाच पिच्छा पुरवते. बंगलोरवरून जळगावला जाणं सोपं आहे का? इथनं जळगावला जायला ना सरळ फ्लाइट आहे ना ट्रेन. आता बाबा मुंबईला असते तर आतापर्यंत मी केव्हाच भेटून आलो असतो. पण त्यांना मुंबईत राहायचे नाही आणि बंगलोर आवडत नाही. भारतात असूनही दूरच.''

जळगावला जायचा विषय निघाला की हा संवाद काही नवीन नव्हता. यावर काही उत्तर नाही म्हणून आकृती गप्प होती. थोड्या वेळाने आकाश फ्रेश व्हायला बाथरूममध्ये गेला. आकृती तिथेच कपड्यांच्या घड्या करत होती. घडी करताना तिला अथर्वचे न धुतलेले शाळेचे कपडे दिसले. ते बघताच तिचा पारा चढला.

''अथर्व, अथर्व'' तो धावत आला.

''काय आहे हे?'' तो गप्प.

''तुला काय बोलले होते मी?''

''कपडे वॉशिंग मशीनमध्ये टाक.''

''मग का नाही टाकले?''

''विसरलो.''

''असे कसे विसरता तुम्ही? आईने सांगितले तेवढे विसरता बाकी सारं लक्षात राहतं. उद्या शाळेत काय घालणार आहेस?''

अथर्वकडे काही उत्तर नव्हते. तो फक्त उभा होता. आकृती बोलायची थांबली तसा तो परत टीव्हीवर कार्टून बघायला पळाला. आकाशने सारे ऐकले होते. खरं म्हणजे तोही काहीतरी विसरला होता पण घरातील तापलेले वातावरण बघता त्याला चूक कबूल करायची हिंमत झाली नाही. सुरक्षिततेचा उपाय म्हणून तो ऑफिसचा लॅपटॉप उघडून बसला. त्यालाही फार काळ सुरक्षित झोनमध्ये राहता आले नाही. आकृतीने विचारलेच,

''तू भाजी खाल्ली नाही?''

''अग तो कोल्हापूरचा पाटल्या नाही का, त्याची आई आली आहे. त्याची आई आली कि तो मटण घेउन येतो. घरगुती गावरान अस्सल कोल्हापुरी मटण असल्यावर मेथीची भाजी कोण खाणार?''

''तू काल बोलला नाहीस?''

''सॉरी विसरलो.''

''असे कसे रे विसरता तुम्ही? तुझ्यासारखाच तुझा पोरगा आहे.'' असे म्हणत आकृती परत किचनकडे वळली. जाता जाता तिने आकाशला आठवण करून दिली. ''आईंना फोन कर नाहीतर तेही विसरशील.''

''करतो गं.'' असे म्हणत आकाशने सोफ्यावर पाय पसरवून ताणून दिली. अथर्वच्या कार्टूनच्या ढणढणात सुद्धा त्याचा डोळा लागला. दहा मिनिटाने फोन वाजला. आईचाच फोन असेल म्हणून त्याने फोन बघितला तर त्याचा मित्र आपटेचा फोन होता.

''बोला आपटेसाहेब कधी आलात सियाटेलवरून?''

''मागेच. आम्ही तुमच्यासारखे महिन्याभरासाठी जात नाही.''

''हो तुम्ही प्रॉडक्टवाले घोड्यावर जाता आणि घोड्यावर येता. आमच्यासारखे नाही बोलावले की जायचे आणि समोरच्याने सोडले तरच परत यायचे.''

''खेचता का राव आमची. तू विशाल राणेला ओळखतो का? जळगावचाच आहे, राणे राणे म्हणून विचारलं.''

''जळगावात टोपल्याने राणे आहेत.''

''तुझ्याच बॅचचा आहे.''

''आठवत नाही, काय काम होतं?''

''माझ्या ग्रुपमधल्या एका पोस्टसाठी त्याचा इंटरव्ह्यू झाला. फायनल करायच्या आधी बॅकग्राउंड चेक करावे म्हणून तुला

विचारले.''

''माहिती काढतो मी. मिळेलच माहिती, तू काळजी करू नकोस.''

''थँक्स. बाकी काय. काका-काकू काय म्हणतात?''

''बाबा मागे पडले होते त्यामुळे त्यांना चालायला त्रास होतो. शुगर वगैरे चालूच असते. आई ठणठणीत आहे म्हणून बरं आहे. तुझा फोन आला तेव्हा तिलाच फोन लावत होतो.''

त्यानंतर पुढे कितीतरी वेळ आकाश फोनवर बोलत होता. आकृतीने एक दोन वेळेला खुणेनेच जेवायला ये असे सांगितले पण आकाशचा फोन थांबला नाही. आकृती आणि अथर्व दोघांनीच जेवायला सुरवात केली. अथर्वचे जेवण संपले तेव्हा कुठे आकाशचा फोन संपला.

''अग आपट्याचा फोन होता. म्हणे विशाल राणेला ओळखतो का? तुझ्या बॅचचा आहे? उद्देश काय तर आता मी आता तुझ्या बॅचची पोरं रिक्रूट करतो.''

''सहज चौकशी केली असेल.''

''मोठा माणूस झाला तो. व्हाइटफिल्डमधे व्हिला घेतला. इथे दोघांचे पगार असूनही फ्लॅटचा इएमआय भरता भरता धाप लागते.''

''तू तुलना का करतो सतत?''

''सोबत जॉइन झालो होतो आम्ही. वैताग आला आहे. परवा टिमला घेउन लंचला गेलो होतो. बारा जण होतो. फक्त हजार रुपयानी बिल जास्त झाले तर चार टकल्यांपुढे जाऊन मला एक्सप्लनेशन द्यावे लागले. येवढाही अधिकार नाही.''

''नियम तुला आधीच माहिती होता ना.''

''तू मलाच दोष दे. फसलं आहे माणूस ना इकडे जाऊ शकत ना तिकडे. कोणी समजून घ्यायलाही तयार नाही.''

''का चिडतोस इतका?''

''सारं सोडून जळगावात जाऊन शेती करतो म्हणजे समजेल तुम्हा लोकांना.''

''परत तेच. तुला आपटेचा फोन आला. त्याचा अर्थ तू आपल्या मनाने काय तो लावला. सारा राग घरात का काढतोस? त्या बिचाऱ्या आपटेला पण काही कमी त्रास झाला नाही. एचवन स्टँप झाला होता, टिकिट झाले होते, आपल्यासोबत तोही येणार होता. चार दिवस आधी त्याच्या आईला पॅरालिसिसचा ॲटॅक आला आणि त्याला सर्व कॅन्सल करावे लागले होते.''

''त्यात त्याचा फायदाच झाला. इथेच राहायचे म्हटल्यावर त्याने कंपनी बदलली.''

''तुला कुणी थांबविले होते कंपनी बदलायला. आज बारा वर्षे झाले बिचाऱ्याची आई बेडरिडन आहे. त्याच्याच जवळ असते.''

''तू त्याचीच बाजू घे.''

''मी कशाला त्याची बाजू घेऊ. जेवण झाले की तू आईंना फोन कर बास.''

''आता फोन नंतर. आता हा विशाला राणे कोण आहे हे समजल्याशिवाय झोप येणार नाही.''

''कठीण आहे तुझे.''

दोघेही सामंजस्याने भांडण संपवत आहेत असे वाटत असले तरी प्रत्यक्षात राग कुणाचाच गेला नव्हता. बिचारा अथर्व फसला. आधी आकाशने दम भरला.

''अथर्व ते कार्टून बंद कर आणि मॅच लाव.''

''अथर्व शाळेची बॅग भरली का? जा आधी बॅग भर.'' अथर्वने बॅग आधीच भरली होती. तो लगेच झोपी गेला. उद्या मुलगा शाळेत कसा जाईल या भीतीने आकृतीने अथर्वचा गणवेष धूत होती आणि आकाश विशाल राणेचा शोध घेत होता. आधी त्याने दोनतीन व्हाटस ॲप ग्रुपवर विचारले. मग फेसबुकवर विशाल राणे नावाचा कुणी ओळखीचा चेहरा दिसतो का ते शोधले. लिंक्डइनवर जाऊन विशाल राणे नावाचे सारे पोफाइल चेक केले. अंदाज येत होता पण नक्की कोण याची खातरी होत नव्हती. अशात आकाशच्या एका मित्राने फोन करून आपटेला हव्या असलेल्या विशाल राणेची सविस्तर माहिती दिली. मघापासून डोक्यात पेटलेली आग आता शांत झाली. आकृती तर गणवेष धुवून केव्हाच झोपली होती. तेवढ्या वेळात टिव्हीवर विराटने बंगलोरला मॅच जिंकून दिली होती. आकाशने टिव्ही बंद केला. विशाल राणेबद्दल कधी आकृतीला सांगतो असे त्याला झाले होते. पण आकृती आता झोपली होती. तिला कसे उठवायचे.

''चार्जर कुठे आहे?'' तो मनाशीच पण थोडा जोरात बोलला.

''त्या तिथेच आहे टेबलवर'' तिने अर्धवट झोपेतच उत्तर दिले.

''अग तो विशाल राणे सापडला. आपट्या काहीपण बोलतो. तो विशाल राणे माझ्या बॅचचा नव्हताच. माझ्यापेक्षा तीन वर्षे ज्युनियर होता. आमच्याच क़ॉलेजला होता. या आपट्याच्या कॉलेजातली तीन वर्षे ज्युनियर पोरं तर मी ट्रक भरून उचलतो.''

''झालं समाधान. तू आईंना फोन केला का?''

''ओह शिट विसरलो. उद्या करतो. आता रात्र झाली.''

''असा कसा विसरतो तू. उगाच त्या विशाल राणेच्या मागे लागला.''

''तुला नाही समजायचे. तू झोप. मी सकाळी फोन करतो. एका रात्रीने काही नुकसान होणार नाही.''

विशाल राणे सापडल्यामुळे आकाशला लगेच झोप लागली. तो घोरायला सुद्धा लागला. अर्धवट झोपेतून उठल्यामुळे आकृती मात्र अस्वस्थ झाली. तिला उशीरापर्यंत झोप लागली नाही. पहाटे पाच वाजता आकाशचा फोन वाजला. दोघेही गाढ झोपते होते. दोनतीन वेळा फोन वाजला पण कुणी उचलला नाही. सहा वाजता परत आकाशचा फोन वाजला. फोनच्या आवाजाने आकृती जागी झाली. तिने आकाशला आवाज दिला.

''आकाश तुझा फोन वाजतोय.'' आकाश नाराजीतच उठला.

''सकाळी कोण आहे. मंदार आणि आता.''

''बोल मंदार.''

''आकाश दादा मंदार बोलतोय. काकूंना पहाटे सिव्हियर

हार्टअॅटॅक आला. दवाखान्यात अॅडमिट केले. काकांनी तुला फोन केला होता पण तू उचलला नाही. डॉक्टर बोलले सर्वांना बोलावून घ्या लवकर.''

मंदार पुढेही बोलत होता आकाश मात्र पुरता हादरला होता. फोन तसाच धरून शून्यात बघत उभा होता. अपराध तर झाला होता पण त्याची माफी मागायची संधी आता कधीच मिळणार नव्हती. हे शल्य मनात ठेवूनच आयुष्य काढायचे होते. अचानक आकाशच्या डोळ्यांसमोर साऱ्या ध्वनीलहरींचे, तरंगांचे जाळे निर्माण झाले होते. तो त्यांना वेड्यासारखे हॅलो म्हणत होता. पण त्याला उत्तर म्हणून हव्या असणाऱ्या 'हॅलो'च्या ध्वनीलहरी आता कधीच सापडणार नव्हत्या.

– प्रवीण कावडकर, हैदराबाद
भ्रमणध्वनी : ९३४७३०२१२६
mitrahow@gmail.com
https://mitraho.wordpress.com

नामानुसंधान

हे अदूचं घर आहे. त्यातल्या या मध्यवर्ती हॉलमधली ही खिडकीजवळची जागा, अदूची अगदी खास जागा आहे. सकाळची कोवळी उन्हं याच खिडकीतून रोज पाखरं आत आल्यासारखी येतात, जमिनीवर उतरतात, लांबपर्यंत पसरतात. हा खेळ टिकतो थोडा वेळ ...आणि लगेचच संपून जातो. हे बघण्याचा अदू नावाच्या अठ्ठ्याहत्तर वर्षाच्या मनाचा, रोजचा छंद आहे.

या खिडकीशेजारी बसून अदूने आजचा बशीतला चहा थरथरत्या हाताने पिऊन संपवला. रोजच्या सवईनुसार न बोलवता लच्चम्मा आली आणि रिकामी कप-बशी घेऊन गेली. अदू प्रज्ञेयशी फोनवर बोलण्यात पूर्ण तन्मय झाला होता. अदूचं असंच असे, कोणाचंही बोलणं नीट लक्ष देऊन ऐकून घेण्याची त्याने सवय करून घेतली होती. त्यामुळे दुसऱ्याच्या कमी बोलण्यातही त्याला त्याचा भावार्थ लगेच समजत असे. पण त्याचा स्वत:चा स्वभाव मात्र मोकळेपणाने खूप अघळपघळ बोलण्याचा होता. विशेषत: एखादी गोष्ट दुसऱ्याला सांगताना तो वेगवेगळी उदाहरणे देऊन रंगवून सांगत असे. प्रज्ञेय लहानपणापासूनच अदूशी खूप गप्पा मारायचा. आता शिक्षणाकरता जर्मनीला गेल्यापासून त्याच्या आणि अदूच्या गप्पांमध्ये आध्यात्मिक विषयांवरसुद्धा चर्चा होत असे. आत्ता आलेल्या प्रज्ञेयच्या फोनवरच्या बोलण्यात सुद्धा अशाच काही मुद्द्यांवर दोघं सविस्तर बोलत होते. ''हे बघ प्रज्ञेय हे तर अगदीच उघड आहे की, एव्हरीथिंग मस्ट पेरिश अँड विल! इजन्ट इट? ...माणसाचं शरीर असो नाहीतर तुटकी-फुटकी कपबशी असो.....नाही नाही हे बघ..'लॉ' म्हण! तत्त्व म्हण!...त्याला नियम म्हणू नकोस! नियम माणूस बनवतो! तत्त्व नैसर्गिक असतं. ते तोडता, मोडता, खोडता येत नाही!'' तोंडाचं बोळकं उघडं ठेवून अदू खदा खदा हसला, आणि ''बोल बोल ..आईशी बोल'' म्हणत त्याने ताईंना फोन दिला.

ताई म्हणजे प्रज्ञेयच्या आई - लक्ष्मीताई-अतिशय शांत स्वभावाच्या धीराच्या बाई! ''काय रे ठीक चाललंय ना सगळं? ते पोट बिघडलं होतं म्हणालास, झालं का नाही नॉर्मल?'' ताईंनी शांतपणे सगळी बातमी काढून घेतली. जिथे द्यायचा तिथे मोजकाच सल्लाही दिला त्याला! ताई एकूणच सर्वांशी आपुलकीने बोलायच्या. प्रज्ञेयच्या काही मित्रांना तर त्यांच्याविषयी एक वेगळंच प्रेम आणि आदर वाटायचा. त्यांचा घरोबा एवढा असे की प्रज्ञेय जर्मनीला गेल्यानंतर सुद्धा ही मित्रमंडळी नियमाने येऊन जाऊन असत. ताईंना चहा करून द्यायला हक्काने सुचवीत आणि अदूबरोबर गप्पा मारून निघून जात...अदू तर गमतीना त्यांना म्हणायचा सुद्धा, ''अगं त्यांच्या कित्येक शंकांचं निरसन, माझ्या बडबडीने होत नसेल ते तुझ्या प्रेमळ वागण्याने होतं!!''... या घरात आल्यावर प्रत्येकाला एक सुखद असा अनुभव येत असे! कोणी त्याला 'अध्यात्मिक शांति' म्हणत असे...कोणी त्याला साधी 'घरेलु प्रसन्नता' म्हणून अनुभवत असे!! ...आणि याला कारणेही तशीच होती ...

लक्ष्मीताईंनी तर लग्नाआधीपासूनच 'देवनाथ' यांचा गुरुमंत्र आणि दीक्षा घेतली होती. देवनाथ यांनीच अद्वैत म्हणजे अदूला घरजावई करून घेण्यासाठी होकार दिला होता. ताई धाडसी, धार्मिक आणि परमार्थात अधिकारी असलेल्या गृहिणी! अदूचं मात्र वेगळं होतं. लग्नानंतर सुद्धा त्याचं अध्यात्मिक आणि इतर वाचन, मनन चालू राहिलं. बियर त्याला आवडत असे तरी, प्रज्ञेयच्या मुंजीनंतर मात्र अदू पार बदलला. कारण कळलं नाही, पण नंतर कधी सिगरेट नाही-दारू नाही. घरांत जमलेल्या १५/२० लोकांसमोर बसून जर तो गप्पा मारायला लागला तर लोक भाबडे चेहरे करून प्रवचन असल्यासारखे ऐकत बसायचे!! .... त्याचा मिष्किल स्वभाव आणि मोठ्यांदा हसण्याची सवय सोडून बाकी सगळं बदललं होतं. आता मागच्या ३५-४० वर्षांपासून तर अदू ''अदूगुरुजी'' म्हणून प्रसिद्ध झाला होता.

आज दुपारचा चहा घेऊन जेव्हा लच्चम्मा आली तेव्हाच भास्करशास्त्री आले होते. लच्चम्माने भास्करशास्त्रींना चहा दिला तरी नेहमीप्रमाणे भास्करशास्त्रींचं त्याच्याकडे फारसं लक्ष नव्हतं! त्यांनी आणलेल्या वहीत ते काहीतरी बघण्यात व्यस्त झाले होते. खरं म्हणजे लच्चम्माही तशी चौकस आहे. येणाऱ्या जाणाऱ्यांकडे तिचं बारकाईनं लक्ष असतं असंच म्हणावं लागेल. आणि भास्करशास्त्री जरी अगदी नेहमी येणाऱ्या जाणाऱ्यातले नसले तरी त्यांचे वेगळेपण लच्चम्माला माहीत होते. भास्करशास्त्री हे सर्वमान्यच नव्हे तर सर्वांनी अनुभवलेले, ज्योतिषी होते. त्यांचं एकही भाकित आजपर्यंत खोटं ठरलं नव्हतं...हा एक अजून विशेष योगायोग मानला जात असे.

पण भास्करशास्त्रींची भविष्य सांगण्याची पद्धत फारच वेगळी होती. वेगळी काय? फार वेगळ्या अटीतटींची होती म्हणावी लागेल. एकतर ते वर्षातून फक्त २४ भाकितेच करीत, प्रत्येक पंधरवड्याला एक. दुसरी अट म्हणजे त्या भविष्य सांगण्याचे पैसे / दक्षिणा म्हणून

काहीच स्वीकारत नसत. शिवाय त्या २४ पैकी २० प्रश्नच फक्त दुसऱ्या कोणी विचारले तरच त्याचे भाकित बघायचे! उरलेले चार प्रश्न त्यांच्या स्वत:च्या मनात आलेल्या प्रश्नांची उत्तरे असत. यांत त्यांच्या इंट्यूशनचा फार मोठा सहभाग असे आणि त्यामुळे हे प्रश्न दुसऱ्या कोणी विचारलेल्या प्रश्नांशी संबंधित नसत. याचे स्पष्टीकरण कोणाला द्यायला ते बांधील नसत, आणि त्यांच्या कॅलक्यलेशन, इंट्यूशन आणि कन्क्लूजन्सवर त्यांचा स्वत:चा १००% विश्वास असे. या सगळ्या पार्श्वभूमीवर ते फक्त अदू आणि ताईंशीच उघड चर्चा करीत आणि ते सुद्धा प्रत्येक वेळी नव्हे तर जेव्हा संबंधित घटना असेल तेव्हाच!! या अध्यात्मिक जोडप्यावर, त्यांनी गाठलेल्या अध्यात्मिक पातळीवर त्यांचा विश्वास होता म्हणून!...अन्यथा हे केवळ अशक्यच होते.

...आज लच्चम्माने त्यांना चहा देताना त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बघितले, तेव्हा तिला काहीतरी वेगळं वाटलं खरं! ताईंच्या बाबतीत भास्करशास्त्रींना काहीतरी विशेष जाणवलंय असा संशय तिच्या मनात आला बहुतेक!! कारण शास्त्री आज आले ते मट्कन खालीच बसले होते. घाईत त्यांनी अदूला एक चिठ्ठी दिली, चहा प्याले... अन् लपून डोळे पुसत निघून गेले! लच्चम्माच्या मनात पाल चुकचुकली. लच्चम्मा या घरातली लक्ष्मीताईंच्या वडिलांनी सांभाळून घेतलेली कामवाली. लहान वयातच लग्न केलं गेलं होतं अन् लहानपणीच नवऱ्याने तिला वाऱ्यावर सोडून दिलं होतं. आई-वडील तर आधीपासूनच नव्हते. कामाला, वागणुकीला आणि चारित्र्याला अतिशय स्वच्छ बाई! अदूला तिच्याबद्दल नुसती आपुलकी नव्हे तर आदर होता. लच्चम्मा न बोलताच निघून गेली.

लच्चम्माच्या अस्वस्थ नजरेतला संकेत ओळखून लगेच ताई तिथे आल्या....लच्चम्मा अजून चहाचे रिकामे कप उचलत होती. ताईंनी विचारले, '' का गं, लगेच गेले की शास्त्रीबुवा, घाईचं कारण?'' लच्चम्माला सुद्धा काही कळलं नव्हतंच नाहीतरी. तिनेसुद्धा नुसताच हुंकार दिला. लच्चम्मा आत निघून गेली.

अदूने ताईंना सांगितले, ''चिठ्ठी देऊन गेलेत! काहीतरी चिंतेत, व्यथेत होते असं वाटतंय, मी पण विचारलं नाही. चिठ्ठी वाचून सांगतो तुला''. अदूच्या बोलण्यात शांतपणा होता, पण चेहऱ्यावर कृत्रिमपणे राखून ठेवलेला संयम जाणवत होता. नीट विचार करून ताईंनी अदूलाच उलट शांतपणे सांगितलं, ''असू दे! असेल काहीतरी विचित्रच! नाहीतर शास्त्रीबुवा असे घाईत जाणार नाहीत!...नीट बघ, वाच आणि थोड्या वेळाने सांगितलंस तरी चालेल पण चिठ्ठी परत परत वाचून बघ. काहीही असू दे ना! तू कशाला काळजी करतोस आधीच!'' लक्ष्मीताईंच्या शांत, धीरगंभीर आणि समजावणीच्या सुरात सांगण्याला, अदूला त्या एकेरी नावाने संबोधतात हे किती उचित वाटत होतं!!

चिठ्ठी वाचल्यानंतर, अदू तर डोळे मिटून एकदम गप्पच झाला. लक्ष्मीताईंना अदू म्हणाला, ''बैस जरा.'' चिठ्ठी नीट एकांतात वाच! भास्करचं भाकित आणि कॅलक्युलेशन्स कधी आजपर्यंत चुकली नाहीत, तुला माहित आहेच! त्याने आकडेमोड करताना आज आपल्या घरातले 'लक्ष्मी' असं नाव आलंय...!

अदूचा आवाज भरून आला. तो पुढे म्हणाला, ''म्हणजे कधी खोटं ठरणारच नाही असं नाही पण...मनाची तयारी कर! '' ...अदूच्या हातातली चिठ्ठी त्याने ताईंच्या पुढे धरली होती. ताईंच्या लक्षात आलं, अदू इतकं तुटक तुटक आणि कमी कधी बोलत नाही. ''ही चिठ्ठी वाचलीस की तुला सगळं कळेल!'' असा भाव जणू काही अदूच्या गप्प बसण्यात होता. एक सुस्कारा टाकून ताईंनी अदूच्या हातातली चिठ्ठी घेतली आणि तिथल्या तिथे वाचली...ताई वेगाने त्यांच्या गुरुंच्या फोटोकडे गेल्या, फक्त तीन ओळी त्यांनी प्रज्ञेयसाठी लिहिल्या. अदू त्यांच्या मागे मागे शांतपणे गेलाच होता. मनाचा प्रचंड निर्धार आणि त्याच वेळी निर्णय घेण्याची जबाबदारी, अशा परिस्थितीत स्वत:ला कसं सांभाळून न्यायचं, याची ताईंची एक स्वत:ची पद्धत होती. जे काय घडेल त्याला सामोरं जायचं हे तर अटळच होतं. मुद्दा एवढाच होता, की मनाला जरी वाटलं, पटलं नाही तरी काहीही घडू शकेल हे समजून पुढच्या तयारीला पटकन लागणे जरुरीचे होते. काही गोष्टींची घरच्या घरी तयारी करणे भाग होते. काही गोष्टी बाजारातून आणून ठेवणे होते. लच्चम्माला त्यांनी बाजारातून त्या-त्या गोष्टी आणायला सांगितल्या. लच्चम्मा घाईत निघून गेली. ताईंनी अदूचा हात हातात घट्ट धरून सांगितलं, ''मी इथेच देवघरात डोळे मिटून शेवटपर्यंत बसू इच्छिते. म्युझिक लावून ठेव हळू आवाजात. तू मनाची तयारी कर, बाकीची मी करते!! बरीच धावपळ लच्चम्मालाही करायला सांगितली आहे...जन्म-मरणाबद्दल सांगत असतोस ना लोकांना, ते आता दिसू दे तुझ्या चेहऱ्यावर!''

ताई आत गेल्या, डोळे मिटून ध्यानस्थही झाल्या. किती विचारांचा केवढा मोठा गदारोळ त्यांच्या मनात त्यावेळी झाला! आपल्याच घरात आपल्यावर अंत्यसंस्कार होत आहेत असं चित्र त्यांना दिसत होतं. एक क्षण असाही आला , त्यांच्या मनात विचार आला, ''जर आधीच माहीत झाले आहे तर सुखासुखी हा घरातला एक विशेष पद्धतीचा सोहळाच झाला की! साजरा करूया शांतपणे सगळे मिळून!'' ... शेवटी शेवटी मन शांतही होत गेलं त्यांचं. ...घरात वेगळ्याच पद्धतीचं वातावरण होतं. अदूच्या डोक्यातलं वादळ अजून तसंच होतं. म्युझिक ताईंनी सांगितल्याप्रमाणे हळू आवाजात होतं. लच्चम्मा बाजारात ताईंनी सांगितलेल्या खरेदीत व्यस्त होती. घर अनामिक शांततेनं भारलेलं होतं, नि:शब्द होतं... अदू बाहेर फेऱ्या मारत होता.

...अचानक त्याला बाहेर लिफ्टपाशी आवाज येतोय लोकांच्या बोलण्याचा, असं वाटलं. पहिल्यांदा त्याने टाळलं, पण नंतर त्यालाही वाटलं काय आहे ते बघून यावं, म्हणून तो बाहेर गेला. लिफ्टपाशी लोक जमले होते. लिफ्टच्या आत कुत्रं विव्हळत होतं. बाजूला कोपऱ्यात हातात ३/४ मोठ्या पिशव्या धरून असलेली लच्चम्मा कोसळली होती. तिचे डोळे अर्धवट उघडे होते, चेहऱ्यावर जबाबदारी पूर्ण केल्याचं समाधान होतं. तिचा श्वास बंद होता.

अदूला क्षणार्धात उलगडा झाला, 'लच्चम्मा म्हणजेच नावाने खरी लक्ष्मीअम्मा'! भास्करचं भाकित तंतोतंत खरं होतं. अदू पटकन घरात ताईंपाशी गेला. त्याने ताईंच्या खांद्यावर हात ठेवून हळू आवाजात सांगितले, '' ऊठ... अगं आपली लच्चम्मा..लच्चम्मा

गेली. लिफ्टपाशी आहे ती. चल लगेच.''

ताई शांतपणे उठल्या. कल्पनेत ताईंनी जिथे स्वत:चा देह ठेवलेला बघितला होता... तिथे लच्चम्माचा देह ठेवला गेला होता. ताईंनी त्या भारी साडीसकट, कुंकवा – वेणी सकट स्वत:च्या हातानी लच्चम्माला सजवलं.

क्षणभराकरता...ताईंनी स्वत:च्याच देहाला आणि समाधानी चेहऱ्याला सजवलं...!

सगळा विधी स्वत:चा समजून शांतपणे पार पाडला. त्या रात्रीचा काळोख आजपर्यंतच्या उजेडापेक्षाही जास्त काही शिकवून गेला, दोघांनाही, अदूला आणि ताईंना!

सकाळची कोवळी उन्हं पुन्हा पाखरं आल्यासारखी आत आली...क्षणात उमटली, क्षणात विरून गेली. या क्षणिकाचा खेळ बघण्याचा अदूचा रोजचा छंद आता वेगळी कलाटणी घेत होता...!

.... आता रिकामी कप-बशी न्यायला लच्चम्मा बोलावून सुद्धा येणार नव्हती....!

– प्रकाश धर्म, हैदराबाद
भ्रमणध्वनी : ९८४८०४९१२३
swa_dharma@yahoo.com

भिन्न की अभिन्न?

तासाभराचा झालेला उशीर, रंजनाला झटाझट कामं आटपून भरून काढायचा होता. मॅडम काही म्हणायच्या आतच तिच्या हाता-पायांनी वेग घेतला. नव्या कुर्ता-ओढणीला मॅचिंग काचेच्या बांगड्या घरभर लयीत खुळखुळत होत्या. त्या तालावर नाजूक पैंजणही नाचत होते. ओढणीचं टोक दातात धरून चेहरा अर्धवट झाकताना होणारा बांगड्यांचा नाद, निकिता मॅडमला असह्य होऊ लागला. रंजनाच्या चेहऱ्यावरील भाव न्याहाळण्याच्या निकिताच्या व्यर्थ प्रयत्नानंतर

''धनी आलं घरला... काल रातच्याला''... आल्यापासून नजर चुकवणाऱ्या रंजनाने, मॅडमकडे लज्जित मुद्रेने बघितलं.

निकिताने केलेला अंदाज खरा ठरला. पोटात न मावणारा आनंद चेहऱ्यावरून ओसंडून वाहताना, रंजना हसून लाजताना; निकिताच्या डोक्यात तिडीक गेली.

नवरा तीन दिवस बेपत्ता म्हणून जिच्या जीवाची घालमेल होत होती, तो परतल्यावर सणासुदीसारखी नटून ती मिरवत होती...? बायकोच्या कमाईवर मजा मारणाऱ्याला 'धनी' संबोधताना, दहा हत्तीचं बळ 'तिच्यात' का येत होतं? कुठे पडला होता तिचा 'धनी' ते त्याला स्वतःलाही धड आठवत नसेल. रंजना ह्याचाच हात धरून, आई-बापाच्या घरातून बाहेर पडली होती... त्याच्यावर आंधळा विश्वास ठेवून, की त्याने फूस लावली कमावत्या रंजनाला? आज लालिमा झाकणारी रंजना, उद्या तना-मनावरील ओरखडे पदराआड लपवत, आतल्या-आत मुसमुसत, गलितगात्र होऊन कामाचा रगाडा रेटेल. चार बांगड्याही वाढल्या असतील... 'हे लज्जास्पद कोणाला वाटायला हवं होतं...??'

पोटतिडीकीने सल्ले देणाऱ्या मॅडमचं निमूटपणे ऐकताना, रंजनाने ना कधी मान वर करून बघितलं ना चकार काढला तोंडातून!

डोक्यावरून ओढणी घेत रंजना, ''कुकू, बाईमानसालाच सांबाळायला लागतंय...'' असं म्हणे.

रंजनाच्या माथ्यावरील ठसठशीत कुंकू आणि गळ्यालगतची काळ्या मण्यांची पोत, निकिताच्या नजरेला खुपू लागली. प्रामाणिक रंजनाचं काम स्वच्छ होतं, म्हणून तिचं अशुद्ध बोलणं, उशिरा येणं निकिता खपवून घेत असे. तसंही कामाला येणाऱ्यांपैकी ती 'एकच' होती 'मायबोली' जाणणारी...

वाजणाऱ्या मोबाईलकडे दोनदा दुर्लक्ष करून, डोळे मिटून शेवटी निकिताने मान हलवली. रागाच्या भरात फोन उचलणाऱ्या निकिताचा चेहरा, त्यावरचा मेसेज वाचून खुलला.

तीच संधी साधून मान वर न करताच रंजना म्हणाली, ''सर येनार वाटतंय?...''

निकिताने काहीही न सांगताही, 'डॅनियल' येणार असल्याची मॅडमच्या चेहऱ्यावरची ख़ुशी, रंजनाने अचूक टिपली होती...

मोबाईल हातात फिरवताना, निकिताचं मन बाल्कनीतल्या झोपाळ्यावर झुलू लागलं बिझनेसमुळे दिवसेंदिवस डॅनियल शहराबाहेर, देशाबाहेर असायचा. तो विमानतळावर उतरल्याचं समजताच, निकिताच्या मनातले भाव तिच्या चेहऱ्यावर नकळत उमटून खुलले. तशाच काहीशा अवस्थेत तिने रंजनाला काही वेळापूर्वी बघितलं होतं... निकिताचा हात स्वतःच्या मोकळ्या गळ्याकडे गेला. कंठ दाटून आलेला हुंदका दाबताना, तोंडातून उसासा बाहेर पडला. रिकाम्या कपाळावर जमा झालेले थेंब तिने हलक्या हाताने टिपले. 'भुंडा' हात अंगठीवर फिरताच, घसघशीत हिरा लखाखला...

डॅनियलच्या तिच्या आयुष्यात येण्याने स्वतःचं नाव, भाषा, राहणी... सगळ्यातलंच 'मराठीपण' एक एक करत निकिताच्या आयुष्यातून पुसून गेलं होतं. तिच्याच वडिलांच्या कंपनीत, तिच्यापुढे हाजी-हाजी करणाऱ्या डॅनियलने, वडिलांचा विश्वास अशाप्रकारे संपादित केला; की लेकीपेक्षा जावयाच्या कर्तबगारीवर त्यांचा भरवसा अधिक होऊ लागला. निकिता राजी नसतानाही, तिच्या बरोबरीने डॅनियलला मॅनेजिंग डायरेक्टरच्या पदावर बसवून; वडिलांनी कंपनीची सूत्रं हळूहळू त्याच्याकडे हस्तांतरीत केली. तिच्या तत्त्वांत न बसणाऱ्या निर्णयांच्या कागदपत्रांवर सह्या करण्यापुरतीच तिची किंमत उरली??

अनेकदा डॅनियलशी शाब्दिक चकमकीत निर्वाणीची भाषा झाली, पण तेवढ्याने संसार मोडायचा??? सामंजस्य दाखवत ती घाव सोसत होती. पैसा, इस्टेट, स्टेटस सगळं असूनही लाभत नव्हती ती मनःशांती! ऑफिसमधले मतभेद तिथे न मिटता, घराच्या

दारातून निकिता-डॅनियलबरोबर बेडरूमपर्यंत येऊ लागले. अखेर राजीनामा देऊन तिने बिझनेसमधील आपला हक्क आणि लक्ष दोन्हीही काढून घेतलं

यानंतर तरी, सुखाने ओंजळ भरलेली राहावी या आशेवर निकिता आजही आहे. सगळं झुगारून देण्याचा विचार तिच्या मनात पुन्हा उसळून आला. रंजनाला समोर बघितल्यावर, एकाच रिळाच्या दोऱ्याने दोघी बांधल्या गेल्याची जाणीव निकिताला झाली. संपत्ती, ऐश्वर्य असूनही रंजनाच्या सौभाग्य लेण्यांच्या श्रीमंतीची क्षणभर असूया वाटली निकिताला. माध्यान्हीच्या उन्हाचे चटके तिला बाल्कनीतल्या झोपाळ्यावर बसू लागले.

मनातले विचार झटकत निकिताने स्वयंपाकघरात रंजनासाठी जेवणाचं ताट वाढलं. उपाशीपोटी राबणाऱ्या रंजनाला, खाण्याचा मोह अजिबात झाला नाही. मॅडमच्या आग्रहाखातर रंजनाने जेवण बांधून बरोबर नेण्याची परवानगी मागितली. तिने जेवण घरी नेलं तर त्यातले दोन घाससुद्धा रंजनाच्या पोटात गेले नसते. तिचा अधाशी नवरा तिच्यावर आणि जेवणार तुटून पडणार... आणि मुलं चांगलं-चुंगलं खायला आसुसलेली असणार!

''मॅडम, तुमी ज्येवता का...? माज्यासोबत... आत्ताला?'' रंजनाच्या प्रश्नावर निकिताचा नकार उघड होता. जरी ती टेबलावर, आणि रंजना आपली पायरी ओळखून फरशीवर बसून जेवल्या तरी!

''मला म्हैतीए मॅडम, जेवनाची वेळ जाली तरी तुमी सरांसाठी थामताय! तसं माजां धनी ज्येवला नसताना, मला जेवन गोड लागल का सांगा?'' रंजनाने ओळखलं.

तसं काही नसल्याचं दाखवत निकिताने जेवणाचं टाळलं. आज डॅनियल येण्याचं अपेक्षित होतं म्हणून 'कुक'ला सुट्टी देऊन निकिताने स्वतः त्याच्या आवडीचा स्वयंपाक करून ठेवला होता. पण डॅनियल विमानतळावरून परस्पर ऑफिसला जाऊन रात्रीच्या पार्टीतच निकिताला भेटणार होता. खूप मोठं बिझनेस डील मिळाल्याचं सेलिब्रेशन फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये होणार होतं.

''मॅडम, माज्या धनीचा तुमी राग-राग करता तरी जेवन पाठवताय?'' स्वतः पोटभर जेवल्यापेक्षा सोबत बांधून घेतलेल्या अन्नाची तृप्ती रंजनाला जास्त होती. निकिताने रंजनाला जेवण बांधून दिलं पण त्या आधी तिच्यासाठी वाढलेलं ताट बळेच संपवायला लावलं. काहीही उत्तर न देता निकिता बाल्कनीकडे वळली.

लगबगीने बाहेर पडताना रंजना म्हणाली, ''नसला येत धनी रोजच्याला घराला, तरी येताना आमाला कापडं-चोपडं आणून खुश करून टाकतोय ते कमी हाय का?

तापलेल्या बाल्कनीत निकिता पुन्हा येऊन उभी राहिली. रंजनाबरोबर काही जणी कामं संपवून, डोक्यावर पदर घेत सुख-दुःखाच्या वाटेवरून आपापल्या काडेपेटीसारख्या घरांच्या दिशेने जात होत्या. स्वतःकडे निरखून बघताना तशीच ठिगळं तिच्याही आयुष्याला जोडलेली तिला दिसू लागली. कोरड पडलेल्या घशातून, आवंढाही गिळला जाईना, उच्चभ्रू सोसायटीमधील गगनचुंबी इमारतीतल्या काचेच्या घरातून, दूरवर पत्र्याच्या शेडमध्ये थाटलेले संसार बघताना, आज दोन्हीतली दरी तिला मिटताना दिसू लागली काही वेळाने झळा आपोआप कमी झाल्या.

आईच्या पश्चात माहेरही तुटल्यासारखंच झालं होतं निकिताचं... बेडरूममधल्या कपाटातून तिने हलक्या लेमन कलरची, आईने लग्नात दिलेली तिची आवडती साडी निवडली. त्याला शोभेसे दागिने, पर्स, चपला सगळं समोर मांडलं. स्वतःच्या मर्जीने हे करताना ती हरखून गेली. आज काहीही झालं तरी पार्टीला ह्याच पोशाखात जायचं ठरवून ती मेकअप करण्यासाठी ड्रेसिंग टेबलाजवळ गेली. डॅनियलच्या भारी सूटला आपण विजोड दिसलो तरी चालेल, पार्टीत 'मिसफिट' वाटलो तरी तिची हरकत नव्हती.

मनासारखा मेकअप झाल्यावर तिच्यात समाधानाची आनंद लहर उठली.

आरशात बघताना डॅनियलचा मेसेज आला, 'डार्लिंग, आय हॅव सिलेक्टेड अ ड्रेस फॉर यु फॉर द पार्टी...' तिने मेसेजची पुढची ओळ वाचलीच नाही डॅनियलने तिच्यासाठी खरेदी केलेला ड्रेस तो घरी पाठवणार आणि तोच घालून तिला पार्टीला जावं लागणार... ह्यात नव्याने वाचण्यासारखं काहीच नव्हतं

रंजनाने दहा कामं धरली होती म्हणून तिचा संसार तरला होता. नाहीतर नवऱ्याच्या अनियमित कमाईवर फरफट झाली असती तिची आणि मुलांची. नसेल पैसा आणत तो घरात, पण तिला कमवायला तरी त्याने बंदी घातली नव्हती ना! तिच्या गाठीला चार पैसे होते म्हणून तिला नवऱ्यापुढे पदर पसरावा लागत नव्हता. उलट, एखादी नोट काढून तीच त्याच्या हातावर ठेवत असेल. मुलांनाही हे कळल्यावाचून राहात नसेल की कोणामुळे त्यांना भरल्यापोटी शांत झोपता येतं ते...

ह्यातलं काहीच निकिताच्या वाट्याला आलं नव्हतं. आपल्या 'डॅड'मुळेच आपण सगळी सुखं उपभोगत असल्याचं दृश्य तिच्या मुलांसमोर होतं

आटलेल्या डोळ्यांतून निकिताची संपणारी सहनशक्ती वाहू लागली, रडवेला चेहरा झाकायला, तिने स्वतःच लावलेल्या वॉटरप्रूफ मेकअपचे थर त्यांची भूमिका चोख बजावत होते. तिची पापणीसुद्धा ओलावली नाही, ना एक अश्रूही तिच्या सोबतीला तिच्या गालांवर थांबला नाही...

– वैशाली फाटक-काटकर
मोबाईल/व्हॉट्सप: ०९८८०४ १३१९३ (भारत)
+६१ ४२६६ २२११५ (ऑस्ट्रेलिया)
vaishaleehotmail.com
फेसबुक पेज (Vaishali's Writing Desk): https://www.facebook.com/vaishaliphatak.katkar/

'मनबावन'

११ जानेवारी २०२० नवीन वर्षात ललिता छेडा यांच्या मनबावन याचे प्रकाशन सर्वेश हॉलमध्ये अनोख्या पद्धतीने झाले. पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे एक मोठे बॅनर बनविले होते. त्यावर सुंदर पडदा लावला होता. या प्रकाशन सोहळ्याला अध्यक्ष होत्या श्रीमती सायली राजाध्यक्ष. साहित्याची जाण असलेल्या 'ब्लॉग' लिहिण्यात यशस्वी झालेल्या सायली यांच्या साड्या व पाकक्रियांवरील ब्लॉग एकदम प्रसिद्ध. या समारंभात प्रमुख अतिथी होत्या प्रसिद्ध लेखिका विनिता ऐनापुरे. त्या खास प्रकाशनासाठी पुण्याहून आल्या होत्या. विशेष गोष्ट म्हणजे 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर मुद्दाम साहित्य संमेलनातून वेळ काढून आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि मधुर स्वरांनी झाली. त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांचा पुस्तकभेट व छोटंसं रोप (कुंडी) देऊन स्वागत करण्यात आले. त्याचवेळी पुस्तकाकरिता ज्या लोकांनी मदत केली असे फ्रेंडकट्टा व ग्रंथालीचे प्रभाकर भिडे यांचा तसेच पुस्तकाचे उत्तम मुखपृष्ठ बनवणारे सतीश भावसार यांचा सत्कार करण्यात आला.

त्यानंतर लेखिका ललिता छेडा यांनी ब्लॉगवर अचानक सुरुवात कशी झाली आणि एका वर्षात बावन्न ब्लॉग कसे लिहिले याविषयी आपल्या मनोगतात सांगितले. आजी कथा लिहिते हे बघून नातीने व सुनेने कसा हातभार लावला ते आवर्जून सांगितले. तसेच ब्लॉग लिहिताना मनाशी एक सूत्र ठरवण्यात आले होते. या सर्व कथा स्त्रियांसंबंधी व त्यांनी एकाकीपणे पण सकारात्मक दृष्टिकोनांतून प्रश्न किंवा अडचणी कशा सोडवल्या हे सांगितले.

त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्य सांगताना श्रीमती विनिता ऐनापुरे यांनी सर्व कथा (सर्वसामान्य) घरामध्ये घडतात अशा आहेत. कथेला शेवट कुठेही ओढून-ताणून आणलेला नाही. भाषासुद्धा साधी-सोपी असून त्यांत नेमकेपणा आहे. कुठेही वर्णनात पाल्हाळीकपणा नाही. आवश्यक तेवढेच तपशील असून सुरुवातीच्या छोट्या कथा पुढे विस्तृत झाल्या आहेत. एकंदरीत या कथा सर्वसाधारण लोकांना आपल्याच घरातील वाटतील अशा असून त्यामुळे वाचनप्रियता आली आहे.

यातील तीन कथांचे अभिवाचन जयश्री कर्वे, आरती मुनिश्वर व दिपाली काळे यांनी केले. त्यामुळे पुस्तकातील कथांची ओळख झाली. यावळी भारती मोरे यांनी तिघींची ओळख करून कथागोष्टीचे सूत्रसंचालन उत्तम पद्धतीने केले. विनिता ऐनापुरे यांनी ललिता छेडा यांच्या लिखाणासंबंधीची वैशिष्ट्ये सांगताना निसर्गदृश्यांचे वर्णन. घडणाऱ्या विविध घटना. त्यांतील माणसे यांचे वर्णन हे ललित अंगाने पण चिंतनीय व वाचनीय झाले आहे, यामध्ये प्रतिभेचा स्पर्श जाणवतो असे आवूर्जन सांगितले.

तत्पूर्वी कन्या नीलम हिने आपल्या आईची ओळख करून देताना 'आई, कुठलेही काम करताना पुढे येणाऱ्या अडचणी अगोदर समजून घेऊन त्यावर उपाययोजना करते. साहजिकच प्रत्येक काम यशस्वी होते. आईचा स्वभाव स्पष्ट व मनमोकळा असल्यामुळे कुठल्याही विषयावर संवाद होऊ शकतो' असे मत मांडले.

शेवटी अध्यक्ष सायली राजाध्यक्ष यांनी कुठलाही ब्लॉग लिहिताना कशी काळजी घ्यावी व तो कशा प्रकारे लिहावा ते सांगितले. ब्लॉग हा कथालेखनाचा नवीन प्रकार आहे. (याबाबत त्या अतिशय प्रसिद्ध असून त्यांचे ब्लॉग लोकप्रिय आहेत) त्यांनी स्वत: साड्या व पाकक्रिया यावर ब्लॉग लिहिल्यामुळे त्यांना गुलाबजाम चित्रपटात काम मिळाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध पत्रकार मीना गोटखिंडी यांनी अत्यंत नेटक्या शब्दात (अनेक वाङ्मयीन शब्दांची पेरणी करीत केली.) केल्यामुळे साहित्यिक वातावरणात तसेच वेळेचे काटेकोर नियंत्रण करीत केल्यामुळे कार्यक्रम (कंटाळवाणा न होता) हवाहवासा वाटला. शेवटी ललिता छेडा यांच्या स्नुषा निधी छेडा यांनी आभार मानले व सहभोजनाचा आस्वाद घ्यावा अशी आग्रहाची विनंती केली. त्या स्वत: कमर्शियल आर्टिस्ट असल्यामुळे त्यांनी कार्यक्रमाचे आमंत्रणसुद्धा आकर्षक केले होते. तसेच संपूर्ण कार्यक्रमासाठी आकर्षक डेकोरेशन कन्या नीलम यांनी केल्यामुळे कार्यक्रमाला घरगुती पण उत्साही वातावरण जाणवत होते. कार्यक्रमात मकरसंक्रांतीचे वातावरण असल्यामुळे गोड गुळपोळी व स्वादिष्ट जेवण याचा आनंद सगळ्यांनी घेतला. आनंदाचा भाग म्हणजे कार्यक्रमात पुस्तकविक्री चांगली झाली.

याच आनंदाबरोबर ललिता छेडा व डॉ. मुळचंद्र छेडा यांच्या विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यामुळे नातवंडे, मुले-मुली व छेडा कुटुंबीय यांनी पुस्तकाच्या आकाराचा मोठा केक आणला होता. तो केक कापून सर्व वातावरण आनंदमय झाले. सर्व प्रेक्षकांना बरेच दिवसांनी एक साहित्यिक आणि कौटुंबिक कार्यक्रम साजरा झाल्याचे समाधान मिळाले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे माधवराव जोशी व डोंबिवलीत बरेच मान्यवर उपस्थित होते.

– प्रभाकर श. भिडे, डोंबिवली
भ्रमणध्वनी : ९८९२५६३१५४

'वाटेवरले दिवे'



'ग्रंथाली' प्रकाशनातर्फे नीला उल्हास चांदोरकर लिखित 'वाटेवरले दिवे' पुस्तकाचा प्रकाशन समारंभ २४ जानेवारी २०२० रोजी उत्कर्ष सेवा मंडळ विलेपार्ले (पूर्व) या ठिकाणी डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. प्रमुख पाहुणे या नात्याने सुप्रसिद्ध लेखक अशोक बेंडखळे व ज्येष्ठ लेखिका माधवी कुंटे ही मंडळी उपस्थित होती.

बेंडखळेंनी प्रशंसेच्या जोडीने लेखिकेस काही मोलाच्या सूचना दिल्या. माधवी कुंटेंनी पुस्तकात लेखिकेने शंभराहून अधिक वर्षांचा सामाजिक पट समर्थपणे सादर केल्याचा कौतुकपूर्ण उल्लेख केला.

लता रेळेंच्या निवेदनामुळे कार्यक्रमास सुसूत्रता लाभली.

'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर व कार्यक्रम संयोजक धनश्री धारप यांचेही नीला चांदोरकरांनी आभार मानले.

प्रमुख पाहुण्यांना भेटवस्तू आणि सर्व उपस्थितांना अल्पोपहार व 'वाटेवरले दिवे'ची प्रत देऊन निरोप देण्यात आला.

'अमेरिका : स्थिती व स्थित्यंतरे'

डॉ. अनंत लाभसेटवार लिखित 'अमेरिका स्थिती आणि स्थित्यंतरे' या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन ग्रंथाली कार्यालयात दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी निमंत्रितांच्या उपस्थितीत करण्यात आलं. हे पुस्तक मुख्यत्वेकरून अमेरिकेवर लिहिलेलं असलं तरी त्यात चीन, भारत व इतर जगाविषयी अनेक लेख समविष्ट केलेले आहेत. आत्तापर्यंत सात कादंबऱ्या, तीन कथासंग्रह, पाच प्रवासानुभव, सहा चरित्रग्रंथ आणि पाच लेखसंग्रह लिहिणाऱ्या अनंत लाभसेटवार यांचे हे अमेरिकेच्या सामाजिक, सांकृतिक, राजकीय जीवनाचा लेखाजोखा मांडणारे आणखीन एक महत्वाचे पुस्तक होय. अमेरिकेला गेल्यावर स्वर्गाचं दार उघडतं, जीवनसंघर्ष संपतो असा सार्वत्रिक समज! त्यामुळे जगभरातील लोक आपल्या स्वप्नपूर्तीसाठी अमेरिकेच्या वाटेवर डोळे लावून बसलेले असतात. जगाला अमेरिकेचं एवढं आकर्षण असलं तरी या देशात सर्वच सोनं नाही असं खोलवर बघितल्यावर कळून येतं. अंमली पदार्थांचं व्यसन, लग्नव्यवस्थेची वाताहात, आर्थिकदृष्ट्या डोक्यावर असलेलं २२ ट्रईलियन डॉलरचं वाढतं कर्ज असे अनेक गहन प्रश्न अमेरिकेला भेडसावत आहेत. या सगळ्याचा सांगोपांग आलेख अमेरिकेत गेल्या ५० पेक्षा जास्त काळ व्यतीत केलेल्या अनंत लाभसेटवार यांनी अचूकपणे या पुस्तकात मांडला आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी साहित्यात मोलाची भर टाकणारे हे पुस्तक लिहिल्याबद्दल त्यांनी लाभसेटवारांचे मनापासून कौतुक केले. यानंतर एकूणच 'अमेरिका आणि वास्तव' या विषयावर गप्पांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी निमंत्रितांना संबोधित करताना लाभसेटवार यांनी ट्रम्प यांच्याविषयी आणि त्यांचे सरकार करत असलेल्या योजनांविषयी सविस्तर माहिती दिली. ट्रम्प यांच्या कालावधीत अनेक स्टार्टअप कंपन्या फोफावल्या आणि त्याने नोकऱ्या वाढायला सुरुवात झाली हे सत्य त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यांची पत्नी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. लता लाभसेटवार यांनीही यावेळी अमेरिकेतील आरोग्यविषयक योजना आणि भारतातील योजना यांची तुलनात्मक मांडणी केली. या समारंभात प्रभाकर भिडे, धनंजय गांगल, अरुण जोशी, लतिका भानुशाली, धनश्री धारप, सुदेश हिंगलासपूरकर, दिलीप देशपांडे, सतीश भावसार, योगिता मोरे आणि सुमेधा कुवळेकर (ग्रंथाली संगणकविभाग) इत्यादी उपस्थित होते.

विषयाला न्याय देणारा लेखक राज कुलकर्णी : दिनकर गांगल

मराठी वाङ्मयामध्ये सातत्याने वैविध्यपूर्ण लेखन करताना विषयाचे गांभीर्य, त्याची संवेदनशीलता, त्याचा आशय, परिणाम दाहकता याच्या मुळाशी जाऊन प्रत्येक हातात घेतलेल्या विषयाच्या मुळाशी जाऊन मांडणी करणारा लेखक अशी भावना 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांनी राज कुलकर्णी यांच्याविषयी व्यक्त केली.

छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात ५ जानेवारी २०२०रोजी ॲड. राज कुलकर्णी लिखित व 'ग्रंथाली' प्रकाशित 'दक्षिणेतील मथुरा-तेर' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती, 'आठवडी बाजार व समाज जीवन' आणि 'वेताळ पंचवीशी' या पुस्तकांच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष नीतीन तावडे, कार्यवाह

रवींद्र केसकर, सोलापूर विद्यापीठातील इतिहास व पुरातत्व विभागप्रमुख डॉ. माया पाटील, जिल्हा विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. राघवेंद्र बोधले, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगालासपूरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र केसकर यांनी तर लेखक राज कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. 'आठवडी बाजार' या पुस्तकातील लेखांच्या अनुषंगाने काही व्यक्तींचा यावेळी सत्कार करण्यात आला. सर्वच मान्यवरांची यथोचित भाषणे यावेळी झाली. 'दक्षिणेची मथुरा-तेर' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. माया पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी तेर या प्राचीन वारसा असलेल्या नगराचे वैभव त्यांनी विषद केले. सन २०१४-१५ मध्ये महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग व संचालनालयाच्या वतीने डॉ. माया पाटील यांनीच तेर येथे उत्खनन केले होते.

गावोगावी असणाऱ्या आठवडी बाजाराचे अर्थकारण आणि समाज याची माहिती देणारे पुस्तक म्हणजे 'आठवडी बाजार आणि समाज जीवन' हे होय. तर मागील पाच वर्षांतील सामाजिक, राजकीय घडामोडींवर आधारीत बोधकथांचा संग्रह म्हणजे 'आधुनिक वेताळ पंचवीशी!' या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन दिनकर गांगल यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैभव कुलकर्णी व धनंजय कुलकर्णी यांनी केले. तर आभार ॲड. रवींद्र यांनी व्यक्त केले. यावेळी साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

– धनंजय कुलकर्णी

'सृजनयात्रा'

उस्मानाबाद जिल्ह्यात साहित्य संमेलनाच्या आठवडाआधी 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' व 'ग्रंथाली' यांनी 'सृजनयात्रा' आयोजित केली होती. 'सृजनयात्रे'च्या निमित्ताने स्थानिक पातळीवरील सर्जनशीलता प्रकट व्हावी आणि तिचे नाते इंटरनेटच्या माध्यमातून जगभर पसरलेल्या मराठी समुदायाशी निर्माण व्हावे असा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. काळ बदलला आहे, छापील शब्दांबरोबर ऑनलाईन माध्यमे उपलब्ध झाली आहेत. सृजनयात्रेत ऑडिओ/व्हिडिओ आणि मल्टिमिडिया यांचे महत्त्व ठासून सांगण्यात आले. तेथील आठ दिवस भेटीगाठींनी आणि कार्यक्रमांनी भरगच्च गेले. नितेश शिंदे व मकरंद कर्णिक यांनी 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'च्या वतीने पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनवर महाराष्ट्राचे समग्रचित्र साकारण्याचा मनोदय स्पष्ट केला. 'ग्रंथाली'ने पुस्तक प्रदर्शन, गझलधारा आणि चर्चासत्र असा कार्यक्रम ठेवला होता. त्यात चंद्रशेखर सानेकर, गोविंद नाईक आणि लेखक दीपक करंजीकर उपस्थित होते.

स्थानिक लेखक राज कुलकर्णी यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते. सृजनयात्रेस सुनील बडुरकर, राज कुलकर्णी, स्मिता शहापूरकर आणि रविंद्र केसकर यांचे सहकार्य लाभले.

ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

जातिव्यवस्था आणि महाराष्ट्रातील जाती-जमाती

सुनिल सांगळे



अस्वस्थ कोंडीच्या तळाशी जाणारे लेखन

'आज जरी विविध जातीत विवाह होत नाहीत आणि ती स्थिती मागील दोन हजार वर्षे तशीच आहे असे गृहीत धरले तरीही भारतातील जातिसंस्थेतील कोणतीही जात ही संपूर्णपणे एकाच रक्ताची आहे असे समजणे हा फार मोठा गैरसमज आहे. मनुमृतीतील नियम पाळून विविध वर्णांतील स्त्रियांचे विवाह हे इतर वर्णांतील पुरुषांशी होणे शास्त्रसंमत होते. असे असताना भारतीय जातिव्यवस्थेत कोणतीही जात किंवा वंश शुद्धतेचा दावा करू शकत नाही.'

'जातिव्यवस्था आणि महाराष्ट्रातील जाती-जमाती' हा सुनील सांगळे यांनी लिहिलेला ग्रंथ ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. जात आणि तिची व्यवस्था, चातुर्वर्ण्य व्यवस्था, उच्च-नीचता, स्पृश्यास्पृश्य, हे विषय म्हणजे समाज व्यवस्थेला चिकटलेले गेंड्याचे कातडे आहे. त्याने समाजमनाला असे जखडून ठेवलेले आहे की, भल्याभल्या सुधारकांना त्याला भेदण्यात हवे तसे यश मिळू शकलेले नाही. जात आणि तिला जोडून आलेल्या इतर व्यवस्थांसाठी आपण नेहमीच 'मनुस्मृती' या ग्रंथाला शीर्षस्थानी ठेवलेले दिसते. परंतु लेखकाने घेतलेल्या शोधानुसार कौटिल्याचे अर्थशास्त्र, नारद स्मृती, बृहस्पती स्मृती, विष्णू स्मृती, वशिष्ठ धर्मसूत्र, आपस्तंब धर्मसूत्र, गौतम धर्मसूत्र यांसारखे आणखी आधार मिळाले, जे मनुस्मृतीच्याही अगोदर धर्मग्रंथ म्हणून मनुस्मृतीसारखे सामाजिक बंधनांचे व नियमांचे संगोपन करीत होते.

स्पॅनिश आणि पोर्तुगीजमधून आलेला 'कास्ट' हा शब्द जात या शब्दाच्या मुळाशी आहे. जात हा एक सामाजिक गट असून त्याचे सदस्यत्व त्या गटाचे सदस्य असलेल्या आईबापाच्या पोटी जन्म घेतल्याने मिळते. आणि या गटातील सर्व सदस्य या गटाबाहेर विवाह न करण्याच्या अत्यंत कठोर सामाजिक नियमाने बांधील असतात, असे डॉ. केतकर सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही याच्याशी सहमती व्यक्त केलेली आहे. मूळ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार घटक परंतु यांच्यात जी इतर जातीय घटकांची भर पडली ती या चार घटकातील संकरातून. अम्बष्ठ, निषाद, सुत, मागध, चांडाळ, उग्र अशी नावे आली ती याच परस्पर विरोधी घटक संकरातून. पुढे ही पोटजातींची संख्या आणखी वाढत गेली. ती कशी, कोणती, यांची माहिती लेखकाने या ग्रंथात दिलेली आहे. पुढे ब्रह्मण, मराठा, कुणबी, बंजारा, भिल्ल, मातंग, महार, न्हावी, कहार, चारण अशी वर्गवारी करीत त्यांचे व्यवसाय, विवाह पद्धती, आचार, आहार, संकर यांचाही तपशील दिलेला आहे. यात चालीरीती, रिवाज, धर्मपद्धती, आचरण काटेकोर पालन व्हावे असा दंडक अपेक्षित होता. त्याचा भंग म्हणजे दंडाला सामोरे जाणे हा त्याचा परिणाम.

मुलगी नको, मुलगा हवा, ही काही आजची अपेक्षा नाही. पूर्वीही हीच अपेक्षा होती. स्त्रीभ्रूण हत्या, हे त्याचे पुढचे टोक कशात आहे, याचे उत्तर याच मनुस्मृतीमध्ये आहे. स्त्रियांवर असलेली बंधने, हुंडा, बालविवाह, पुनर्विवाहाला विरोध, अशी अनेक कारणे त्यापाठी आहेत. त्यांचाही वेध लेखकाने या ग्रंथात घेतलेला आहे. लक्ष्मण माने, सोनकांबळे, किशोर शांताबाई काळे, बेबी कांबळे, दया पवार अशा अनेकांच्या आत्मचरित्रांचे संदर्भ देत आपले मत स्पष्ट केलेले आहे. आवश्यक तिथे आकडेवारी, इसवीसन दिलेले आहेत. जातीची उत्पत्ती आणि जात टिकून राहण्याची कारणे, अस्पृश्यता कधी आली, अठराव्या शतकातील जातीव्यवस्था, प्रत्येक जातीत नामकरण करण्याची पद्धती, मंदिरे, असा सर्व बाजूंनी हा विषय मांडलेला आहे.

अभ्यासपूर्ण असे लेखन वाचकांच्या हाती देताना हमखास सैद्धांतिक परिभाषेच्या सोसात देण्याचा जणू प्रघातच पडत चालला आहे की काय, अशी शंका येते. आशयाच्या परिप्रेक्ष्येला नेमकेपणाने सादर करण्याची ती आवश्यकता असते, असे समर्थन त्यापाठी लावता येऊ शकते. परंतु मूठभरासाठी आख्खे भांडार ओलीस ठेवणे अयोग्य असते. उद्देश सफल व्हावा असे वाटत असेल तर ते अशाच भाषेत व्यक्त व्हावे, जे वाचकाला सहज आकलन होईल. आपले लेखन सर्वस्तरातील वाचकासाठी आहे, ते त्याच्यापर्यंत सहजपणे पोहचायला हवे, हे भान लेखकाने इथे जपले आहे. लेखनासाठी अनेक संदर्भांचा आधार घेतलेला आहे. डॉ. केतकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. धुर्ये, नरहर कुरुंदकर, प्रबोधनकार ठाकरे, रसेल, यांच्या मतांचा आधार घेतलेला आहे. हे संदर्भ परके वाटत नाहीत. आपल्या सोप्या, सरळ, आणि सहज शैलीत हे लेखन केलेले आहे. विषयाचा आवाका किती मोठा आहे, याचे आकलन हा ग्रंथ वाचल्यानंतर लक्षात येतो. एखाद्या वृक्षाला असंख्य फांद्या, पारंब्या आणि पानेफुले असावीत, त्यातून खोड वा बुंधा दिसू नये. केवळ एक मोठा वृक्ष दिसावा, असा हा विषय. त्याच्या अंतरंगात शिरणे म्हणजे स्वतःचे अस्तित्व मागे ठेवून प्रवेश करणे, असा हा विषय. परंतु लेखकाने संयमपूर्वक एकेक फांदी वेगळी करीत या अंतरंगाचा शोध घेतला आहे. या शोधाला एक सूत्र आहे. त्या सूत्राला संयमाने गुंफताना कुठल्याही फांदीला विन्मुख ठेवलेले नाही. एकेक प्रकरण घेत काटेकोरपणे मांडणी केलेली आहे. मांडणीत उपशीर्षकांचा आधार घेतलेला आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकरण नेमकेपणाने आणि तितकेच प्रभावीपणाने विषयाला न्यायापर्यंत घेऊन जाते. अभ्यास आणि त्याची चिकित्सा यांच्या जोडीला लेखकाकडे असलेले विषयाचे आकलन अतिशय गांभीर्यपूर्वक व्यक्त झालेले आहे. त्यामुळे त्याचे संदर्भमूल्य अधोरेखित झाले आहे. कुणाही अभ्यासकाला, संशोधकाला मार्गदर्शक ठरावे असा हा ग्रंथ आहे. एक उत्तम संशोधन वाचकांच्या हाती दिले यासाठी लेखकाचे आणि प्रकाशकाचे अभिनंदन करायला हवे.

प्रा. हरी नरके (निवृत्त सदस्य-राज्य मागासवर्ग आयोग) यांनी या ग्रंथाची मौलिकता अधोरखित केली असून लेखकाच्या संशोधनाचे कौतुक प्रस्तावनेत केलेले आहे. सतीश भावसार यांनी साकारलेले मुखपृष्ठ त्यांच्या समग्रतेचे दर्शन घडवते, थेट आशयाला कवेत घेते.

मूल्य ३५० रुपये सवलतीत २१० रुपये

ग्रंथपान

औद्योगिक संबंध आणि कलहाच्या कथा

'अहो साहेब! तुम्ही आम्हांला मूर्ख समजलात काय? फिरोजची बडतर्फी करणे एवढी सोपी गोष्ट वाटली की काय तुम्हाला? तुम्ही ज्या दिवशी त्याला बडतर्फ कराल, त्याच दिवशी कंपनीतील सर्व कर्मचारी बेमुदत संपावर जातील. तो प्रश्न आम्ही आमच्या इभ्रतीचा प्रश्न समजू आणि फिरोजच्या बडतर्फीच्या अंमलबजावणीबद्दल न्यायालयाकडून स्थगितीचा आदेश आणू. मग बसा बोंबलत!'

'अनुभवाची शिदोरी' हा कवी विलास गावडे यांचा तिसरा कथासंग्रह. या संग्रहात दहा कथा आहेत. या कथा सामान्यतः असणाऱ्या विषयापेक्षा वेगळ्या विषयावर आधारलेल्या आहेत. हा विषय आहे औद्योगिक वातावरणाचा. कंपनी, कामगारवर्ग, काम गारांची संघटना आणि व्यवस्थापन या घटकांभोवती गुंफलेल्या या कथा आहेत. हे विश्वच वेगळे आहे. उत्पादन, वेतन, सुविधा, संप, कामगार करार, स्वेच्छानिवृत्ती, या वरवर दिसणाऱ्या गोष्टी. परंतु इथले विषय वेगळे आहेत. इथले कामगार संबंध, औद्यौगिक कलह वेगळे आहेत. या सगळ्यात सतत एक ताण भारलेला असतो. विजेची तार प्रवाहाने भारलेली असावी तसा. कधी ठिणगी पडेल याचा नेम नसतो. व्यवस्थापन शिस्त आणि उत्पादन याचे अस्त्र हातात घेऊन मालकाच्या तोऱ्यात वावरत असते. तर व्यवस्थापन हे मालक नसून आपणच खरे मालक आहोत, हा अहंभाव कामगारांच्या मनात असतो. तोच व्यवस्थापनावर सतत आपला दबाव प्रभावीपणाने टाकत असतो. त्याच्या पाठीशी उभी असते ती त्यांची संघटना. यातून उडणारे संघर्ष हे दोन शत्रू समोरासमोर उभे असल्यासारखे होत असतात. यासाठी अनेक कायदे आहेत. यांचा वापरही दोन्ही पक्षांकडून एकमेकांवर प्रहार करण्यासाठी केला जातो. हे सारे विलास गावडे यांनी या कथासंग्रहात केंद्रस्थानी ठेवलेले आहे.

'भात्यातील बाण' या कथेतील नाईकसाहेब हे आपली भूमिका स्पष्ट करतात की, शिस्त आणि प्रॉडक्शन या दोन गोष्टीमध्ये कधीही तडजोड केली नाही, करणार नाही. परंतु त्यांना अडवणारे मांडवकर तिथे आहेत आणि पाठिंबा देणारे कर्णिकसाहेब. याच्या संघर्षाची ही कथा आहे. 'चाप' या कथेत कंत्राटी कामगार आणि त्यांना वेठीला धरणारे कंत्राटदार हा विषय हाताळलेला आहे. कंत्राटी कामगार हे सुद्धा कामगार आहेत परंतु त्यांना कुठले फायदे अथवा सुविधा कंपनीकडून उपलब्ध नाहीत. ते कंत्राटदाराच्या हातातील बाहुले असल्यासारखी त्यांना वागणूक मिळते. हा अन्याय आहे. या विषयाला सकारात्मक पातळीवर कसे आणता येते, हा कदमसाहेबांचा स्तुत्य उद्देश ही कथा स्पष्ट करते. अर्थात राजेसाहेब, व्होरासाहेब यांचे सहकार्यही यासाठी महत्त्वाचे ठरते. 'सिझोफ्रनिया' या कथेत फिरोज, कल्पना या कामगारांच्या बदली व बडतर्फीच्या निमित्ताने व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यातला संघर्ष अतिशय प्रभावीपणे या कथेत मांडला आहे. 'धोबीपछाड' या कथेत ग्रॅच्युइटी कमी मिळाली हे कारण दाखवून व्यवस्थापनाला वेठीला धरणारा धनाजी शेट्ये, त्याला पाठिंबा देणारे भुसारेसाहेब आणि प्रकरण हाताळणारे विसपुतेसाहेब, यात कामगार कायदे, कामगार आयुक्तालय, कामगार संघटना, असा रंजक प्रवास असून एखादे कामगार प्रकरण कसे हाताळले जाते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही कथा. मुरलीधरन या कर्तबगार अधिकाऱ्याला कंपनीचे हित पाहताना केवळ स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागता येत नाही. इथे इतरही घटक महत्त्वाचे आहेत. आणि त्यात कामगार संघटना हा प्रबळ घटक आहे. तो चारचौघात ज्ञानाच्या कशा चिंधड्या उडवू शकतो, याचा अनुभव 'काटेरी खुर्ची या कथेत आला आहे. कामगार नेत्याच्या तोंडी आलेली भाषा ही या कथेच्या वातावरणातच नव्हे तर एकूण औद्योगिक वातावरणातील निदर्शक ठरते. कामगार करार हा विषय तेवढाच महत्त्वाचा आणि कामगारांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो, हेही यात अधोरेखित होते.

विलास गावडे हे उत्तम कवी आहे. आतापर्यंत त्यांचे चार कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत आणि त्यासाठी त्यांना विविध पारितोषिकेही प्राप्त झालेली आहेत. तसेच दोन कथासंग्रह प्रकाशित झालेले असून तेही पारितोषिकांनी सन्मानित झालेले आहेत. कवीकडे असलेली भाववृत्ती आणि संवेदनशीलपणा, आपल्याभोवतीचे टीपकागदाप्रमाणे टिपण्याची सजगता आणि त्याच्याशी जोडलेले आंतरिक नाते, यामुळे त्यांच्या कविता वाचकाच्या मनात स्थान निर्माण करून आहेत.

विलास गावडे यांच्याकडे असलेली लेखनातली सहजता लक्ष वेधून घेणारी आहे. कथा सादर करीत असताना ते जे विश्व उभे करतात ते एखाद्या चित्रपटासारखे दृष्यमय भासत राहते. एक संपूर्ण चित्र त्याच्या भावविश्वाला उलगडत जाते. व्यक्तिरेखांची संख्या मोठी असूनही ती प्रत्येक सजीव स्वरूपात तिच्या स्वभाव वैशिष्ट्यासह वाचकाच्या हृदयात आपले स्थान स्वतंत्रपणे राखून ठेवते. हे लेखकाचे मोठे यश म्हणायला हवे. औद्योगिक क्षेत्रातील घडणारे प्रसंग, वातावरण, त्यांच्यातले संबंध, संघर्ष, यांच्यामधील समतोल राखणे ही अतिशय अवघड बाब आहे, परंतु लेखकाने हे आव्हान लीलया पेललेले आहे. त्यामुळे प्रत्येक कथा स्वतंत्र आणि कसदारपणे वाचकाच्या हाती आलेली आहे. सहजता आणि गती ही लेखनात असेल तर ते लेखन वाचकाला आपल्या कवेत घेतल्याशिवाय राहात नाही. ही गती आणि सहजता गावडे यांच्या प्रत्येक कथेतून प्रत्ययाला येते. त्यामुळे वेगळ्या वातावरणातल्या कथा असूनही त्या वाचकाला आपले वेगळेपण दाखविण्यात यशस्वी झाल्या आहेत असे निश्चितपणे म्हणता येते. एक आगळावेगळा कथासंग्रह वाचकांच्या हाती दिला यासाठी लेखकाचे आणि प्रकाशकाचे अभिनंदन करायला हवे.

औद्योगिक समूहात यंत्र आणि व्यवस्थापन हे एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला कामगार आणि त्यांची संघटना, असे दोन घटक समोरासमोर असतात. ते परस्परांचे एका नाळेने बांधलेले सख्खे नातेवाईक असतात आणि पक्के वैरी. या दोघांना जोडणारी नाळ तुटणार नाही, याची कसरत करावी लागते ती व्यवस्थापकीय घटकाला. त्याची ही एकप्रकारची तारेवरची कसरत हेच सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर साकारले आहे.

मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये

ग्रंथपान

अस्पृश्य देवता आणि निवडक कथा
डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे

पारंपरिकतेचा तळ ढवळून काढणाऱ्या कथा

'या दुर्दैवी वेडीला साडी देऊन बदल्यात काय मिळणार? देवीला नेसवलेली साडी नंतर पुजारी घेऊन जातात. बस् तेवढंच! दात्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी फक्त एकदा ती साडी देवीला नेसवली जाते. दररोज दात्यांकडून अर्पण केल्या गेलेल्या साड्यांचं, कपड्यांचं काय होतं कोण जाणे? वेडीने पुजाऱ्याला याबद्दल काही विचारलं नाही. नाहीतर कोप व्हायचा आणि शाप द्यायचे. म्हणतील, उष्ट्या पत्रावळी उचलणारी तू बाई वस्तूचं मोल विचारणारी तू कोण आहेस?'

सुप्रसिद्ध लेखिका डॉ. प्रतिभा राय यांचा हा कथासंग्रह. त्याचा अनुवाद केला आहे डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी. सहस्त्रबुद्धे या साहित्यात लौकिक प्राप्त केलेल्या लेखिका आहेत. हिंदी हा त्यांचा अभ्यासाचा विषय. चित्रा मुद्गल, सुधा अरोडा, नंदकिशोर नौटियाल, सआदत मंटो, शंकर घोष, ललित सहगल, भीष्म सहानी, लक्ष्मीनारायण लाल, यांच्या साहित्याचा मराठीत अनुवाद त्यांनी केलेला आहे. तसेच विजय तेंडुलकर, विश्वास पाटील, चेतन दातार, डॉ. रोहिणी गवाणकर, डॉ. प्रकाश आमटे, यांच्या साहित्याचा हिंदीत अनुवाद केलेला आहे. त्यांच्या या साहित्यिक योगदानासाठी अनेक पुरस्कार त्यांना लाभलेले आहेत. त्याच सिद्धहस्त लेखणीतून हा अनुवाद दर्जेदारपणे साकारलेला आहे.

या कथासंग्रहात तेरा कथांचा समावेश आहे. यातील प्रत्येक कथा स्वतंत्र विषय आणि स्वतंत्र विचार घेऊन आलेली आहे. या सगळ्या कथांची गुणवैशिष्ट्ये उदाहरणासह सांगण्यासाठी स्वतंत्र लेखाची आवश्यकता आहे. उत्तम कथा कशी याचे प्रमाण सांगणाऱ्या या कथा आहेत. प्रत्येक कथेत आशयाला जोडून आलेली सौंदर्यस्थळे वाचताना अंगावर जी मोहिनी येते, ती अक्षरशः भारून टाकणारी असते. विषयाचा आवाका कवेत घेताना विचारांचे बाहू किती अंगानी आपले शक्तीप्रदर्शन करू शकतात, याचे दर्शन या कथा घडवतात. एखादी कविता फुलत जावी तसा हळूवार अनुभव संपूर्ण कथेवर दवासारखा विसावत जातो, वाचकाला चिंब करीत जातो. कथा ही आपल्या भवतालातून, जगण्याच्या अनुभवांतून जन्माला येते. परंतु तिच्या जन्माचा सोहळा कशाप्रकारे साजरा करायचा हे लेखकाच्या वकुबावर अवलंबून असते. प्रतिभावान लेखकाची प्रतिभासंपन्न ताकद काय असते हे त्याने निर्माण केलेल्या निर्मितीवरून ठरत असते. या संग्रहातील कथा लेखिकेच्या त्या प्रतिभेचा सुंदर पुष्पहार घेऊन आल्याचा दाखला देतात. जागोजागी आलेली वाक्ये ही केवळ विचारांची देणगी नाही, ती चिंतनाची, अभ्यासाची, आपल्या नितळ मनाची, जे दिसते त्या पलीकडे पाहणाऱ्या दृष्टीची देणगी आहे, याची साक्ष देतात. लेखनातली सहजता आणि प्रवाहीपणा भावणारा आहेच, परंतु त्यापाठी असलेली धग जाळून टाकावी इतकी दाहक आहे. तरीही ही धग धगधगणारी न दिसता लोण्याची लवचिकता आणि स्निग्धस्नेह हळुवारपणाचा अंगिकार केलेली आहे. असे लेखन डॉ. प्रतिभा राय याच करू शकतात.

प्रचंड दानधर्म, प्रसाद, पूजाअर्चा यातून देवदेवताविषयीचे माजलेले स्तोम हे भाविकतेचे प्रतीक म्हणता येईल का? देवांना या सगळ्यांची अपेक्षा असते आणि त्याचा ते उपभोग घेतात का? अपवित्र, अस्पृश्यता म्हणजे काय, त्यांचे देवतांना वावडे असते का? त्याचवेळी शरीरावर एक चिंधीही नाही, पोटात अन्नाचा एक कण नाही, अशा मंदिराच्या दाराशी असलेल्या माणसाकडे नाक मुरडीत दुर्लक्ष करणे, ही कोणती भाविकता म्हणायची? 'अस्पृश्य देवता' ही कथा दगडातला देव आणि हाडामासाचा माणूस या दोघांकडे पाहणाऱ्या आपल्या वृत्तीचा बुरखा फाडते. घराला, घरातल्या प्रत्येक वस्तूला कुलूप लावण्याची गरज कोणत्या मानसिकतेतून निर्माण झाली आहे? घरात असलेल्या इमानदार माणसांच्या इमानदारीवरच संशय आहे का? या प्रश्नावर सुंदर प्रकाश 'अभिमान' या कथेतून टाकलेला आहे. आजारातून बरे होणार नाही हे माहीत असूनही निरपेक्षपणे आधार देत सेवा करणे, ही वृत्ती जोपासली तर केवळ रुग्णच नाही, तर त्याचे आप्तही मानसिकदृष्ट्या सुखावतात, याचा अनुभव 'आनंदाश्रू' ही कथा देते. 'माझं गाव' ही कथा केवळ बदललेल्या गावाचे वर्णन करीत नाही, तर माणसामाणसात झालेले बदलही दाखवते. पंचेचाळीस वर्षांनी गावी परतलेल्या चेतनच्या भावभावनांचे वर्णन बदलत गेलेल्या गावाइतकेच मनोज्ञ आहे. 'तीर्थरहस्य' ही कथा खरोखर रहस्यमय वाटावी अशी आहे. सरस्वतीचे एकटीने तीर्थयात्रेला नियमि तपणे जाणे, त्यासाठी दानधर्म करणे आणि पतीचे तीर्थक्षेत्री नदीत बुडून झालेले निधन, या घटनांकडे समाज कोणत्या नजरेने पाहतो, याचा प्रत्यय म्हणजे प्रत्येकाच्या नजरेची प्रचितीच होय. मृत झालेल्या अनोळखी तरुणाच्या खिशात नावाची चिठ्ठी सापडली आणि ओळख पटवायला राघवबाबू यांना पोलिसाचा बेरात्री फोन आला. अशावेळी मानसिक आंदोलनांचा जो कौटुंबिक कल्लोळ निर्माण होतो, त्याची कथा म्हणजे 'निरुत्तर'. पक्षघात झाल्याने अंथरुणाला खिळून असलेल्या चंद्राला स्वेच्छामरण मिळावे ही पालकांची इच्छा आणि आत्ममग्न रुग्ण याचे जगणे हे जीवघेणे आहे तसे जगण्यावर प्रेम करणारेही आहे, याचा प्रत्यय 'चंद्रभागा आणि चंद्रकला' ही कथा देते.

डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी केलेला हा अनुवाद मूळ साहित्यकृती–इतकाच सकसपणे सिद्ध केलेला आहे. मूळ लेखिकेच्या नावाला आणि त्यांच्या प्रतिभेला साजेसा न्याय या अनुवादाने दिलेला आहे, असे निर्विवादपणे म्हणता येते. हा मूळचा मराठीतला डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी कथासंग्रहाचा अनुवाद समरसतेने आणि सर्व अनुभव पणाला लावून केलेला आहे. अनुवादक हा केवळ शब्दांचे भाषांतर करणारा नसतो, तो दोन भाषांचा दूत असतो, आशयाला आपल्या आंतरिक आत्मीयतेने जोजावणारा असतो हे अनुवादाने सिद्ध केलेले आहे. त्यामुळे आपण आपल्या मातीतला कथासंग्रह वाचत आहोत, असेच वाटत राहते. एक अतिशय सुंदर आशयसंपन्न कथासंग्रह उत्तमपणे मराठीत आणला यासाठी त्यांचे अभिनंदन करायला हवे. सतीश भावसार यांनी आशयसंपन्न असे मुखपृष्ठ साकार केलेले आहे.

मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये

ग्रंथपान

बाबा आमटे : व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व

बाळू दुगडूमवार



हिमालयाच्या अंतरंगात असलेल्या रसांचा शोध

'समाज कार्यात वेगळी वाट निर्माण करणाऱ्या समाजसेवक बाबा आमटे यांचे व्यक्तित्व हे ऋषी विश्वामित्र यांच्याशी साम्य सांगणारे वाटते. विश्वामित्र स्वतःच्या तप सामर्थ्याने राजर्षीत्वाचा त्याग करून ब्रह्मर्षीत्वाकडे जात राहिले. त्याचप्रमाणे बाबा आमटेही आपल्या सुखासीन, उच्चभ्रू, समृद्ध जीवनाचा त्याग करून श्रमर्षीतकडे जात राहिले आहेत.' एका प्रवासाची ही ओळख लेखकाने प्रस्तावनेत करून दिलेली आहे. बाबा आमटे त्यांचे व्यक्तित्व हे एक विलक्षण आव्हान आहे. ज्याला वादळाची उपमा दिलेली आहे. अशा वादळाचा शोध घेणे सोपे नाही. परंतु लेखकाने अतिशय परिश्रमपूर्वक या व्यक्तित्वाचा, त्यांच्या कर्तुत्वाचा आणि त्यांच्या ठायी असलेल्या कवित्वाचा शोध घेतलेला आहे. सामाजिक कार्याचे डोंगर उभे करणारे समाजसेवक बाबा आमटे हे सर्वांना ठाऊक आहेत. कुष्ठरोगाचा प्रयोग स्वतःच्या शरीरावर करून घेणारे बाबा हे वेगळेच व्यक्तित्व. सुखवस्तू घरात सर्व सुखांची भांडारे त्यांच्यासाठी खुली असताना दलित, दीनदुबळे, कुष्ठरोगी यांच्यासाठी त्यांनी सुरू केलेले विविध प्रकल्प पाहिले तर त्यांच्या या व्यक्तित्वात असलेल्या वेगळेपणाची ओळख होते. नागपूर जिल्ह्यातील 'अशोकवन प्रकल्प', चंद्रपूर जिल्ह्यातील 'सोमनाथ प्रकल्प', भामरागड तालुक्यातील हेमलकसा गावचा 'लोकबिरादरी प्रकल्प' आणि यांच्यासोबत वृद्धांसाठी 'उत्तरायण' वृद्धाश्रम तर अनाथांसाठी 'गोकुळ 'अनाथ आश्रम ही त्यांच्या समाजकार्याची जागतिक ओळख असलेली तीर्थस्थळे. ही तीर्थस्थळे आणि बाबा आमटे हे एकच व्यक्तित्व असल्याच्या खुणा आहेत. बाबा केवळ या प्रकल्पा पुरतेच मर्यादित राहिलेले नाहीत तर 'भारत जोडो', 'स्वातंत्र्य चळवळ', पंजाबमधील 'शांती यात्रा', 'नर्मदा बचाव ' मधील सहभाग यातून बाबांचा देशप्रेम, बंधुत्व, मानवता आणि सामाजिक जाणिवां यांचा प्रत्यय 'अभय साधक' या शब्दांशी सिद्ध होतो. त्यांच्या व्यक्तित्वाविषयी लिहिताना लेखक म्हणतात, 'बाबा आमटे यांचा एकूण जीवन प्रवास उजेडाकडून अंधाराकडे जाणारा होता त्यांचे जगणे म्हणजे आपल्या जगण्याचे उद्दिष्ट काय याचा प्रयोगशील शोध होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामर्थ्य आणि गती मानतेचा वादळी आवेग होता. हा आवेग स्वयंप्रेरित, स्वयंचलित आणि स्वयम् नियंत्रित असा होता. त्याला दिशा होती.'

बाबांच्या ठायी असलेल्या सामाजिक, मानसिक, राजकीय आणि साहित्यिक जाणिवांचा शोध लेखकाने घेतलेला आहे. सामाजिक कार्यात अखंड बुडालेले बाबा आमटे हे उत्तम कवी होते. त्यांनी लिहिलेले कवितासंग्रह 'ज्वाला आणि फुले', 'माती जागवील त्याला मत', 'करूणेचा कलाम' हे होत. तर 'उज्वल उद्यासाठी', 'सार्वजनिक संस्थांचे संचालन', 'श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ' हे त्यांचे वैचारिक लेखन होय. या प्रत्येक लेखनाचा लेखकाने स्वतंत्रपणे शोध घेतलेला आहे. यातून बाबा आमटे यांचा साहित्यिक परिचय होतो. त्यांच्या कवितेविषयी लिहिताना वि. स. खांडेकर लिहितात, 'भूकंपाची नोंद करणाऱ्या वेधशाळेतल्या यंत्रासारखी बाबांची संवेदनशीलता तरल आहे. पण भावनांच्या घोळात ते कधी गुरफटून पडत नाहीत.' हेरंब कुलकर्णी लिहितात, 'बाबा आमटे यांची शब्दकळा जितकी सुंदर आहे त्याहीपेक्षा दाहक, उत्कट टोकदार, ज्वालाग्रही शब्द आहेत. हे त्यांच्या कविता वाचल्यावर समजलं.'

निवडणूकही फक्त श्वासनांची टाकसाळ झाली आहे नोटां सारखा आश्वासनांचा ही चलन फुगवटा या देशात झाला आहे. जहाजाबरोबर स्वतःला बडवून घेणारे कर्णधार जेथे असतात तेथेच बुडता देश वाचवणाऱ्या नाविकांच्या पिढ्या जन्म घेतात यासारख्या कवितांच्या ओळी अधोरेखित केलेल्या आहेत तसेच वेळोवेळी बाबांनी व्यक्त केलेली मते आणि विचार यांचीही ही उद्धृते लेखकाने यात दिलेली आहेत. त्यावरून बाबांच्या जीवन प्रवासाची दिशा लक्षात येते.

बाबा आमटे यांचा शोध तीन टप्प्यात घेण्यात आलेला आहे. 'व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व' या शीर्षकावरून हे लक्षात येते. प्रत्येक टप्प्याचा अभ्यास करताना लेखकाने उपशीर्षके देऊन सविस्तरपणे त्या त्या विषयाला अधिक सखोल असा न्याय दिलेला आहे. त्यामुळे तो विषय समग्रपणे नोंद झालेला आहे. विषयास अनुसरून असलेले संदर्भ त्या या प्रकरणाच्या शेवटी दिलेले आहेत. या संदर्भांच्या यादीवरून विषयाची व्याप्ती आणि सखोलता लक्षात येते. लेखकाचा व्यासंग आणि विषयावरील हुकूमत याचाही प्रत्यय हे लेखन वाचताना येतो. लेखनातली प्रगल्भता आणि समृद्धपणा ही लेखकाच्या कसदार लेखनाची पावती म्हणावी लागेल. मांडणी, सुबोधपणा आणि नेमकेपणा यामुळे बाबा आमटे यांच्या चिकित्सक चरित्राला वेगळेपण लाभले आहे. संदर्भमूल्य असलेला हा ग्रंथ अनेक दृष्टीने मार्गदर्शक ठरावा. बाबा आमटे यांच्यावर आतापर्यंत बरेच लेखन झालेले आहे परंतु हे वेगळे लेखन असल्याने अनेकांपैकी एक असे न होता एक स्वतंत्र मूल्य असलेले लेखन ठरलेले आहे. एक चांगला ग्रंथ लेखकाने वाचकांच्या हाती मिळाला याचे समाधान वाटते.

डॉक्टर प्रकाश आमटे यांनी बाबांविषयी आणि लेखनाविषयी व्यक्त केलेले मत समग्र ग्रंथाचे सार म्हणता येईल. नयन बारहाते यांनी सजविलेले मुखपृष्ठ आशय आणि व्यक्तित्व यांना अनुरुप असे झालेले आहे. विशेष म्हणजे या ग्रंथाची मांडणी देखील आकर्षक पद्धतीने केलेली आहे.

मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये

ललिता छेडा लिखित
'मनबावन' या
पुस्तकप्रकाशनसमयी
सुदेश हिंगलासपूरकर
लेखिका ललिता छेडा
विनिता ऐनापुरे
आणि
सायली राजाध्यक्ष

डॉ. अनंत लाभसेटवार लिखित
'अमेरिका : स्थिती व स्थित्यंतरे
पुस्तकप्रकाशन ग्रंथाली झाले.
त्याप्रसंगी सतीश भावसार, सुदेश
हिंगलासपूरकर, अरुण जोशी,
दिलीप देशपांडे, प्रभाकर भिडे,
लेखक अनंत लाभसेटवार, नीला
उपाध्ये, डॉ. लता लाभसेटवार,
योगिता मोरे, सुमेधा कुवळेकर
(संगणकविभाग)
पाठीमागे डॉ. लतिका भानुशाली
आणि धनंजय गांगल

२७ जानेवारी २०२० रोजी बेडेकर
व्यासपीठात ७९ वे पुष्पात
'अमेरिका : स्थिती व स्थित्यंतरे' या
पुस्तकाचे प्रकाशन व्ही.पी. बेडेकर
ॲण्ड सन्स प्रा. लि.चे मालक
वसंतराव बेडेकर यांच्या हस्ते
प्रकाशित करण्यात आले.
त्या प्रसंगी सुदेश हिंगलासपूरकर
वसंतराव बेडेकर
डॉ. अनंत लाभसेटवार
आणि धनश्री धारप

राज कुलकर्णी लिखित
'दक्षिणेतील तेर मथुरा' या
पुस्तकप्रकाशनसमयी
नितीन तावडे
सुदेश हिंगलासपूरकर
रवींद्र केसकर
डॉ. माया पाटील
ॲड. राघवेंद्र बोधले
दिनकर गांगल
लेखक राज कुलकर्णी

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.